मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज

# महासागर

**मुंबई कार्यालय**
बोरा बजार स्ट्रीट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.
फोन : ०२२ ३१८५ ०७३५

**पालघर कार्यालय**
कार्यालय क्रमांक ४०९, पद्मीबाई, विरार रेल्वे सबवे समोर,
विरार पूर्व., ता. वसई, जि. पालघर. ४०१ ३०५. मो. ९८९२९६८७२५.

**नाशिक कार्यालय**
'आनंदी', कोतवाल पार्क, टिळकवाडी, वेद मंदिरासमोर,
धामणकर कॉर्नर, नाशिक ४२२००२. मो. ९८९०१०९९७८

**वितरण**
मो. नं. ८४२४९३६४३६

नाशिक | PRGI Reg. No.MHMAR/25/A0219 | सोमवार, २५ ऑगस्ट २०२५ | वर्ष: १ | अंक:८४ | पाने-८ | किंमत रू. २ + वितरण खर्च रू. १ एकूण रू.३


## मनसेने पुण्यातील फ्रेशर्स पार्टी बंद पडली

**पुणे, दि. २४ प्रतिनिधी**

पुण्याला सांस्कृतिक राजधानी म्हणून ओळखले जाते, मात्र गेल्या काही काळात अवैध उद्योग, अमली पदार्थ आणि रेव पार्ट्यांसारख्या घटनांमुळे शहराच्या प्रतिमेला धक्का लागला आहे. अशातच, पुण्यातील राज बहादूर मिल्स जवळील पबमध्ये फ्रेशर्स पार्टीच्या नावाखाली एक धक्कादायक प्रकार समोर आला. या पार्टीत कॉलेजमधील अल्पवयीन तरुण-तरुणींना दारू दिली जात होती. कोणत्याही विद्यार्थ्याचे ओळखपत्र तपासले जात नव्हते किंवा एन्ट्रीचे रजिस्ट्रेशनही नव्हते. त्यामुळे अल्पवयीन मुलांना सरसकट दारू विक्री केली जात होती. महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेने या पबवर धाड टाकली आणि ही पार्टी बंद पाडली. त्यानंतर या रोप चालका तंबी देण्यात आली आहे पोलिसांनी याविषयी गुन्हा दाखल करून घेतला असून पुढील तपास सुरू आहे.

## अग्रलेख — खरीखरी

### बिहार आणि इंडिया

बिहार राज्याच्या विधानसभा निवडणुकीचे नगारे आता जोरात वाजू लागलेले आहेत. राहुल गांधी यांनी फक्त एक पत्रकार परिषद घेऊन सर्व देशात खळबळ उडवून दिलेली आहे. ते दररोज निवडणूक आयोगावर दणादण वार करीत आहेत आरोप करीत आहेत. त्यासाठी निवडणूक आयोगाने एक पत्रकार परिषद घेतली मात्र त्यानंतरही राहुल गांधींचे आरोप पुन्हा मोठ्या प्रमाणावर सुरूच आहेत. राहुल गांधी एकेकाळी अर्धवेळ राजकारणी होते आता ते ओव्हरटाईम राजकारणी झालेले आहेत. त्यातच हातात संविधानाची प्रत घेऊन त्यांनी जे जे आरोप केले त्याचा खुलासा निवडणूक आयोग करीतच नाही. राहुल गांधींचे आरोप खोटे होते असेच पालुपद निवडणूक आयोगाने लावलेले आहे मग निवडणूक आयोग त्यांच्या विरुद्ध एफआयआर का दाखल करीत नाही, असा सबंध भारतातील जनतेला पडलेला प्रश्न आहे. कोणत्याही परिस्थितीत एकाही प्रश्नाचे उत्तर न देता निवडणूक आयोग काय सिद्ध करू पाहत आहे हेच समजत नाही. त्यामुळेच एका मोठ्या संवैधानिक आस्थापनेबाबत संपूर्ण देशभरात मोठा संभ्रम निर्माण झाला आहे. गेल्या आठवड्यापासून राहुल गांधी यांनी बिहारमध्ये मत अधिकार यात्रा सुरू केलेली आहे. इंडिया आघाडी गेल्या काही दिवसांपासून अगदी थंड बस्त्यामध्ये दिसत होती, त्यांच्यामध्ये कुठलीच हालचाल दिसत नाही असे सत्तारूढ पक्ष वारंवार म्हणत होता. त्यावेळी सर्वच लोकांमध्येही अशीच भावना होती कारण आम आदमी पक्षाने इंडिया आघाडीतून बाहेर पडण्याची जाहीर घोषणा केली होती. पश्चिम बंगालच्या तृणमूल काँग्रेसने सुद्धा एकला चलो चा नारा दिला होता. त्यामुळेच इंडिया आघाडीतील इतर पक्षांच्या मनातही चलबिचल चालू असेल असे वाटले. परंतु बिहारमध्ये एसआयआर मुळे ६५ लाख मतदारांची नावे कमी करण्यात आली हाच प्रयोग इतर राज्यातही होऊ शकतो. काही ठिकाणी मते वाढू शकतात तर काही ठिकाणी मध्ये कमी होऊ शकतात असा आरोप राहुल गांधी दररोज करीत आहेत. त्यासोबतच ही मतांची चोरी आहे असेही त्यांचे म्हणणे आहे. त्यामुळेच की काय निवडणूक आयोगाच्या आताच्या वागणुकीवरून आपल्यावरही अशीच गाज पडू शकते हे दिसून आल्याने आता विस्कटलेली इंडिया आघाडी पुन्हा घट्ट होत असल्याचे दिसत आहे. राहुल गांधी यांच्या मतदान अधिकार यात्रेत इंडिया आघाडीतील झाडून सारे पक्ष आणि त्यांचे सर्वोच्च नेते सामील होत आहेत. आगामी उपराष्ट्रपती पदाच्या निवडणुकीत विजय मिळवण्यासाठी सत्तारूढ पक्षाला धावपळ करावी लागत आहे. खरे तर एनडीएचा उमेदवार निवडून आणण्यासाठी फक्त ३९३ मतांची गरज आहे आणि एनडीए मधील सर्व पक्षांजवळ ४२५ च्या वर मते आहेत. एवढे असूनही सत्तारूढांच्या बाजूला निश्चिंतता का नाही हा सुद्धा एक मोठा प्रश्न आहे. एनडीए मधील चंद्राबाबू नायडू यांची सौदेबाजी, खुद्द भारतीय जनता पक्षातील बऱ्याच असंतुष्टांची गैरमर्जी हे सर्व घटक सध्या सत्तारूढ पक्षाला बेजार करीत आहेत. भारताच्या निवडणुकीच्या इतिहासात उपराष्ट्रपती या पदावरची निवडणूक सहज पार पडत होती. उपराष्ट्रपती सहज निवडून येत होते. यावेळी मात्र जिकडे, तिकडे आणि चोहीकडे फिरूनही सत्तारूढांची दमछाक होण्याचे कारण काय असावे बरे. यावर बऱ्याच राजकीय धुरिणांनी वेगवेगळी मते नोंदवलेली आहेत. सत्तारूढ पक्षाच्या दमछाकीचे कारण इंडिया आघाडीची मजबुती आणि विविध कारणामुळे सत्तारूढ पक्षातील असंतोष आहे, असे जवळपास सर्वांचेच म्हणणे आहे. मग सत्तारूढ पक्षाला याचा विचार करणे भागच आहे त्यातच ही निवडणूक दक्षिण विरुद्ध दक्षिण अशा पद्धतीने करून इंडिया आघाडीने मोठीच मनोरंजकता निर्माण करून गंमत आणलेली आहे. सत्तारूढ पक्षाचा अर्थ प्रचंड पाठिंबा असलेली आघाडी असा आहे. अर्थाअर्थी या निवडणुकीचा अर्थ आणि त्याची शक्ती किती फलदायी ठरते यावरून आता दोन्ही पक्षांची परीक्षा होणार आहे. आता तरी सत्तारूढ पक्षाचे पारडेच जड दिसते. मात्र, बिहारमध्ये सध्यातरी इंडियाची बहार दिसत आहे.


nagpurpost@gmail.com
Mob.No.9922970023


# आता ही शेवटची फाईट

## जाळपोळ, दगडफेक करू नका

### मराठा आंदोलकांना जरांगेचे आवाहन



**बीड, दि. २४ प्रतिनिधी**

**आम्ही शांततेत मुंबईला जाणार आणि शातंतेत मराठा आरक्षण घेणार, मराठा समाजावर आलेले संकट मोडून काढणार असं वक्तव्य मनोज जरांगे यांनी केलं. मराठा समाजाच्या सभेमध्ये डीजे वाजवू दिला नाही, पण यापुढे बीडमध्ये कुठेही डीजे वाजवू देणार नाही हे नक्की. सत्ता येत असते, ती बदलत असते हे लक्षात ठेवा असा इशारा मनोज जरांगे यांनी दिला. आता ही शेवटची फाईट आहे, अशी मारायची की आरक्षण घेऊनच यायचे, तसेच मुंबईत कोणीही जाळपोळ, दगडफेक करू नका असे आवाहन मनोज जरांगेंनी मराठा आंदोलकांना केले आहे.**


बीडमध्ये आमच्या सभेमध्ये अडचणी निर्माण केल्या जातात, जरा थांबा, आम्ही मुंबईत येतोय. त्यावेळी काय करायचं ते करा असं थेट आव्हान मनोज जरांगे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलं. सरकारने जर मराठ्यांना आरक्षण दिलं, आमच्या मागण्या मान्य केल्या तर आम्ही मुंबईला कशाला येऊ? इथूनच मंत्रालयावर गुलाल उधळतो. गडबड घोटाळा करु नका. त्यामुळे मराठा समाजावर संकट घोंघावतंय. ते संकट आता मोडून काढायचं आहे. तुमच्या आणि माझ्या भावनांचा सत्ताधाऱ्यांनी वापर करुन घेतला. मराठ्यांची ताकद मोठी आहे, पण आपण विचारांनी चाललो नाही. त्यामुळे आपल्या मुलांचं नुकसान झालं. प्रत्येकाने आपला वापर केला. उभ्या पिढ्यांचं वाटोळं झालं. यापुढे आपण विचारांनी चालायचं. बीडमधील मराठा समाज आता एक झाला आहे, गर्व वाटेल असं काम करतोय. आज बीडची गर्दी पाहून सत्ताधारी बेजार झालेत. आता असंच मुंबईला जायचं.

बीडच्या सभेमध्ये पोलिसांनी डीजे वाजवू दिला नाही. त्यावर मनोज जरांगे म्हणाले की, आपल्याला बीडच्या सभेत डीजे वाजवू दिला नाही, ठीक आहे. पण आमचा डीजे वाजवू दिला नाही, यापुढे बीडमध्ये कुणाचाही डीजे वाजवू देणार नाही हे नक्की. देवेंद्र फडणवीसांनी जर पोलिसांना आदेश दिले असतील आणि पोलीस जर चुकीचे काम करत असतील तर तसं करू नका. एवढी विनंती करुनही जर एखाद्या पोलीस अधिकाऱ्याला काही करायचं असेल तर त्या महादेव मुंडेच्या मारेकऱ्यांना शोधा.

मनोज जरांगे म्हणाले की, तुमच्या जातीचा आमदार, खासदार आहे म्हणून तुमच्या पोराबाळांची फी माफ होणार नाही, त्याला नोकरी मिळणार नाही. त्यामुळे प्रत्येकाने मुंबईला यावं. कुणा राजकीय नेत्याचं ऐकून गावात थांबू नका. तुमच्या आमदार, खासदारांना मुंबईला यायला सांगा. सरपंचापासून सगळ्या नेत्यांना मुंबईला यायला सांगा. आता ही शेवटची लढाई असेल.

## बाप्पा आला रे...!

**२७ ऑगस्ट रोजी श्रीगणेश चतुर्थी आहे. या दिवशी गणराज विराजमान होणार आहेत. देशभरातील लोकप्रिय गणपतींपैकी एक असलेल्या लालबागच्या राजाचा पहिली झलक**



# सुप्रिया सुळेंचा मांसाहार, खरातांच्या वक्तव्यावर इतर वारकरी आक्रमक

**पंढरपूर, दि. २४ प्रतिनिधी**

"मी मांसाहार केलेला माझ्या पांडुरंगाला चालतो मग तुम्हाला काय अडचण आहे?" असा सवाल राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी उपस्थित केला होता. मांसाहारावरून सध्या राज्याच्या राजकारणात गदारोळ पाहायला मिळत आहे. मांसाहारावरून वेगवेगळी वक्तव्ये करणाऱ्या महायुतीतील नेत्यांवर खासदार सुळे यांनी संताप व्यक्त केला. दरम्यान, त्यांच्या या वक्तव्यावर आता वारकरी संप्रदायातून प्रतिक्रिया येऊ लागल्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस देखील म्हणाले होते की 'वारकरीच सुप्रिया सुळे यांना उत्तर देतील'. अशातच. ह. भ. प. बाळासाहेब महाराज खरात यांनी सुप्रिया सुळे यांच्या वक्तव्याचा निषेध केला आहे.

बाळासाहेब खरात म्हणाले, "मी समस्त वारकरी संप्रदायाच्या वतीने आणि माळकऱ्यांच्या वतीने सुप्रिया सुळे यांच्या वक्तव्याचा निषेध करतो. पांडुरंगाला मांसाहार चालतो असं कुठलाही शहाणा माणूस कधीच म्हणणार नाही. हा पांडुरंगाचा अपमान आहे. हा माळकऱ्यांचा अपमान आहे. आम्हाला सुप्रिया सुळे यांच्याकडून फार काही अपेक्षा नाही. कारण त्यांच्या वडिलांनीच आजवर कधी पांडुरंगाच्या चरणावर डोकं टेकवल्याचं माझ्या तरी पाहण्यात आलेलं नाही. त्यामुळे सुप्रिया सुळे यांना काय बोलावं यासाठी मला शब्दच सुचत नाहीयेत. त्यांना शृपर्णखा म्हणावं का? परंतु, असा कुठलाही शब्द वापरला तर त्या शब्दाचाच अपमान होईल." असे विषारी विचार खरात यांनी मांडले.



बाळासाहेब खरात म्हणाले, "सत्तेसाठी ही मंडळी कुठल्याही थराला जातील, वाचाळवीरांसारखं काय बोलतील हे आपण सांगू शकत नाही. आम्ही पांडुरंगाचा अपमान सहन करू शकत नाही. त्यामुळे मी सुप्रिया सुळे यांच्या वक्तव्याचा निषेध करतो आणि त्यांनी यापुढे असं वक्तव्य केलं तर सगळे वारकरी त्यांना धडा शिकवतील. मी स्वतः देखील काहीही करू शकतो. मी माझ्या पांडुरंगाचा, माझ्या संप्रदायाचा अपमान सहन करणार नाही. कारण मी ज्याचं खातो त्याचाच गातो, मी पुढाऱ्यांचं गाणं गाणार नाही."

खरात म्हणाले, "मला सुप्रिया सुळे यांना सांगायचं आहे की तुम्ही कितीही मोठ्या राजकारणी असला तरी तुम्ही आमच्या आराध्य दैवतांचा अपमान करू शकत नाही. या वक्तव्यावर आळंदी, पंढरपूर, देहू येथून वैष्णव भक्तांच्या खरातांची लायकी काय आहे अशी प्रतिक्रिया येत आहे. यामुळे या प्रश्नावरून वातावरण तापण्याची शक्यता आहे.

## भेट झाली म्हणून राजकीय समीकरणे बदलत नाहीत- मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई, दि. २४ प्रतिनिधी**

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक महायुती एकत्रितपणे लढवेल. एखादा नेता मला भेटला यावरुन राजकारण होत नसते, असे वक्तव्य करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज ठाकरे हे महायुतीसोबत राहतील, याबाबतच्या उरल्यासुरल्या आशा संपवून टाकल्या आहेत. दोन दिवसांपूर्वीच राज ठाकरे यांनी वर्षा बंगल्यावर जाऊन देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली होती. यावेळी उभय नेत्यांमध्ये तब्बल पाऊणतास चर्चा झाली होतीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज ठाकरे यांच्यासोबत भेट झाली म्हणून राजकीय समीकरणे बदलत नाहीत, असे सांगत युतीच्या शक्यतेचे सर्व दोर कापून टाकले आहेत.

लोकांनी भ्रमित होण्याचे कारण नाही. आमची महायुती अभेद्य आहे. आम्ही महायुतीमध्येच लढणार आहोत. आम्हाला कोण येऊन भेटतो यावरुन युती ठरत नाही किंवा त्यावरुन राजकारणही होत नसते. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका महायुती एकत्रच लढेल आणि महायुतीच जिंकेल, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले. विधानसभा निवडणुकीत मनसेच्या मतांची चोरी झाल्याचा आरोप राज ठाकरे यांनी शनिवारी कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात केला होता. याविषयी देवेंद्र फडणवीसांना विचारताच त्यांनी या दाव्याची खिल्ली उडवली. त्यांनी म्हटले की, मला एक गालिबचा शेर आठवतो. गालिबने म्हटले होते की, 'दिल बहलाने के लिये ख्याल अच्छा है...' मी यावर एवढेच बोलेन. जोवर सत्य स्वीकारणार नाही, तोवर सर्व पक्षांची अवस्था अशीच राहील. २०१४ मध्ये मोदी जिंकले तेव्हा देशात आणि राज्यात काँग्रेसची सत्ता होती. १५-१५ वर्षांपासून सत्ता होती. जोवर विरोधक विचार करणार नाही की आपण का हरतो आहे, जनतेने आपल्याला का नाकारले आहे, याचा अभ्यास न करता छाती बडवण्याचा काम करतील, तोवर हे जिंकणार नाहीत. विरोधक लोकांचा अपमान करतील तोपर्यंत निवडून येणार नाहीत, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले.

# जेएसडब्ल्यू कंपनीच्या फेज 3 ची जनसुनावणी यशस्वी

**पेण, दि. २४ प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील वडखळ-डोलवी परिसरात असणाऱ्या जेएसडब्ल्यू कंपनीच्या फेज ३ च्या विस्तारीकरणासाठी दि. २२ रोजी जेएसडब्ल्यू जेटी वाहनतळ, धरमतर पोलीस चौकी जवळ जनसुनावणीचे आयोजन करण्यात आले होते.ही जनसुनावणी यशस्वीरित्या पार पडून कंपनीच्या या विस्तारीकरणाला हजारों नागरीकांडून हिरवा कंदील देण्यात आला आहे.सदर जनसुनावणी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या ऋतुजा भालेराव, पेण प्रांताधिकारी प्रवीण पवार, तहसीलदार तानाजी शेजाळ यांच्या उपस्थितीत घेण्यात आली.दुपारच्या दरम्यान सुरू झालेल्या कंपनीच्या जनसुनावणीत कंपनीच्या अधिकारी वर्गातील ज्योतींद्र देशमुख व विवेक कुलकर्णी यांनी कंपनीच्या विस्तारीकरणासह प्रदूषणासंदर्भात





कंपनीने आजतागायत केलेल्या पेण, नागोठणे, अलिबाग या भागातील विकासकामांबाबत तसेच येणाऱ्या नियोजनाबाबत कंपनीच्या वतीने जनसुनावणी दरम्यान उपस्थित जनतेसमोर अहवाल मांडला व होत असलेल्या विस्तारीकरणात सदर कंपनी येथील भागांमध्ये अधिकाधिक विकास करण्याच्या दृष्टिकोनातून काम करणार असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.त्यानंतर सुनावणीसाठी आलेल्या लोकांकडून मत मांडण्यात सुरुवात झाली त्यावेळी या परिसरातील उपस्थित आजी, माजी सरपंच उपसरपंच, स्थानिक राजकीय लोकप्रतिनिधी यांनी येणाऱ्या प्रकल्पाचे स्वागत करून प्रकल्प वाढला तरच येथील रोजगार वाढणार आहे. आजपर्यंत कंपनीने या भागासाठी चांगल्या सुविधा दिल्या असून या जनसुनावणीला जाहीर पाठिंबा असल्याचे दर्शविले आहे.तर यावेळी सामाजिक कार्यकर्त्या उल्का महाजन, नंदा म्हात्रे, कुंदा गावंड, संतोष ठाकूर, चैतन्य पाटील यांच्यासह काही नागरिकांनी आपल्या हरकती नोंदविल्या असता यावेळी गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते परंतु यावेळी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के यांनी उपस्थितांचे म्हणणे ऐकून ज्यांना हरकती नोंदवायच्या आहेत त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालय अलिबाग येथे सोमवार मंगळवारी लेखी स्वरूपात मान्य मांडावे असे आव्हान करून जनसुनावणी यशस्वीरित्या पार पाडली. या जनसुनावणी दरम्यान कोणताही अनुचित प्रकार घड नये याकरिता पेण डीवायएसपी जालिंदर नालकुल यांच्या मार्गदर्शनाखाली पेण पोलीस निरीक्षक संदीप बागुल, वडखळ पोलीस निरीक्षक प्रसाद पांढरे, दादर सागरी पोलीस निरीक्षक संजीवकुमार ब्राह्मणे यांच्याकडून मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

## शरीरात रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत गोपीचंद पडळकरांसोबत राहीन- खोत

**सांगली, दि. २४ प्रतिनिधी**

माझ्या शरीरात रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत मी गोपीचंद पडळकर यांच्यासोबत राहीन, असे जाहीर वचन रयत क्रांती संघटनेचे सर्वेसर्वा सदाभाऊ खोत यांनी दिले आहे. गोपीचंद पडळकर आणि मी दोघेही आक्रमकपणे भूमिका मांडत राहिलो नाही तर विरोधक आम्हाला नैवेद्यालाही शिल्लक ठेवणार नाहीत. गोपीचंद पडळकर हे वंचितांसाठी प्रस्थापितांच्या विरोधात आक्रमकपणे उभे राहतात. त्यामुळे प्रस्थापित राजकारण्यांचा गोपीचंद पडळकर यांच्यावर राग आहे, असे सदाभाऊ खोत यांनी म्हटले. ते वाळवा तालुक्यातील वाटेगावमधील बिरोबा मंदिर सभा मंडप उद्घाटन प्रसंगी सदाभाऊ खोत बोलत होते.



सदाभाऊ खोत यांना आपल्या भाषणात गोपीचंद पडळकर यांच्याविषयी बोलताना अश्रू अनावर झाले होते. गोपीचंद पडळकर आणि मी समाजातील वंचित, दुर्लक्षित घटकांना जवळ घेऊन प्रसंगी आक्रमक भूमिका घेत त्याचे प्रश्न सोडवतात. जर आम्ही दोघांनी आक्रमकपणे भूमिका मांडल्या नाहीत तर आम्हाला विरोधक नैवेद्यालाही शिल्लक ठेवणार नाहीत. त्यामुळे गोपीचंद पडळकर सारखे नेतृत्व जपले पाहिजे आणि ते मोठं केलं पाहिजे. मी तर माझ्या शरीरात रक्ताचा शेवटचा थेंब असेपर्यंत मी गोपीचंद पडळकर समवेत असेन, असे म्हणत असताना सदाभाऊ खोत यांना अश्रू अनावर झाले.

यावेळी आमदार गोपीचंद पडळकर हेदेखील व्यासपीठावर उपस्थित होते. आमदार गोपीचंद पडळकर आणि आमदार सदाभाऊ खोत हे बहुजन समाजातील वंचित लोकांचे समाजाचे प्रश्न मांडतात. नाहीतर या लोकांना कुणीही मायेने जवळ घेत नाही. गोपीचंद पडळकर आणि सदाभाऊ खोत समाजातील वंचित, दुर्लक्षित घटकांना जवळ घेऊन त्यांचे प्रश्न सोडवतो. या वंचित लोकांसाठी गोपीचंद पडळकर देखील नेहमी प्रस्थापितांच्या विरोधात आक्रमक भूमिका घेतात. म्हणून प्रस्थापितांचा पडळकरांवर राग आहे, असेही सदाभाऊ खोत म्हणाले.

## 'IADWS' ची पहिली उड्डाण चाचणी यशस्वी

**नवी दिल्ली, दि. २४ वृत्तसंस्था**

भारताने एकात्मिक हवाई संरक्षण शस्त्रप्रणालीची पहिली उड्डाण चाचणी यशस्वीपणे पार पाडली आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी संरक्षण संशोधन आणि विकास संस्था आणि उद्योग जगताचे याबद्दल अभिनंदन केले आहे. 'डीआरडीओ'ने २३ ऑगस्ट रोजी सुमारे १२:३० वाजता ओडिशाच्या किनाऱ्यावर एकात्मिक हवाई संरक्षण शस्त्रप्रणाली (IADWS) ची पहिली उड्डाण चाचणी केली.



उड्डाण चाचण्यांदरम्यान, दोन अतिवेगवान फिक्स्ड-विंग मानवरहित हवाई वाहने आणि एक मल्टी-कॉप्टर ड्रोन अशा तीन वेगवेगळ्या लक्ष्यांना QRSAM, VSHORADS आणि हाय एनर्जी लेझर वेपन सिस्टीमद्वारे वेगवेगळ्या टप्प्यांवर आणि उंचीवर एकाच वेळी लक्ष्य करून पूर्णपणे नष्ट करण्यात आले. क्षेपणास्त्र प्रणाली, ड्रोन शोध व नष्ट प्रणाली, शस्त्र प्रणाली कमांड अँड कंट्रोल, तसेच कम्युनिकेशन आणि रडार यांसह सर्व शस्त्र प्रणालीच्या घटकांनी अचूकपणे काम केले.

एकात्मिक हवाई संरक्षण शस्त्रप्रणाली अर्थात IADWSही एक बहुस्तरीय हवाई संरक्षण प्रणाली आहे. यामध्ये तत्काळ जमिनीवरुन हवेत मारा करणारी स्वदेशी क्षेपणास्त्रे,अतिशय कमी पल्ल्याची प्रगत हवाई संरक्षण प्रणाली क्षेपणास्त्रे,उच्च शक्तीचे लेझर-आधारित निर्देशित ऊर्जा शस्त्र आदींचा समावेश आहे.

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी ओडिशाच्या किनाऱ्यावर झालेल्या IADWS च्या पहिल्या यशस्वी उड्डाण चाचणीबद्दल सर्वांचे अभिनंदन केले. त्यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'X' वर लिहिले की, 'IADWS ही एक बहुस्तरीय हवाई संरक्षण प्रणाली आहे, ज्यामध्ये त्वरित प्रतिसाद देणारी जमिनीवरून हवेत मारा करणारी स्वदेशी क्षेपणास्त्रे , अतिशय कमी पल्ल्याची प्रगत हवाई संरक्षण प्रणाली क्षेपणास्त्रे आणि उच्च शक्तीचे लेझर-आधारित निर्देशित ऊर्जा शस्त्र (DEW) यांचा समावेश आहे.'

'मी IADWS च्या अद्वितीय उड्डाण चाचणीने आपल्या देशाची बहुस्तरीय हवाई संरक्षण क्षमता सिद्ध केली आहे. हे शत्रूच्या हवाई धोक्यांपासून महत्त्वपूर्ण ठिकाणांचे संरक्षण करण्यासाठी प्रादेशिक संरक्षण अधिक मजबूत करेल, असा विश्वासही राजनाथ सिंहांनी व्यक्त केला आहे.

## अण्णासाहेब आर्थिक विकास महामंडळ म्हणजे मराठा मुलांचे सिबिल खराब करण्याची यंत्रणा, मराठा आंदोलक विरेंद्र पवारांची घणाघाती टीका

**गजानन तुपे**

**मुंबई, दि. २४**

मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळावे, या मागणीसाठी मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील २९ ऑगस्ट रोजी मनोज जरांगे हे मुंबईत धडकणार आहे. मनोज जरांगे आमरण उपोषण करण्यापूर्वी तयारीची बैठक आज मुंबईत आयोजित करण्यात आली होती. बैठकीला मुंबई आणि उपनगरातील मराठा समाजाचे विविध पदाधिकारी उपस्थित होते. मुंबईतील शिवाजी नाट्य मंदिर येथे सकाळी ११ ते १ या वेळेत बैठक पार पडली. या बैठकीनंतर मराठा आंदोलक विरेंद्र पवार यांनी घणाघाती टीका केली आहे. अण्णासाहेब आर्थिक विकास महामंडळ म्हणजे मराठा मुलांचे सिबिल खराब करण्याची यंत्रणा असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

मराठा आंदोलक विरेंद्र पवार म्हणाले की, मनोज जरांगे आंदोलन करत आहेत हे लक्षात आल्यावर आता १ वर्षापासून झोपलेलं सरकार जागं झालं आणि आता मराठा आरक्षण उपसमिती सरकारने नेमली. ज्यांनी समाजाबाबत चुकीची वक्तव्य केली, त्यांना सरकारने समितीचं अध्यक्ष केलं. मराठा समाजासाठी अण्णासाहेब आर्थिक विकास महामंडळ स्थापन केले. परंतु, याचा व्याज परतावा मिळत नाही. मराठा समाजाच्या मुलांचे सिबिल खराब करण्याची यंत्रणा म्हणजे अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ आहे, असे त्यांनी म्हटले.



विरेंद्र पवार पुढे म्हणाले की, या समितीने सांगितलं की, प्रत्येक जिल्ह्यात आम्ही वसतिगृह करू. ५ कोटी त्यासाठी ग्रांट देऊ. कुठे आहे वसतिगृह आणि कुठे आहे ग्रांट? प्रत्येकवेळी समाजाला चुकीच्या प्रकारचे आरक्षण देता आणि कोर्टाच्या पिंजऱ्यात उभे करतात, हे आम्ही सहन करणार नाही. आम्हाला ५० टक्क्यांच्या आत आरक्षण द्या. यासाठी घटना दुरुस्ती करण्याची आवश्यकता नाही, असा हल्लाबोल देखील त्यांनी केला आहे.

दरम्यान, मराठा समाजाला ओबीसी मधून आरक्षण मिळवण्यासाठी मनोज जरांगे यांच्या 'चलो मुंबई' या आवाहनाला सोलापूर जिल्ह्यातून मोठा प्रतिसाद मिळत असून यंदाचा गणपती आम्ही अरबी समुद्रात विसर्जित करू. मुंबईकरांनी आम्हाला साथ द्यावी, असे आवाहन सकल मराठा मोर्चाचे समन्वयक धनाजी साखळकर यांनी केले आहे. मुंबईत दीड दिवसाचा गणपती असतो. मात्र, महाराष्ट्रात दहा ते तेरा दिवसापर्यंत गणपती असतो. यावर्षी मनोज जरांगे पाटलांच्या आंदोलनासाठी राज्यातील लाखो मराठा बांधव मुंबईच्या दिशेने निघणार असून यंदाचा आमचा गणपती अरबी समुद्रात विसर्जित करण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे. मुंबईकर आमच्या या निर्णयाच्या पाठीशी राहून आम्हालाही अरबी समुद्रात गणपती विसर्जन करू देतील, अशी अपेक्षा धनाजी साखळकर यांनी व्यक्त केली आहे. सोलापूर जिल्ह्यातून आतापर्यंत पंचवीस हजार गाड्यांची नोंदणी झाली असून पुढील तीन दिवसात हा आकडा ५० हजारापर्यंत पोहोचेल असा विश्वास साखळकर यांनी व्यक्त केला आहे. यंदा घरी गौरी गणपती असूनही मोठ्या संख्येने मराठा महिला या आंदोलनात सहभागी होणार असल्याचा दावाही साखरकर यांनी केला आहे.

# ओझरला बैलपोळा उत्साहात


## बाणेश्वर नंदी' ठरले आकर्षणाचे केंद्र



**ओझर ।** ओझर येथे बैलपोळा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळपासूनच गावात सणाचे वातावरण रंगले होते. सायंकाळी मारुती वेस येथील श्री हनुमान मंदिरात मिरवणुकीने नंदी महाराज आगमन सोहळा दणदणाटात पार पडला. यात जगदगुरु जनार्दन स्वामी महाराज आश्रम (जनशांती धाम) येथील "श्री बाणेश्वर महादेव नंदी" विशेष आकर्षण ठरले.

पोळ्यानिमित्त शेतकऱ्यांनी आपल्या शेतमित्र बैलांना स्नान घालून हार-फुले, रंगीबेरंगी फुगे, आकर्षक झगमगाटी काठ्या व झुलांनी सजवले. गोंदण व रंगकामाने सजलेले बैल ढोल-ताशांच्या गजरात व लेझीम पथकांच्या तालावर गावातून मिरवण्यात आले. शेतकऱ्यांनी बैलांची पूजा करून त्यांच्या आरोग्य व शेतसंपन्नतेसाठी प्रार्थना केली. पारंपरिक पोळ्याची गाणी गावकऱ्यांच्या ओठांवर गुंजली आणि सणाला अधिक रंगत आणली. शहर व उपनगरातील शेतकरी बांधवांनीही मोठ्या संख्येने सहभाग घेतला. ढोल-ताशांच्या गजरात बैलजोडींच्या मिरवणुकीने गावात ऐक्य, उत्साह, आनंदाचे वातावरण निर्माण झाले. जगदगुरु स्वामी शांतीगिरीजी महाराजांनी निर्माण केलेल्या देवभूमी जनशांती धाम येथील रुबाबदार "बाणेश्वर नंदी" समूहाचे हनुमान मंदिरात आगमन होताच भाविकांचा उत्साह ओसंडून वाहिला. प्रत्येक नंदीवर "बाणेश्वर महादेव नंदी" असे आकर्षक अक्षरांकन केलेले होते. भाविकांनी श्रद्धेने दर्शन घेतले, तर "जय बाणेश्वर, जय नंदिकेश्वर"च्या घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला.

# विहिरीत पडलेल्या बिबट्यास जीवदान





**ओझर ।** निफाड तालुक्यातील चितेगांव येथे कुत्र्याचा पाठलाग करताना विहिरीत पडलेल्या बिबट्यास नाशिक पूर्व वनविभागाचे आधुनिक बचाव पथक निफाड व ए.आर.ई ए.एस.फाउंडेशन संस्था तसेच निर्भय संचार फाउंडेशन संचलित वनराजा संस्था यांच्या मदतीने सुरक्षितरित्या बाहेर काढण्यात आले.

याबद्दल अधिक माहिती अशी की, गुरुवारी (दि.२१) रात्री साधारण ८ वाजेच्या सुमारास चितेगांव येथील सुभाष साहेबराव गाडे यांच्या गट नं ४४१/३ मधील घराजवळील विहिरीजवळ बिबट्या कुत्र्यावर हल्ला करण्याच्या उद्देशाने आला. बिबट्याला पाहून कुत्रा स्वतः चा जीव वाचवत पळाला. कुत्र्याचा पाठलाग करत असतांना जवळच असलेल्या विहिरीत कुत्रा व बिबट्या दोन्ही विहिरीत पडले. ही गोष्ट सुभाष साहेबराव गाडे यांच्या लक्षात येताच त्यांनी तत्काळ पोलीस पाटील चितेगांव राहुल दळवी व सरपंच सुभाष गाडे यांना कळवले. तसेच ए आर इ ए एस फाउंडेशनचे संचालक व वन्यजीव अभ्यासक अमोल सोनवणे यांना फोन वरून बातमी दिली व वनविभागाशी संपर्क केला. घटनेची माहिती मिळताच नाशिक पूर्व वनविभागाचे उपवनसंरक्षक श्री.राकेश सेपट, सहायक वन संरक्षक शिवाजी सहाणे, येवला वनपरीक्षेत्र अधिकारी राहुल घुगे यांच्या मार्गदर्शनाखाली येवला वन परिक्षेत्राचे निफाड येथील आधुनिक बचाव पथक व ए.आर.ई ए.एस.फाउंडेशन संस्थेचे सदस्य व निर्भय संचार फाउंडेशन संचलित वन राजा संस्थेचे सदस्य यांनी घटनास्थळी पोहचून शेताच्या विहिरीत पिंजरा सोडला. तत्पूर्वी बिबट्याने विहिरीत मोटार च्या पाईप चा आधार घेऊन स्वतः ला पाण्यात वाचवण्याचे प्रयत्न सुरु केले होते. विहिरीत सोडलेल्या पिंजऱ्यात बिबटया ला जेरबंद करून सुरक्षितरित्या बाहेर काढून जीवदान दिले. पुढील कार्यवाही साठी बिबटयाला निफाड वन उद्यान येथे नेण्यात आले. बचाव कार्यानंतर उपस्थित नागरिकांचे प्रबोधन करण्यात येऊन बिबट्या बाबतचे माहिती पत्रक वाटप करण्यात आले. यावेळी वनपरिक्षेत्र अधिकारी राहुल घुगे, वनपाल जयराम शिरसाठ, वनरक्षक विजय दोंदें आधुनिक बचाव पथकाचे सदस्य भारत माळी, विजय माळी, शरद चांदोरे, सागर दुशिंग, सादिक शेख, वैभव दौंड, रितेश निहारे, मयूर गांगुर्डे, ज्ञानेश्वर पवार, काशिनाथ माळी, आणि ए.आर.ई ए.एस.फाउंडेशनचे वन्यजीव अभ्यासक अमोल सोनवणे, चितेगांव ग्रामस्थ यांचे सहकार्य लाभले.


# सागरमल मोदी शाळेत बैलपोळा उत्साहात



**नाशिक ।** सागरमल मोदी प्राथमिक शिक्षण मंदिर शाळेत शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र निकम यांच्या मार्गदर्शनाखाली बैलपोळा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

याप्रसंगी विद्यार्थ्यांनी बनवलेल्या घर, झाड, विहीर, शेती (उगवलेले गव्हाचे तृण), रांगोळी या सर्व गोष्टींचा वापर करून कृषीनगर गावाची प्रतिकृती मांडण्यात आली. श्री गुंबाडे, राजश्री शेळके, पायल जावळे या विद्यार्थ्यांनी बैलपोळा सणाची माहिती आपल्या भाषणातून दिली. शिक्षिका उषा जोपळे यांनी बैलपोळा संदर्भात पौराणिक कथा सांगितली. शिक्षक हर्षल कोठावदे यांनी बैलपोळ्याचे महत्त्व सांगितले. शिक्षक प्रतिनिधी अशोक शिरुडे यांनी बैलपोळा साजरा करण्यामागची पार्श्वभूमी सांगितली. याप्रसंगी विद्यार्थी शेतकरी वेशभूषेत तर विद्यार्थिनी नऊवारी साडीत शोभून दिसत होते. बैलपोळा निमित्त मिरवणूक काढण्यात आली. शेतकरी गीतावर चौथी फ व चौथी ग च्या विद्यार्थिनींनी नृत्य सादर केले. यशस्वीतेसाठी अशोक शिरुडे, उषा जोपळे, प्राजक्ता क्षीरसागर, हर्षल कोठावदे, क्रांती बोराटे, प्रतिभा बाविस्कर, मंगला बनकर आदींचे सहकार्य लाभले.

# मंत्री झिरवाळांनी कुटुंबासोबत साजरा केला पोळा



**दिंडोरी ।** वर्षभर शेतात बळीराजा बरोबर राबणाऱ्या सर्जा-राजाचा सण म्हणजे बैलपोळा. हा सण दिंडोरी शहरासह तालुक्यात उत्साहात साजरा करण्यात आला. बैलांची सायंकाळी गावातून मिरवणूक काढून मारुती मंदिरासमोर सलामी देवून त्यांना घरी आणून महिलांनी औक्षण करत पुरणपोळीचा नैवैद्य दाखवण्यात आला. यावेळी महाराष्ट्र राज्याचे अन्न औषध व प्रशासन तसेच सहाय्यक मंत्री नरहरी झिरवाळ यांनी आपल्या वनारे गावी पारंपारिक पोळा सण कुटुंबासोबत साजरा केला. शेतात राबताना बैल धन्याची सोबत कधी सोडत नाही. समृद्धीचे गाणे गाताना कधी थकत नाही. म्हणूनच बैलशक्तीच्या पूजेला भारतीय कृषिप्रधान संस्कृतीत वेगळे महत्त्व आहे. बळीराजा आपल्या 'सर्जा राजा' वर मनापासून प्रेम करतो. त्याच्या पाठीवरून प्रेमाने हात फिरवतो. अशा या बैलांप्रति कृतज्ञता व्यक्त करावी या भावनेतून शेतकरी दरवर्षी पोळा सण मोठ्या आनंदाने साजरा करतात. सकाळीच दुथडी भरून वाहणाऱ्या नद्या-नाल्यांतून बळीराजांनी आपल्या बैलांना न्हाऊ घातले. त्यानंतर दुपारी विविध रंग, सजावटीचे साहित्य वापरून, फुलांच्या माळा घालून बैलांना सजवण्यात आले. शेतकऱ्यांनी आपआपली बैले व अन्य जनावरे मिरवणुकीने गावातील ग्रामदैवताला नेत असल्याचे चित्र होते. शिंगाना बेगडे शेबे घालून तसेच आकर्षक रंगबिरंगी झुलीसुध्दा घालून सजवले होते. गतवर्षीच्या मानाने सजावटीच्या साहित्यामध्ये दहा ते बारा टक्के वाढ झाली आहे. मात्र, यावर्षी चांगला पाऊस झाल्याने सर्वत्र आनंदाचे वातावरण होते. त्यामुळे उत्साहाने बैलांना सजावटीसह रंगवून पारंपारिक पद्धतीने ढोल ताशाच्या पारंपारिक पद्धतीने बैलांची मिरवणूक काढण्यात आली होती. संध्याकाळी बैल वाजत गाजत आणुन त्यांना पुरणपोळी भरविण्यात आले. ग्रामीण भागात तर बैल नसलेल्या कुटुंबानी मातीच्या बैलाच्या मूर्तीची पुजा केली. यावेळी बैलांना नैवद्य दाखवून गोड पुरण पोळी खाऊ घातली. पोळा सण उत्साहात करण्यात आला.

## महत्त्वाचे

### मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाने रूग्णाला दिला आधार



**नाशिक ।** कोणत्या वयात कोणता आजार होईल सांगता येत नाही. अशा आजारांवर फार मोठ्या प्रमाणावर खर्च होतो. हा खर्च सर्वसामान्य गरीब रूग्णांना परवडण्यासारखा नसतो. त्यामुळे आर्थिक दुर्बल घटकांतील रूग्णांना आजारांवरील उपचारासाठी मुख्य सहाय्यता निधी कक्षाच्या वतीने आर्थिक मदत दिली जाते. जळगाव जिल्ह्यातील शिंदाड येथील यशोदा गोपाळ या रूग्णाला हृदयविकाराचा त्रास जाणवू लागला. त्यांना शस्त्रक्रियेसाठी नाशिक येथील विजन हॉस्पीटल हृदयविकार तज्ञ डॉ. विनोद विजन व डॉ. विक्रांत विजन यांच्या मार्गदर्शनाखाली शस्त्रक्रिया यशस्वी करण्यात आली. या शस्त्रक्रियेसासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाचे नाशिक जिल्हा समन्वयक डॉ. चैतन्य बैरागी यांचे मोलाचे लाभले. भाजप वैद्यकीय आघाडीचे नाशिक महानगरचे संयोजक अतुल धामणेंचे मोलाचे सहकार्य लाभले.

### रिक्षातून घरी जाणाऱ्या प्रवाशांची झाली लूट...

**मनमाड ।** दुपारच्या सुमारास रिक्षातून घरी जात असताना पिशवीत ठेवलेले एक लाख रुपयेची रोकड हि पिशवीसह चोरीस गेल्याने खळबळ उडाली असून याप्रकरणी मनमाड पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्ती विरोधात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी मनमाड पोलीस ठाण्यात निशाबाई महेंद्र जाधव,वय-५८,रा. कॅम्प नंबर एक, बारसे बिल्डिंग,मनमाड यांनी या घटनेची फिर्याद दिली आहे. दुपारी अडीच वाजेच्या सुमारास रेल्वे ओव्हर ब्रिज मनमाड येथे मुलगा सुनील असे दोघेजण रिक्षातून घरी जात असताना फिर्यादीच्या रिक्षाच्या पुढे एक ट्रक संथ वेगाने चालत असल्याने रिक्षा थोडी थांबली होती. तेव्हा कोणीतरी अनोखी इसमाने फिर्यादीच्या मांडीवर ठेवलेले पिशवी यामध्ये एक लाख रुपये,आधार कार्ड, पॅन कार्ड असे पिशवीसहित चोरून नेल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

### गिरीश अपसुंदे यांचे निधन



**एकलहरे ।** ओझर येथील व्यावसायिक गिरीश रंगनाथ अपसुंदे (४०) यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांचे पश्चात आई-वडील, भाऊ, बहिणी असा मोठा परिवार आहे. सहारा हॉस्पिटलचे संचालक डॉक्टर कैलास अपसुंदे यांचे ते धाकटे बंधू होते.

### इच्छाराम कोठावदे यांचे निधन



**नाशिक ।** येथील इच्छाराम कोठावदे यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या मागे तीन मुले, सुना, नातू, पंतू असा परिवार आहे. सचिन, परेश, पंकज यांचे ते वडील, तर लक्ष्मीकांत, जितेंद्र, अविनाश कोठावदे यांचे ते काका होत.

# 'मविप्र'च्या नियोजित विद्यापीठाचे संभाव्य फायदे व तोटे

नाशिक जिल्ह्यातील अग्रगण्य शैक्षणिक संस्था म्हटले की, मराठा विद्या प्रसारक समाजची संस्था डोळ्यासमोर येते. १९१४ साली कर्मवीर रावसाहेब थोरात व त्यांच्या सहकारी कर्मयोगींनी लावलेले रोपटे आता वटवृक्षात रुपांतरीत झालेले दिसत आहे. हे झाड फळा फुलांनी बहरून आले आहे. दोन लाखांपेक्षा जास्त विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. प्राथमिक शाळेपासून ते महाविद्यालय तसेच इंजिनिअरिंग कॉलेज, कृषी महाविद्यालय, लॉ कॉलेज, मेडिकल कॉलेज व इतर अनेक कोर्सेस सुरु असलेल्या संस्थेचे आता विद्यापीठ करण्याची सध्याच्या संचालक मंडळाची महत्वाकांक्षा असल्याचे दिसून येते. 'मविप्र'चे विद्यापीठ स्थापन करण्याचा मनोदय संचालक मंडळाने व्यक्त केला आहे. अर्थात महाराष्ट्र सरकारने अशा शैक्षणिक संस्थांना पुढाकार घेण्यासाठी प्रवृत्त केले आहे. कारण सरकारची आर्थिक स्थिती शिक्षणावर खर्च करण्यास कमी पडत आहे. तसेच अनेक कौटुंबिक शैक्षणिक संस्थांनी स्वअर्थसहाय्याच्या जोरावर स्वतःचे विद्यापीठ सुरू केले आहे. महाराष्ट्र सरकारने शैक्षणिक संस्थांना अनुदान देऊन शिक्षणाचा प्रसार केला आहे. तसेच भारत देशाच्या राज्यघटनेत मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी केंद्र व राज्य सरकारवर बंधनकारक आहे. तथापि, महाराष्ट्र सरकारने उच्च शिक्षणाचा विकास व अभिवृध्दी करण्याकरिता राज्यातील स्वयंअर्थसहाय्यीत खाजगी विद्यापीठांची स्थापना करण्याचा कायदा २०२३ मध्ये केला आहे. त्यानुसार राज्यातील अनेक शक्षैणिक संस्थांनी वरील कायद्याच्या अनुषंगाने आपापले विद्यापीठ सुरू केले आहे.

नाशिक जिल्हा मराठा विद्या प्रसारक शिक्षण संस्था (हल्लीचे संचालक मंडळ) देखील स्वयंअर्थसहाय्यीत खाजगी विद्यापीठाची स्थापना करण्याचा मनसुबा आखत आहे. परंतु हे पाऊल उचलण्यापुर्वी ही संस्था दर पाच वर्षांनी निवडणूक घेऊन नवीन संचालक मंडळाकडे कारभार सोपवत असते. म्हणून सर्व सभासदांना विश्वासात घेणे अपेक्षित आहे. कारण संस्थेच्या सभासदांना खाजगी विद्यापीठांची घटना काय आहे व ती कशी राबविण्यात येईल याची खात्री पटली पाहिजे हे अपेक्षित आहे. आता आपण सोप्या भाषते स्वयंअर्थसाहाय्यीत खाजगी विद्यापीठाची माहिती समजून घेऊ या. महाराष्ट्र सरकारने शैक्षणि क संस्थांना या कायद्यानुसार स्वतःच्या अर्थसहाय्याच्या जोरावर विद्यापीठ स्थापनेस परवानगी दिली आहे. त्याबाबतच्या तरतुदी खालील प्रमाणे आहेत. (१) प्रथम विद्यापीठाची स्थापना करण्यासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून अर्ज शुल्कासह शासनास सादर करावा लागतो. (२) अर्ज प्राप्त झाल्यानंतर महाराष्ट्र सरकार एक तज्ञ समिती नेमून प्रकल्प अहवालाची छाननी करील. (३) छाननी समितीचा अहवाल शासनाला उचीत वाटल्यास मुळ संस्थेला इरादापत्र देता येईल व विहीत नियमांच्या आधारे दान निधी उपलब्ध करावा लागेल. संस्थेची मालकी हक्क असलेली जागा व दस्तऐवज सादरीकरण करण्यात आल्यावर पुरेसा प्राध्यापक वर्ग व इतर कर्मचारी यांची हमी द्यावी लागेल. तसेच कर्मचारी व त्यांचा भविष्यनिर्वाह निधी स्थापन करण्याची हमी द्यावी लागेल. इतर अटी व शर्ती यांचे अनुपालन अहवालाची पडताळणी करण्यीसाठी शासन एक पडताळणी समिती नेमेल. (४) पडताळणी समितीचा अहवाल योग्य असल्याची शासनास खात्री पटल्यावर मुळ संस्थेला खाजगी विद्यापीठाचे नाव, ठिकाण, मुख्यालय याची पुर्तता केल्यावर राज्य विधिमंडळाद्वारे खाजगी विद्यापीठ स्थापन करण्यास शासन परवानगी देईल. (५) शासनाच्या परवानगी नंतर विद्यापीठाचा अध्यक्ष, कुलगुरू आणि नियामक मंडळ, व्यवस्थापन मंडळ व विद्यापरिषद यांचे सदस्य याबाबत माहिती घोषीत केली जाईल. (६) विद्यापीठाच्या परवानगी नंतर प्रायोजक मंडळ म्हणजे मुळ संस्था यांनी दिलेल्या हमीचे अनुपालन करीत आहे किंवा कसे याबाबत शासन सचिवस्तरीय समिती नेमेल व या समितीचा अहवाल योग्यरित्या प्राप्त झाल्यानंतर शासन परवानगी देणारी अधिसूचना शासकीय राजपत्रात प्रसिद्ध करील. (७) विद्यापीठाची उद्दिष्टे तयार करण्यात येतील. त्यानंतर विद्यापीठाचे अधिकार व कार्ये यांचा समावेश करण्यात येईल. (८) असे विद्यापीठ सर्वांसाठी खुले राहील, म्हणजे भारताच्या कोणत्याही नागरिकास, लिंग, वंश, पंथ, वर्ग, जात, जन्मस्थान किंवा धर्मश्रद्धा व व्यवसाय या कारणांवरून प्रवेश मिळवण्यापासून वगळण्यात येणार आहे. (९) असे विद्यापीठ स्थापन झाल्यावर त्यास शासनाकडून कोणत्याही स्वरूपाचे अर्थ साहाय्य मिळणार नाही. अशा वि द्यापीठास स्वतःचा निधी उपलब्ध करून विद्यापीठ चालवावे लागेल. (१०) विद्यापीठाचे अधिकारी पुढील प्रमाणे असतील. (अ) अध्यक्ष, जो विद्यापीठाचा कुलपती देखील असेल. (ब) कुलगुरू (क) विद्या शाखांचे अधिष्ठाते (ड) कुलसचिव (इ) मुख्य वित्त व लेखा अधिकारी (फ) परिक्षा नियंत्रक आणि विद्यापीठाचे अधिकारी व सेवेतील कर्मचारी यांचा समावेश असेल. (११) प्रायोजक मंडळ म्हणजे मुळ संस्था शासनाच्या मान्यतेने तीन वर्षांच्या कालावधीसाठी अध्यक्षाची नियुक्ती करील. (१२) विद्यापीठाची प्राधिकरणे म्हणजे कार्यकारी मंडळ (१) नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) (२) व्यवस्थापन मंडळ ( बोर्ड ऑफ मॅनेजमेंट) (३) विद्यापरिषद (अॅकेडमिक कौन्सिल) (४) परिक्षा मंडळ (५) विद्यापीठाची इतर प्राधि करणे. (अँथॉरिटीज) (१३) नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) यात पुढील सदस्यांचा समावेश असेल. (अ) अध्यक्ष (ब) कुलगुरू (क) मुळ संस्थेने नामनिर्देशित केलेल्या पाच व्यक्ती त्यांपैकी दोन ख्यातनाम शिक्षणतज्ज्ञ असतील. (ड) अध्यक्षाने नामनिर्देशित केलेला विद्यापीठाच्या बाहेरील व्यवस्थापन किंवा माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील एक तज्ज्ञ व्यक्ती (इ) राज्य शासनाने नामनिर्देशित केलेल्या दोन व्यक्ती (फ) अध्यक्षाने नामनिर्देशित करावयाच्या उद्योग क्षेत्रातील दोन व्यक्ती (ग) विद्यापीठाचा कुलसचिव (रजिस्टर) कायमस्वरूपी निमंत्रित असेल पण त्याला मत देण्याचा अधिकार असणार नाही. नियामक मडंळ वर्षातून तीन वेळा बैठका घेईल./तसेच या मंडळाची गणपूर्ती पाच इतकी असेल. (१४) नियामक मंडळ (गव्हर्निंग बॉडी) हे विद्यापीठाचे सर्वोच्च प्राधिकरण असेल. या मंडळाला निर्णय घेण्याचे सर्व अधिकार असतील. त्याबाबत कायद्यात उल्लेख केला आहे. (१५) व्यवस्थापन मंडळ (बोर्ड ऑफ मॅनेजमेंट) पुढील सदस्य असतील. (१) कुलगुरू (२) मूळ संस्थेने नामनिर्देशित केलेले नियामक मंडळाचे दोन सदस्य (३) कुलगुरू ने आळीपाळीने नामनिर्देशित करावयाचे विद्याशाखांचे दोन अधिष्ठाते (४) मूळ संस्थेने नामनिर्देशित केलेल्या नियामक मंडळाच्या सदस्य नसलेल्या तीन व्यक्ती (५) मुळ संस्थेने अध्यापकांमधून नामनिर्देशित केलेल्या तीन व्यक्ती. (१६) कुलगुरू व्यवस्थापन मंडळाचा अध्यक्ष असेल. व्यवस्थापन मंडळ दर दोन महिन्यातून एकदा बैठक बोलावतील. तसेच बैठकीची गणपूर्ती पाच इतकी असेल. व्यवस्थापन मंडळाचे अधिकार व कार्ये नियमात दिले आहेत. (१७) विद्यापरि षदेमध्ये कुलगुरू व इतर सदस्य असतील. तसेच या परिषदेचा कुलगुरू पदसिद्ध अध्यक्ष असेल. हे मंडळ अधिनियमाच्या तरतूदींना अधीन राहून कार्य करील. (१८) परिक्षा मंडळात पुढील सदस्यांचा समावेश असेल. (१) कुलगुरू अध्यक्ष (२) प्रत्येक विषयाचा प्राध्यापक सदस्य (३) एक मुल्यमापन तज्ज्ञ स्वीकृत सदस्य (४) परिक्षा नियंत्रक सदस्य सचिव परिक्षा मंडळाचे अधिकार व कार्ये नियमानुसार असतील. (१९) विद्यापीठास प्रवेश शुल्क व इतर परिक्षा शुल्क ठरविण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात येईल. तसेच अवाजवी फी घेता येणार नाही. तसेच नफेखोरी करता येणार नाही. यावर शासनाचे निर्बंध असतील. त्याचप्रमाणे मागासवर्गीय विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्यानंतर शासन कोणत्याही परिस्थितीत आर्थिक सहाय्य करणार नाही. (२०) अतिशय महत्त्वाचा मुद्दा म्हणजे स्वायत्त विद्यापीठाला कॅपीटेशन शुल्क (नेमून दिलेल्या फी व्यतिरिक्त जादा फी ) घेण्यास मनाई आहे. अशा प्रकारे कोणी तक्रार केल्यास शासन दखल घेईल व योग्य ती कारवाई करेल. (२१) विद्यापीठाचे कामकाजावर निरिक्षण करण्याचे शासनाचे अधिकार असतील. (२२) विद्यापीठाचे कामकाज व्यवस्थीत न चालल्यास अगर तक्रारी आल्यास किंवा नियमांचे उल्लंघन झाल्यास मूळ संस्थेला विद्यापीठ विसर्जन करता येईल. (२३) विवक्षित परिस्थितीमध्ये राज्य शासनाचे विशेष अधिकार असतील. त्यानुसार शासन योग्य ती कारवाई करेल. (२४) विद्यापीठाच्या कायद्याचे उल्लंघन केल्यास संबंधितांवर कारवाई केली जाईल व किमान एक वर्षापर्यंत कारावासाची शिक्षा केली जाऊ शकते किंवा पन्नास हजार अथवा पन्नास हजारांपासून पाच लाखांपर्यंत द्रव्य दंड केला जाऊ शकतो.

**फायदे :** स्वयं अर्थसाहाय्यित खाजगी विद्यापीठांना वेगवेगळे शैक्षणिक प्रयोग करणेस किंवा कोर्सेस सुरु करण्यास स्वातंत्र्य दिले आहे. विद्यापीठाला आपला अभ्यासक्रम ठरविणेचा पूर्ण अधिकार असेल. परिक्षा घेणे व पदवीप्रदान समारंभ आयोजित करणे, यासाठी शासनाच्या परवानगीची गरज राहणार नाही.

**तोटे :** आर्थिक जबाबदारी वाढेल. विद्यापीठ चालविणेस गुणवत्ता ठेवली नाही तर विद्यार्थी संख्या घटेल. पर्यायाने संस्थेचे व विद्यापीठाचे अस्तित्व धोक्यात येईल. तसेच तज्ज्ञ शिक्षकांवर अवलंबून राहून त्यांना ते मागतील तेवढे वेतन द्यावे लागेल. तसेच भविष्य निर्वाह निधी व इतर देय्य रकमा देण्यास विद्यापीठ सक्षम नसल्यास भविष्यात असे विद्यापीठ धोक्यात येऊ शकते. एवढेच नव्हे तर गैरकारभार वाढू शकतो. म्हणजे लोभापायी डिग्री विकली जाऊ शकते. कारण असे प्रकार इतर काही विद्यापीठात घडल्याचे निष्पन्न झाले आहे. खोट्या प्रमाणपत्राच्या आधारे नोकरी जाऊन शिक्षा झाल्याचे दिसून येते. मनमानी कारभार होऊ शकतो.

**धोके :** 'बहुजन हिताय बहुजन सुखाय' या कर्मवीरांनी घालून दिलेल्या मंत्रापासून लांब जाऊ शकतो. गोरगरिबांना आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षण मिळणार नाही. कारण आपल्या संस्थेच्या अनेक शाळांना खोल्या कमी पडतात. विद्यार्थ्यांना स्वच्छतागृह बांधली जात नाहीत. खेड्यापाड्यातील मुलांना शिक्षणासाठी आपल्या संस्थेकडून त्यांच्या पालकांना फार अपेक्षा आहेत. सद्यस्थितीत आपल्या संस्थेने स्वयं अर्थसाहाय्यित खाजगी विद्यापीठाची स्थापना करण्यात पुढाकार घेऊ नये असे वाटते. एवढेच नव्हे तर विद्यापीठाला कोणाचे नाव द्यायचे यावरून वाद होऊ शकतो. तसेच विद्यापीठावर कोणाची नियुक्ती करायची यासंदर्भा त वादविवाद होऊ शकतात. आर्थिक गैरव्यवहार वाढू शकतील. मराठा समाजाच्या या संस्थेला गालबोट लागू नये म्हणनू दक्षता घेतली पाहिजे. मूळ संस्थेचे नियत्रंण विद्यापीठावर राहणार नाही. कारण संस्थेचे पदाधिकारी फक्त तीन ते चार असतील. बाकी सर्व तज्ज्ञ व्यक्ती व शासनाचे नियुक्त प्रतिनिधी असतील. बहुमत कमी पडल्यास इतर सदस्य गैरफायदा घेतील याची शक्यता नाकारता येणार नाही. विशेष उल्लेख करावासा वाटतो तो म्हणजे आपले कृषी महाविद्यालय नाशिक शहरापासून लांब अंतरावर असल्याने तेथे महाविद्यालय चालविणे अवघड झाले आहे. या कृषी महाविद्यालयावर खर्च फारच झाला असून त्याचा हवा तेवढा फायदा झाला नाही. असे असतानांही खाजगी विद्यापीठाची स्थापना करणे अयोग्य वाटते. तसेच जर कार्यकारी मंडळ निवडणुकीत पराभूत झाले तर विद्यापीठावर गेलेले प्रतिनिधी त्यांचे पद सोडणार नाहीत. जोपर्यंत त्यांचा विद्यापीठावरील कार्यकाळ संपत नाही तोपर्यंत पद सोडणार नाही. संघर्ष सुरू होईल. तसेच आपल्या संस्थेला घटनेत बदल करावा लागेल. कारण विद्यापीठाची घटना व संस्थेची घटना यामध्ये विरोधाभास निर्माण होईल. ते सुसंगत ठेवण्यासाठी दोन्ही घटनेमध्ये सुसुत्रता आणणे आवश्यक आहे. खाजगी कुटुंबांच्या शैक्षणिक संस्थांना हा प्रश्न पडत नाही परंतू म.वि. प्र. संस्थेचे निवडणुकीवर परिणाम होऊ शकतो. मविप्र संस्थेचे सभासदांना विश्वासात घेऊन खात्री पटवून दिल्याशिवाय घाईघाईने स्वायत्त विद्यापीठाचा निर्णय घेणे अयोग्य आहे.



**- लेखक : श्री. संतोष गटकळ (वकील व जेष्ठ सभासद, मविप्र शिक्षण संस्था, नाशिक)**

## महत्त्वाचे

### आदर्श इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये बैलपोळा साजरा

**वणी ।** वणी येथील म. वि. प्र. संचलित आदर्श इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये बैलपोळा सण मोठ्या उत्साहात आणि पारंपरिक पद्धतीने



साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या मुख्याध्यापिका एस. डी. काळे यांच्या हस्ते मातीच्या बैलांच्या पूजनाने झाली. यानंतर इयत्ता सातवीतील विद्यार्थी प्रथमेश चौधरी, तसेच पाचवीतील विद्यार्थिनी छाया खरोटे आणि वेदश्री फसाळे यांनी बैलपोळा या सणाचे भारतीय संस्कृतीतील महत्त्व विशद केले. त्यांनी आपल्या भाषणातून शेतकरी व बैल यांच्यातील अतूट नाते आणि शेतीतील बैलांचे योगदान याविषयी माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इयत्ता सातवीतील धीरज ठाकरे याने केले. या प्रसंगी शाळेतील सर्व शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रम आनंददायी व संस्कृतीमय वातावरणात पार पडला.

### 'वारसा हक्क व वैयक्तिक कायदे' विषयावर अ‍ॅड. जायभावेंचे व्याख्यान



**नाशिक ।** मविप्र संस्थेच्या विधी महाविद्याल यात नाशिक बार असोसिएशन च्या सहाय्याने "अ‍ॅड. बाबुराव ठाकरे स्मृती अभिमुखता सप्ताह – ड्राफ्टिंग, कन्फेहेयन्सिंग अँड टायटल" दिनांक १९ ऑगस्ट ते २६ ऑगस्ट या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे. या व्याख्यानमालेतील तिसरे सत्र बुधवार, २१ ऑगस्ट रोजी पार पडले. या सत्रात "हिंदू व मुस्लिम वारसाहक्क तसेच इतर वैयक्तिक कायदे" या विषयावर अ‍ॅड. जयंत जायभावे (सदस्य, महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिल), अ‍ॅड. भास्करराव चौरे आणि अ‍ॅड. नंदकिशोर भुतडा यांनी संयुक्तरीत्या सखोल मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना वारसा हक्कातील कायदेशीर तरतुदी, पूर्वजांची मालमत्ता वाटप, आणि वैयक्तिक कायद्यांचे महत्त्व याविषयी उपयुक्त व बारकावेवार माहिती दिली गेली. हा सत्र कायदा विद्यार्थ्यांना प्रशिक्षण आणि व्यावसायिक तयारीसाठी उपयुक्त ठरल्याचे महाविद्यालयातर्फे सांगण्यात आले. या कार्यक्रमास प्राचार्या डॉ. संध्या टी. गडाख तसेच शिक्षकवृंद उपस्थित होते.

### प्रहार दिव्यांग संघटनेचे अतिक्रमण उपयुक्तांना निवेदन

**नाशिक ।** नाशिक महानगरपालिका हद्दीत किरकोळ वस्तुंची विक्री करून शारीरिक आव्हाने असलेले दिव्यांग उदरनिर्वाह चालवतात; परंतु त्यांना अतिक्रमण निर्मूलन पथकाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळणे आवश्यक आहे. यासाठी प्रहार दिव्यांग संघटनेच्यावतीने मनपा अतिक्रमण उपायुक्त सुवर्णा देखणे यांना निवेदन



देण्यात आले. बेरोजगार दिव्यांग युवक-युवतींना स्वावलंबी जीवन जगण्यासाठी मनपाकडून जागा उपलब्ध करून देण्यात यावी, अशी मागणीही या वेळी करण्यात आली. शारीरिक व्यंगावर मात करून कोणापुढेही हात न पसरवता जिद्दीने संघर्ष करून समाजापुढे आदर्श निर्माण करणा-या दिव्यांग घटकांस मनपा प्रशासनाने सहकार्य करावे, असे निवेदनात म्हटले आहे,. या प्रसंगी प्रहार दिव्यांग संघटनेचे जिल्हाध्यक्ष ललित पवार, कार्याध्यक्ष बबलुलू मिर्झा, सरचिटणीस दिपक भोई उपस्थित होते.

### सकल आदिवासी समाजाचा आज उलगुलान जनआक्रोश मोर्चा

**नाशिक ।** बाह्यश्रोत हटाव, आरक्षण बचाव यासह विविध मागण्यासाठी सकल आदिवासी समाजाच्या वतीने आज सोमवारी आदिवासी विकास आयुक्तालयावर जनआक्रोश मोर्चा काढण्यात येणार आहे. शासनाकडून आदिवासी आश्रमशाळेतील वर्ग ३ व ४ च्या रोजंदारी कर्मचाऱ्यांची सेवा समाप्त करण्यात आली असून गेल्या ४६ दिवसांपासून या कर्मचाऱ्यांचे आदिवासी आयुक्तालयासमोर बिऱ्हाड आंदोलन सुरु आहे. परंतु अद्याप याप्रश्नी कोणताच तोडगा निघू शकला नाही. यामुळे बिऱ्हाड आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी तसेच विविध मागण्यासाठी हा जनआक्रोश मोर्चा काढण्यात येणार आहे. यात राज्यातील २२ आदिवासी संघटनासह आदिवासी समाजातील ग्रामस्थ आणि लोकप्रतिनिधी सहभागी होणार आहे. बाह्यश्रोत भारती रद्द करून रोजंदारी कर्मचाऱ्यांना पुन्हा सेवेत घ्यावे, रोजंदारी वर ४ च्या कर्मचाऱ्यांचे मृत संवर्गातील पदे तात्काळ जीवित करणे, रखडलेली पेसा भरती सुरु करणे, सेंट्रल किचन योजना रद्द करून पूर्वीप्रमाणे आश्रम शाळेत भोजन व्यवस्था सुरु करणे,वनाधिकार कायदयाची अंमलबाजवणी करणे आदी मागण्यांसाठी हा मोर्चा काढण्यात येणार आहे.

# विद्यमान सरचिटणीसांनी विद्यापीठ स्थापन करतांना कार्यकारी मंडळाला ठेवले अंधारात

## मविप्र संस्थेतील सावळा गोंधळ उघड!

**नाशिक ।** नाशिक जिल्हा मराठा विद्या प्रसारक शिक्षण संस्था म्हणजे मराठा समाजाचा जिव्हाळ्याचा विषय. परंतु हीच संस्था कार्यकारी मंडळाला अंधारात ठेवून परस्पर विद्यापीठ स्थापनेचा निर्णय घेत असेल, तर दाद कुणाकडे मागायची? विद्यमान सरचिटणीसांनी तो कटू निर्णय घेतल्याने सभासदांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. संस्थेतील हा सावळागोंधळ सभासदांपर्यंत पोहोचला असून विद्यापीठ स्थापनेस प्रचंड विरोध होऊ लागला आहे. आता याबाबतची संपूर्ण माहिती सभासदांना कळविण्याची जबाबदारी आपण स्वीकारली असल्याची माहिती मविप्रचे ज्येष्ठ सभासद बाळासाहेब कोल्हे यांनी आज पत्रकार परिषदेत दिली

नाशिक येथे आज झालेल्या भरगच्च पत्रकार परिषदेत विद्यमान सरचिटणीसांनी घातलेला सावळा गोंधळ स्पष्ट करताना श्री. कोल्हे म्हणाले की, खाजगी विद्यापीठ म्हणजे काय ? संस्थेशी त्याचा संबंध काय ? याबाबतची माहिती सभासदांपर्यंत पोहोचलेलीच नाही. खाजगी विद्यापीठ कोण स्थापन करू शकतात? ही विद्यापीठे सोसायटी कायद्याखाली नोंदणी असलेली संस्था किंवा सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था असलेली संस्था याशिवाय कंपनी कायद्यानुसार स्थापन केलेली कंपनी स्थापन करू शकते. उदाहरणार्थ अंबानींची रिलायन्स कंपनी किंवा अदानींची कंपनी होय. यातून काय अर्थबोध होतो? हे सभासदांनी लक्षात घेतले पाहिजे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे संस्थेने एकदा विद्यापीठ स्थापन केले की, विद्यापीठात निवडणूक होत नसते व भविष्यातही कधीच होत नाही. या विद्यापीठात फक्त अध्यक्षांची निवड प्रथम केली जाते व तोच तहयात विद्यापीठाचा मालक बनून जातो. अध्यक्षांना त्या पदावरून काढण्याचे कुठलेही अधिकार संस्थेस अथवा संस्थेच्या संचालकांना व सभासदांना नाहीत. उदाहरणार्थ स्वर्गीय पतंगराव कदम यांचे भारती विद्यापीठ होय. तसेच त्यांना म्हणजेच अध्यक्षांना पाच पदे नियुक्त करण्याचा अधिकार आहे. अध्यक्षांसह कुलगुरू, अधिष्ठाता (डीन), कुलसचिव, मुख्य वित्त लेखाधिकारी, परीक्षा नियंत्रक व विद्यापीठाच्या क्षेत्रातील एक व्यक्ती. सर्वात महत्त्वाचे म्हणजे मविप्र संस्था वरील पदे कुठल्या अधिकारानुसार भरणार? त्यांच्याकडून एकदा का ठराव करून अध्यक्ष निवडल्यास अध्यक्षांना कधीही काढता येणार नाही. याचाच अर्थ ही संस्था आता एकाधिकारशाहीचा प्रवास करू लागली आहे.



सभासद व संस्थेतील संचालक मंडळाचे अधिकार संपुष्टात येणार आहे. एकदा ठराव केला तर तोच अध्यक्ष पुढील शासनाची परवानगी घेऊन स्वतःच पुढील नियुक्तीबद्दल निर्णय घेतो. धर्मदाय आयुक्त व कार्यकारी मंडळाचे अधिकार या विद्यापीठाला लागू होत नाही. म्हणून मराठा विद्या प्रसारक शिक्षण संस्थेला अशा प्रकारचे विद्यापीठ स्थापना करता येणार नाही. सभासदांना आपण आवाहन करतो की, यासाठी कडाडून विरोध करावा. विद्यापीठाच्या नावाखाली नाशिक जिल्ह्यातीलच केकेडब्ल्यू सारखी शिक्षण संस्था होऊ देऊ नका. तसे झाल्यास ही संस्था एका परिवाराचीच होऊन जाते. मिळालेल्या माहितीनुसार कार्यकारी मंडळाला विद्यापीठ पाहायला पाठविण्यात आले होते. पण विद्यापीठ कोण चालवणार, याची कार्यकारी मंडळाला साधी कल्पना देखील देण्यात आलेली नव्हती. आपलीच कार्यकारिणी तेथे राहील असे मोघम उत्तर देण्यात आले होते. राजपत्र असाधारण भाग चार व असाधारण क्रमांक नऊ ही खाजगी विद्यापीठाची नियमावली सभासदांनी वाचून घ्यावी. विद्यापीठ होणारा ठराव रद्द करण्यासाठी जिल्हाभर आंदोलन करण्यासाठी सभासदांनी सहकार्य करावे. मविप्रतिल सावळा गोंधळ लवकरच हाणून पाडण्यासाठी जिल्हाभर आंदोलन करण्यात येईल, असेही श्री बाळासाहेब कोल्हे यांनी सांगितले.

# सिव्हिल सर्जनला मॅटचा दणका

## बडतर्फ कर्मचाऱ्याला कामावर घेण्याचे मॅटचे आदेश




**नाशिक ।** विविध कारणांनी वादात सापडलेल्या सिव्हिल सर्जन यांना मॅटने दणका दिला असून बडतर्फ कर्मचारी मिलिंद पवार यांना जिल्हा रुग्णालयात पुनर्नियुक्ती करण्याचे आदेश महाराष्ट्र प्रशासकीय प्राधिकरण (मॅट) ने शुक्रवारी (दि.२२) जिल्हा शल्यचिकित्सकांना दिले आहेत. शिवाय, बडतर्फ केलेल्या तारखेपासून ते आजअखेर एकूण वेतनातील ५० टक्के रक्कम परत करण्याचेही आदेश मॅटने दिले आहेत. मॅटच्या या निर्णयामुळे सिव्हिल सर्जन चारुदत्त शिंदे यांच्या कारभाराला चपराक बसली आहे. शासनाची फसवणूक करत बनावट जात प्रमाणपत्राआधारे जिल्हा शासकीय रुग्णालयात सफाईगार पदाची नोकरी मिळवल्याप्रकरणी जुलै २०२५ मध्ये सरकारवाडा पोलीस ठाण्यात तीन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुख्य प्रशासकीय अधिकारी व्हि. डी. पाटील, जिजाबाई मुरलीधर गायकवाड, मिलिंद सतीश पवार यांच्यावर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र, आता मॅटने दिलेल्या निर्णयामुळे मिलिंद पवार यांना दिलासा मिळाला आहे. संशयित जिजाबाई गायकवाड या सिव्हिलमध्ये सफाईगार म्हणून कार्यरत होत्या. त्या ३१ मे २०१० रोजी सेवानिवृत्त झाल्या. त्यांनी १२ फेब्रुवारी २०१८ रोजी त्यांच्या जागी सफाईगार म्हणून पवार यास सेवा करण्याची संधी मिळणेबाबत विनंती अर्ज केला होता. अर्जानुसार मुख्य प्रशासकीय अधिकारी व्ही.डी पाटील यांनी टिपणी तयार करून सिव्हिल सर्जन, नाशिक यांचे आदेशाकरिता सादर केली. त्यानुसार मे २०१८ रोजी पवार यांची लाडपागे समितीच्या आधारे सफाईगार पदावर (वर्ग ४, गट ड सफाईगार) नेमणुकीबाबत जिल्हा शल्य चिकित्सक यांचे आदेश झाले. सदर आदेशास अधिन राहून पवार हे सफाईगार म्हणून कर्तव्यावर रूजू झाले. मात्र, पवारांनी बनावट जातीच्या प्रमाणपत्राव्दारे नोकरी मिळवल्याचे सांगत त्यांना बडतर्फ करण्यात आले. याप्रकरणी ते मॅटमध्ये गेले. मॅटने आता पवार यांच्या बाजूने निकालआहे.

# भर रस्त्यात कंटेनर उभा राहिल्याने इंदोर-पुणे राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक ठप्प





**मनमाड ।** नेहमीच वर्दळीचा महामार्ग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इंदूर - पुणे राष्ट्रीय महामार्गावरील मनमाड नजीक असलेल्या गोरख नगर जवळील आंबेवाडी फाट्याजवळ शनिवारी पहाटे एक अवजड कंटेनर नियंत्रण सुटल्याने रस्त्याच्या कडेला खड्ड्यात उतरल्याने या मार्गावरची वाहतूक मोठ्या प्रमाणावर ठप्प झाली. वाहनांच्या प्रचंड रांगा लागल्या आणि नागरिकांना आणि वाहन चालकांना मनस्ताप सहन करावा लागला.

याबाबतची माहिती अशी की,शनिवारी पहाटे याच राष्ट्रीय महामार्गावर मनमाड नजीक असलेल्या गोरख नगर जवळील आंबेवाडी फाटा येथे पहाटे पाचच्या सुमाराला मनमाड होऊन येवला कडे जाणाऱ्या अवजड अवजड कंटेनरचे नियंत्रण सुटल्याने हा अवजड कंटेनर रस्त्याच्या कडेला खड्ड्यात उतरला. अर्धा कंटेनर खड्ड्यात आणि अर्धा कंटेनरचा भाग महामार्गावर आल्याने दोन्ही बाजूने मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी निर्माण झाली. यामुळे महामार्गावरील दुतर्फा वाहनांच्या प्रचंड मोठ्या रांगा लागल्या. त्यामुळे चाकरमाने,नोकरदार, विद्यार्थी,व्यापारी बाहेरगावी जाणाऱ्या प्रवाशांचे मोठे हाल झाले.

> इंदूर-पुणे या राष्ट्रीय महामार्गावर वाहनांची मोठी वर्दळ असल्याने दळणवळणाच्या दृष्टीने हा मार्ग अत्यंत महत्त्वाचा आहे. पण या महामार्गाला बायपास किंवा अन्य रस्ता नसल्याने छोटे-मोठे अपघात झाल्यानंतर नेहमीच वाहतूक कोंडी होवून मनमाड शहरवासीयांना याचा मोठा त्रास सहन करावा लागतो.

मनमाड शहरातून जाणाऱ्या इंदूर-पुणे या राष्ट्रीय महामार्गावर नेहमी छोटे मोठे अपघात होऊन वाहतुकीत कोंडी होत असते. वाहन चालक आणि नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागतो. हे नित्याचे झाले आहे. विशेषता गेल्या काही महिन्यापासून वारंवार असे प्रकार सातत्याने उद्भवत आहे. त्यामुळे या मार्गावरून वाहतूक करणे म्हणजे दिव्य परीक्षा ठरत आहे.

# सप्तश्रृंग गडावर नवरात्रोत्सव आढावा बैठक

**सप्तशृंग गड ।** नवरात्रोत्सव जवळ आल्याने सुरू असलेली विकासकामे वेळेत पूर्ण करण्याबरोबरच भाविकांसाठी आवश्यक सोयी-सुविधांचे आतापासूनच काळजीपूर्वक नियोजन करा, अशा सूचना सहायक जिल्हाधिकारी आकुनरी नरेश यांनी तालुका प्रशासन, देवी ट्रस्टसह रोपवे प्रशासन संबंधित विभागांना केल्या. सप्तशृंगगड येथे मंगळवारी (दि.१९) नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी नरेश यांच्या उपस्थितीत विविध विभागांची आढावा बैठक संपन्न झाली.



> नांदुरी ते सप्तशृंगगड या दहा किलोमीटरच्या घाटरस्त्याचे कॉंक्रिटीकरण व संरक्षण भिंतीचे काम सुरू आहे. याचा त्रास एसटी व खासगी वाहनांना होऊ शकतो तसेच विविध ठिकाणी अर्धवट रस्ता असल्याने यात्रा उत्सव काळात मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होऊ शकते. त्यामुळे रस्त्याचे काम लवकरात लवकर करावे.- **संदीप बेनके, उपसरपंच, ग्रा. पं. सप्तशृंग गड**

नवरात्रोत्सव पुढील काही दिवसांत साजरा होत असून, यानिमित्त देशभरातून भाविक देवी दर्शनासाठी गडावर येणार असल्याने या काळात भाविकांची कोणत्याही प्रकारची गैरसोय होऊ नये, यासाठी प्रशासनाकडून आतापासून तयारी सुरू करण्यात आली आहे. या तयारीचा आढावा यावेळी घेण्यात आला. नवरात्रोत्सव काळात भाविकांच्या गर्दीचा विचार करून ग्रामपंचायत, ट्रस्ट व रोपवे प्रशासनाने स्वच्छतेवर विशेष भर द्यावा, असे निर्देश यावेळी तहसीलदार रोहिदास वारुळे यांनी दिल्या. यावेळी ग्रामस्थांनी रोप वे प्रशासनाच्या कारभारावर प्रश्न उपस्थित करत वर्षभरात प्लास्टिकबंदी व स्वच्छतेसंदर्भात कोणतीही कार्यवाही केली नसल्याचा आरोप करत सीएसआर फंडांतर्गत स्वच्छतेच्या उपाययोजना का होत नाहीत? तसेच रोप वे कार्यालयाचे ऑडिट करावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली. यात्रा काळात नांदुरी- सप्तशृंगगड दरम्यान एस.टी. महामंडळाच्या अतिरिक्त बसफेऱ्या सोडण्याचे नियोजन करण्यात आले आहे. नवीन प्रकारातील वाहने, क्रेन तसेच आपत्कालीन व्यवस्थेची तयारी ठेवण्याचे आदेशही देण्यात आले. बसचालक अनुभवी असावेत आणि बसची तांत्रिक तपासणी करूनच त्या सोडण्यात याव्यात. घाटमार्गाच्या दुरुस्तीचे काम वेळेत पूर्ण करून भाविकांची गैरसोय टाळावी, अशा सूचनाही यावेळी देण्यात आल्या. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र, दवाखाने सज्ज ठेवणे, पुरेसा औषधसाठा ठेवण्याचे आदेश देण्यात आले.

# ओझरमध्ये प्रदोषनिमित्त भगवान बाणेश्वरांची मुकुट मिरवणूक उत्साहात

**ओझर ।** निष्काम कर्मयोगी जगदगुरु जनार्दन स्वामी महाराजांचे उत्तराधिकारी अनंत विभूषित जगदगुरु स्वामी शांतिगिरीजी मौनगिरीजी महाराज यांनी ओझर येथे निर्माण केलेल्या देवभूमी जनशांती धाम येथे प्रदोष निमित्त अभिषेक पूजन, सत्संग संपन्न झाला. जनशांती धाम व परिसरातील विविध उपनगरांमध्ये भगवान श्री बाणेश्वर महादेवाची लक्षवेधी मुकुट मिरवणूक उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली.विधी पाठ, सत्संग, महाप्रसाद व महाआरतीने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



निष्काम कर्मयोगी शिवयोगी जगदगुरु जनार्दन स्वामी महाराज धर्मपीठाचे पिठाधीश्वर अनंत विभूषित जगदगुरु स्वामी शांतीगिरिजी मौनगिरीजी महाराज यांच्या संकल्पनेतून ओझर येथे निर्माण करण्यात आलेल्या देवभूमी जनशांती धाम येथे प्रदोष उत्सव मोठ्या भक्तिपूर्ण वातावरणात संपन्न झाला. या सोहळ्याच्या प्रारंभी अभिषेक पूजन संपन्न झाले. भारत येवला, प्रवीण वाघ, विजय वाघ, शाम येवला, विनय बोरा, प्रशांत येवला, भोलू येवला, संजय पगार, हरिभाऊ माहेश्वरी, दयानंद महाराज, पंडीत किरण गुरु लाडसावंगीकर यांसह आश्रमीय सर्व समिती व कमिटी सदस्य उपस्थितीत होते. यावेळी जगदगुरु जनार्दन स्वामी मौनगिरीजी महाराज यांच्या श्री मूर्तीचे पूजन व पाद्य पूजन संपन्न झाले. महाअभिषेक नंतर सायंकाळी शिव मुकुट मिरवणुक संपन्न झाली. मिरवणुकीत महिला मातांचा मोठ्या संख्येने सहभाग होता.

यावेळी संत, अतिथी व ब्राम्हण पूजन संपन्न झाले. सत्संग, महाप्रसाद व महाआरतीने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. यावेळी जगदगुरु स्वामी शांतिगिरीजी महाराज यांनी निर्माण केलेल्या देवभूमी जनशांती धाम येथे देव दर्शनासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली.जय बाबाजी, जय बाणेश्वर अशा जयघोषाने परिसर दुमदुमून गेला होता.सोहळा यशस्वितेसाठी जय बाबाजी भक्त परिवाराने परिश्रम घेतले.

# नाशिक महापालिकेची प्रभाग रचना जाहीर

**नाशिक ।** आगामी होऊ घातलेल्या नाशिक महापालिकेच्या निवडणुकीसाठी राज्य शासनाच्या सूचनेनुसार नाशिक महापालिकेने शुक्रवारी (दि. २२) रात्री उशिरा प्रभाग रचना जाहीर केली. या प्रभाग रचनेनुसार एकूण शहरात २१ प्रभाग असतील. त्यामध्ये २९ प्रभाग हे चार सदस्यांचे तर दोन प्रभाग हे तीन सदस्यांचे राहणार आहेत. १२२ नगरसेवकांसाठी पंचवार्षिक निवडणुका होऊ घालणार आहेत.



प्रभाग रचनेबाबत नागरिकांमध्ये मोठ्या प्रमाणात संभ्रम होता. प्रभाग रचना जाहीर झाल्याने हा संभ्रम दूर झाला आहे. राज्य शासनाने केलेल्या सूचनेनुसार नाशिक महापालिकेने ही प्रभाग रचना जाहीर केली. ही प्रभाग रचना जाहीर करताना सण २०१७ मध्येच तयार करण्यात आलेली प्रभाग रचना कायम ठेवण्यात आली आहे. बहुसदस्य प्रभाग रचना महायुतीला त्यातल्या त्यात भाजपला फायदेशीर असल्याची नागरिकांत खमंग चर्चा असून त्यासाठीच २०१७ ची प्रभाग रचना जेसे थे ठेवण्यात आल्याची चर्चा नागरिकात रंगली आहे. या निवडणुकीसाठी नवीन प्रभाग रचना होणार, आहे तीच कायम राहणार, चार ऐवजी तीन सदस्य प्रभाग रचना राहणार, एक सदस्य प्रभाग करणार अशा एक ना अनेक चर्चांचे फुटलेले पेव प्रभाग रचना जाहीर झाल्याने थंडावले आहे. आता सारेच निवडणुकीसाठी कंबर कसून कामाला लागणार असून, सारांच्या नजरा महापालिकेवर एकवटणार आहेत.

## सन २०१७ ची प्रभाग रचना 'जैसे थे'

सन २०१७ ची आरक्षण स्थिती पुढीलप्रमाणे होती. त्यामध्ये एकूण जागा १२२ होत्या. त्यामध्ये सर्वसाधारण जागा ६२, इतर मागासवर्ग जागा ३३ अनुसूचित जाती जागा १८, अनुसूचित जमाती जागा ९ आणि महिला आरक्षण६१ जागा याप्रमाणे आरक्षण स्थिती होती. दिवाळीनंतर साधारणपणे निवडणुकीचे फटाके फुटतील असा कयास बांधला जात आहे. त्यामुळे दिवाळीनंतर राजकीय दिवाळी शहरात साजरी होताना दिसेल. यंदाची निवडणूक सर्वच राजकीय पक्षांनी अस्मितेचा मुद्दा केली आहे. भाजपने हंड्रेड प्लसचा नारा देत सत्तेची चावी पुन्हा आपल्याकडे ठेवण्यासाठी तयारी चालवली आहे. दोन्ही शिवसेनेने महापालिकेवर आमचा झेंडा राहील अशी हाळी देत तयारी चालवली आहे. दोन्ही राष्ट्रवादी, मनसे आणि काँग्रेससह छोटे-मोठे राजकीय पक्ष संघटनांनी कंबर कसली असून, महापालिकेची दिशेने त्यांची निवडणुकीसाठी पावले पडू लागली आहेत.

# 'गिरा तो भी टांग उपर' !

एप्रिल महिन्यात सुरू झालेला उध्दव आणि राज ठाकरे या दोन्ही भावांमधील 'युती'बाबत सुरू असलेला 'खो-खो'चा खेळ अखेर उध्दव ठाकरेंच्या वाढदिवसाच्या मुहूर्तावर संपला. तब्बल १९ वर्षांनी राज हे मातोश्रीची पायरी चढले; आणि अखेर, एकदाचे 'गंगेत घोडे न्हाले' असे म्हणत, दोन्ही पक्षांतील उत्साही कार्यकर्त्यांनी सुटकेचा दीर्घ श्वास सोडला. 'अतिविद्वान' विश्वप्रवक्त्यांची तर, 'किती सांगू मी सांगू कुणाला, आज आनंदी आनंद झाला', अशी स्थिती झाली. (अर्थात, आनंद मनापासून होता की, 'दिखाऊ'? हे त्यांनाच ठाऊक) आनंदाच्या भरात ते 'अर्ध्या हळकुंडाने इतके पिवळे' झाले की, त्यांनी लगेच, युतीची घोषणा करत 'आता महाराष्ट्रातील कोणतीही 'अघोरी' शक्ती मराठी माणसाला थांबवू शकणार नाही' अशी भीमगर्जना केली. तसेच, मुंबई, नवी मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, पुणे, नाशिक, संभाजीनगर या महापालिकांत आता भगवाच फडकणार, असेही 'छातीठोकपणे'(?) जाहीर करून टाकले. (अर्थात, काही दिवसांतच आपल्यावर नेहमीप्रमाणे छाती बडविण्याची वेळ येईल, याची कल्पना त्यांना होती की नव्हती, हे त्यांचे त्यांनाच माहीत)- एचएमव्ही पत्रकारांनी 'आता महाराष्ट्र थांबणार नाही', 'महाराष्ट्राच्या राजकारणाचे चित्र बदलणार', असे ढोल वाजवण्यास सुरुवात केली. तर, बटीक झालेल्या वृत्तवाहिन्यांनी 'ठाकरे ब्रॅण्ड' या विषयावर 'स्पेशल रिपोर्ट' आणि 'चर्चां'च्या कार्यक्रमांचा 'धुरळा'च उडवून दिला. याच दरम्यान, मुंबईच्या 'बेस्ट' पतपेढीची निवडणूक लागली. गेली ९ वर्षे येथे उध्दव ठाकरे यांची सत्ता होती. 'युती'ची सुरुवात याच निवडणुकीपासून करण्याचे ठरले. 'ठाकरे ब्रॅण्ड' या ठसठशीत नावाचे पोस्टर आणि बॅनर्स लावून वातावरण निर्मिती करण्यात आली. आजपर्यंत कोणालाही माहीत नसलेली 'बेस्ट पतपेढी' मुंबईच्याच नव्हे तर, बहुधा राज्याच्या शेवटच्या माणसाला माहीत झाली.

अखेर, सोमवारी (दि. १८) मतदान पार पडले. दुस-याच दिवशी म्हणजे, मंगळवारी सकाळी मतमोजणी सुरू होणार होती. परंतु, मुंबईत सुरू असलेल्या मुसळधार पावसाने मतमोजणी सुरू होऊ शकली नाही. रात्री उशिराने मतमोजणी होऊन निकाल समोर आले. शशांक राव यांच्या पॅनलला १४, प्रवीण दरेकर यांना ७ तर बहुचर्चित ठाकरे ब्रँडच्या आदर्श (?) पॅनलच्या हाती 'भोपळा' पडला. सदरचे निकाल हे अनेकांना 'धक्कादायक' वाटत असले तरी, अपेक्षित असेच लागले, असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही. कारण, बाळासाहेबांच्या निधनानंतर 'ठाकरे ब्रँड'ची जादू कमी झाली होती. नंतर, २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत उध्दव ठाकरे हे, स्वतःच्या आणि मुलाच्या स्वार्थासाठी बापाच्या 'स्वाभिमानी' विचारांना तिलांजली देत आणि जनादेशावर दिवसाढवळ्या दरोडा टाकून 'बारामती'च्या 'करामती' काकाच्या मांडीवर जाऊन बसले, तेव्हाच 'ठाकरे ब्रॅण्ड'चा अंत झाला होता. तसा संकेतही मराठी माणसाने विधानसभा निवडणुकीत त्यांना घरी बसवून दिला होता. पण, 'त' म्हणजे 'तपेले' हे कळण्या इतकी बुद्धी ज्याच्याकडे नसेल त्याला ते कसे कळेल? आणि त्याला आपणही काही करू शकत नाही, असो.

खरा कसोटी सामना तर अजून दूरच होता. परंतु, 'टी-२०' सामन्यात आणि तीही पहिल्याच चेंडूत शुन्यावर विकेट पडली. मुहूर्तालाच 'अपशकून' झाल्याने, दोन्ही पक्षांच्या गोटात चिंतेचे वातावरण पसरून सन्नाटा पसरला. एचएमव्ही पत्रकार, नेते, पदाधिकारी यांनी 'मिठाच्या गुळण्या' धरल्या. तर, बटीक झालेल्या वृत्तवाहिन्यांनी निवडणुकीबाबत 'ब्र' शब्दही न काढत, दिवस-रात्र मुंबईच्या पावसाच्या बातम्या चालविण्यात धन्यता मानली. हाच निकाल जर उलटा लागला असता तर, सामनात 'धो डाला', 'उखाड दिया', 'नाद करायचा नाय', 'आता लक्ष्य विधानसभा आणि लोकसभा' अशा मथळ्यांखाली रकान्याचे रकाने भरून लेख प्रसिद्ध झाले असते. बटीक वृत्तवाहिन्यांनी दूरदर्शनच्या पडद्याला तडा जाईपर्यंत बातम्या आणि चर्चासत्रांचे 'फड' रंगवले असते.

'निवडणूक' आणि 'खेळ' या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. दोन्हीमध्येही एकाचा पराभव आणि एकाचा विजय ठरलेला असतो. खेळात झालेला पराभव जो खेळाडू खिलाडीवृत्तीने स्वीकारतो, तोच खरा स्पोर्टस्मन असतो. तसेच, राजकारणातही जो नेता हसतहसत पराभव मान्य करून, आत्मपरिक्षण करतो तो खरा पुढारी समजला जातो. काही वर्षांपूर्वी उमेदवार प्रचार करताना एकमेकांवर टीका-टिप्पणी करायचे. पण, त्याला एक दर्जा असायचा. 'शालीतून जोडे मारणे' अशी उपमा त्यावेळी दिली जायची. पराभूत झालेला उमेदवार सर्व काही विसरुन विजयी उमेदवाराचे अभिनंदनही करत असे. काही प्रसंगी तर पराभूत उमेदवार विजयी उमेदवाराच्या मिरवणुकीत सहभागी झाल्याचे चित्रही बघायला मिळायचे.

परंतु, हळूहळू राजकारण बदलत गेले. अनेक गुन्हेगार आणि माफिया हे या क्षेत्रात आले; आणि राजकारणाचा चेहरामोहराच बदलला. एकनाथ शिंदे यांनी बंड केल्यामुळे 'अभद्र' युतीचे 'मविआ' सरकार पडले म्हणण्याऐवजी पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे कोसळले, असे म्हणणे संयुक्तिक ठरेल. जनतेच्या 'पाठीत खंजीर' खुपसत, मोठे 'अभद्र' प्रयत्न करून, ज्या 'अभद्र' कारभा-यांनी या 'अभद्र' सरकारला जन्म दिला होता, त्यांच्या 'अंगाचा तिळपापड' होऊन, त्यांच्या 'संतापाची आग तळपायातून मस्तकात' गेली; आणि त्या दिवसापासूनच महाराष्ट्रात 'सूड' व 'द्वेषा'चे राजकारण सुरू झाले. 'अंगावर आला तर कोथळा बाहेर काढील', 'माझ्या नादी लागला तर हात-पाय तोडून टाकील', 'आडवा आला तर २० फूट जमिनीत गाडील', 'मला बोटे दाखवले तर बोटे छाटून टाकेल' अशा एकमेकांना दिवसाढवळ्या विधानभवनात आणि बाहेर धमक्या दिल्या जाऊ लागल्या. 'बाप दाखव नाहीतर श्राद्ध कर', 'एकतर तू तरी राहशील नाहीतर मी' अशी टोकाची द्वेषपूर्ण आव्हाने दिली जाऊ लागली. खरे तर कायद्याने हा गंभीर गुन्हा आहे. पण, 'लोकप्रतिनिधी'(?) ना सर्व काही माफ असते. निवडून आले की यांना 'गुंडगिरी' करण्याचा एकप्रकारे 'परवाना'च मिळतो. त्यामुळे यांचे 'दबंग'गिरीचे असे वर्तन बघून, तुम्हा-आम्हाला 'लोकप्रतिनिधी की, गावगुंड'? या पडणा-या प्रश्नाला 'काडीचीही किंमत' नाही.

वाटले होते 'अपयश ही यशाची पहिली पायरी असते' असे मानून, या निवडणुकीतील पराभवाचा मोठ्या मनाने स्वीकार करून, काय आणि कोठे चुका झाल्यात? याचे आत्मपरीक्षण केले जाईल. पण, 'सरड्यालाही लाजवेल इतक्या जलदगतीने रंग बदलणा-या' संधीसाधू आणि पलटूराम कारभा-यांकडून 'मोठ्या मनाची' अपेक्षा ठेवणे म्हणजे 'कपाळमोक्ष करून' घेण्यासारखेच आहे. आदित्य ठाकरे यांनी याविषयी बोलताना, प्रश्नाला बगल देत 'तो मी नव्हेच'ची भूमिका घेतली. निकालाआधी 'आता भाजप पतपेढ्याही लुटायचे षडयंत्र रचत आहे. पण, आता ठाकरे बंधू एकत्र आल्याने ते शक्य होणार नाही' असे वक्तव्य करणा-या 'सकाळच्या भोंग्या'ने तर, 'मी दिल्लीत आहे, तुम्ही मला मुंबईचे प्रश्न विचारू नका. मला त्याबद्दल काहीही माहीत नाही', असा जवळजवळ हजारो किमीचा सोईनुसार 'यू टर्न' घेतला. सा-या विश्वात कोठेही साधे 'खुट्ट' वाजले तरी, 'माझ्याकडे खात्रीपूर्ण माहिती आहे', 'मला अमक्याचा फोन आला होता', 'मला तमक्याने भेटून माहिती दिली', ' आमचेही सगळीकडे सोर्स आहेत' असे नेहमीचे पालूपद वापरून, मोदी, शहा, शिंदे, फडणवीस आणि भाजपवर विषारी फुत्कार टाकणा-या या 'महाशयांना' या निवडणुकीच्या निकालाची माहिती नसावी? यावर शेंबडे पोरगं तरी विश्वास ठेवेल का? मनात आणले तर हे 'महाभाग' उद्या 'उबाठा' गट आणि 'ट्रम्पतात्या'च्या पक्षाचीही युती घडवून आणतील. म्हणून तर त्यांना 'विश्वप्रवक्ते' अशी सन्माननीय (?) पदवी बहाल केली आहे.

नेहमीप्रमाणेच पुन्हा एकदा ते तोंडावर आपटले आहेत. 'स्वतःच स्वतःच्या हाताने तोंड फोडून' घेतल्याचे ते कोणत्या 'तोंडा'ने सांगणार? म्हणून त्यांनी 'कानावर हात' ठेवले असावेत. त्यांची ही अडचण आम्ही समजू शकतो. उध्दव ठाकरे तर निकालानंतर कोठेच दिसले नाहीत. 'योग्य वेळ येऊ द्या', 'योग्य वेळी आनंदाची बातमी देईन' असे आधी हवेत अनेक 'कागदी' बाण मारले. आता पुन्हा एकदा मराठी माणसाने त्यांना त्यांची 'योग्य' जागा दाखवून दिल्याने त्यांना बहुधा तोंड दाखवायला 'तोंड'च राहिले नसावे. सर्वात कहर केला तो राज ठाकरेंनी. २ दिवसांपूर्वी घेतलेल्या पत्रकार परिषदेत 'विकासा'शिवाय इतर कोणतेही प्रश्न विचारू नका, अशी प्रथमच पत्रकारांना तंबी दिली. परंतु नंतर पत्रकारांनी 'बेस्ट'च्या निवडणुकीविषयी त्यांना प्रश्न विचारलाच. तेव्हा त्यांनी 'बेस्ट पतपेढी' काय आहे? असा पत्रकारांनाच प्रतिप्रश्न केला. यावरून, या निवडणुकीच्या युतीबद्दल मला काहीही माहीत नाही. किंवा, मला अंधारात ठेवले गेले. असे त्यांना म्हणायचे आहे का? क्षणभर आपण हे मान्य केले तर मग बाळा नांदगावकर या निवडणुकीत सक्रिय का होते? आणि होते तर मग तुमच्या आदेशाशिवाय होते का? हे प्रश्न उपस्थित होतात. या प्रश्नांना काय उत्तरं देणार?

रोज उठून स्वतःला 'अतिविद्वान' समजत, समोरच्याला शिव्या, शाप द्यायचे. चिथावणीखोर आणि प्रक्षोभक वक्तव्ये करून फेक नॅरेटिव्ह सेट करून जनतेत संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न करायचा. एखाद्याच्या शरीराच्या व्यंगावरून खालच्या स्तरावरची टीका-टिप्पणी करायची. केवळ विरोध करायचा म्हणून, कृष्ण जयंतीला मांसाहार करायचा आणि फुकट वाटायचे. हेच का तुमचे हिंदूत्व? फडणविसांनी आम्हाला हे शिकवू नये, ते शिकवू नये, त्यांच्यापेक्षा आम्हाला जास्त कळते, अशा फुशारक्या मारून त्यांचा द्वेष करायचा. पण, 'डोक्यावर बर्फ आणि जिभेवर साखर ठेवत' राजकारण करायचे असते, हे संयमी आणि सहनशील असलेल्या फडणविसांकडून शिकण्याची खरी गरज तुम्हाला आहे. तुम्ही आणि जरांगे कायम शिव्या देतात, पण ते प्रत्युत्तर देत नाहीत. आक्रस्ताळेपणा, आडनावाचा अहंकार, थयथयाट, शिव्या-शाप, पोपटपंची करून नव्हे तर, संयम राखत जनतेत मिसळून त्यांचे प्रश्न मार्गी लावले तरच जनता मत देईल, हे साधे सरळ गणित जोपर्यंत डोक्यात शिरणार नाही; आणि 'गिरा तो भी टांग उपर' ही 'अहंकारी' प्रवृत्ती सोडत नाही तोपर्यंत तुमची अधोगती थांबणार नाही, हे मात्र नक्की. झालेला पराभव मान्य करून आत्मपरीक्षण करण्याचा बोध अजूनही घेतला नाही तर, राजकारणातून बाहेर फेकल्या जाण्याचा दिवस जास्त लांब नाही, हे मात्र नक्की.

**प्रदीप व्ही. खोलमकर,**
**नाशिक**
**मोबाईल क्र. ८७६७५९२९८०**

# अर्बन फार्मिंग: शहरातून शेतीकडे नव्या वाटा

गावाकडील शेतातून धान्य, भाजीपाला, फळे शहरात येतात, हे नेहमीचे दृश्य आहे. पण आता काळ बदलतो आहे. शहरातच मातीच्या कुंडीत, छतावर किंवा मोकळ्या जागेत शेती उगवत आहे. यालाच अर्बन फार्मिंग म्हणतात. ही संकल्पना केवळ एक छंद नाही, तर शहरातील अन्नसुरक्षा, पर्यावरणीय संतुलन आणि निरोगी जीवनाशी जोडलेली आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे शहरी भागात अन्नधान्याची मागणी प्रचंड वाढली आहे, परंतु उपलब्ध जमीन मर्यादित आहे. त्यामुळे शहरातच शेती करणे हा उपाय म्हणून पुढे आला आहे. आज मुंबई, पुणे, बंगलोर, दिल्ली अशा अनेक शहरांमध्ये छतावरील शेती किंवा टेरेस गार्डनिंग मोठ्या प्रमाणावर लोकप्रिय होत आहे. फक्त मोकळ्या जागेची गरज नाही, तर कुंड्या, ड्रम, पाईप, अगदी प्लास्टिकच्या बाटल्यांमध्येही भाज्या-फळे उगवता येतात. टोमॅटो, मिरची, वांगी, कारले, पालक, मेथी, कोथिंबीर यांसारखी पिके घरातच उगवली तर त्याचा फायदा केवळ घरगुती स्वयंपाकापुरता होत नाही, तर त्यातून मिळणारा ताजा व विषमुक्त अन्नसाठा आरोग्यासाठी वरदान ठरतो.

अर्बन फार्मिंगमुळे शहरातील पर्यावरणालाही मोठा फायदा होतो. छतावर मातीची बाग असेल, तर घराचे तापमान नियंत्रित राहते. उन्हाळ्यातील उष्णता कमी होते, एअर कंडिशनरचा वापर घटतो आणि वीजेची बचत होते. शिवाय छतावर असलेली हिरवाई हवेतला धूर, धूळ, प्रदूषण कमी करण्यास मदत करते. यामुळे घराभोवती नैसर्गिक वातावरण तयार होते. शहरातील रिकाम्या मोकळ्या जागा, सरकारी इमारतींची छते, शाळा-कॉलेजांचे मैदान, सोसायटी परिसर या सर्व ठिकाणी सामूहिक शेती प्रकल्प राबवले जाऊ शकतात. अशा उपक्रमांतून मिळणारी पिके स्थानिक बाजारात विकली जाऊ शकतात, ज्यामुळे रोजगारनिर्मितीही होते. काही देशांत कम्युनिटी गार्डन ही संकल्पना फार लोकप्रिय आहे. लोक आपल्या रिकाम्या वेळात एकत्र येऊन पिके लावतात, त्यांचे संगोपन करतात आणि त्यातून मिळणारा अन्नसाठा वाटून घेतात. आपल्या शहरांमध्येही अशा पद्धतीने समाज एकत्र आला, तर अन्नसुरक्षेबरोबरच सामाजिक ऐक्यालाही नवा बळ मिळेल.



**डॉ. भागवत राजाभाऊ चव्हाण**
(लेखक कृषी वनस्पतीशास्त्राचे अभ्यासक आहेत)
मोबाईल नंबर ८७६७४५६४५५

अर्बन फार्मिंगचा आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे सेंद्रिय शेती. शहरातील लोक रासायनिक खतांनी पिकवलेल्या भाजीपाल्यापेक्षा ऑर्गेनिक भाज्यांना प्राधान्य देतात. त्यामुळे घरच्या घरी सेंद्रिय खत आणि कंपोस्ट तयार करून भाज्या उगवणे ही सुरक्षित व आरोग्यदायी पद्धत ठरते. ओल्या कचऱ्यापासून कंपोस्ट तयार करणे आणि त्याचा वापर शेतीत करणे ही तर कचरा व्यवस्थापनाची उत्तम पद्धत आहे. यामुळे कचरा कमी होतो आणि शहर स्वच्छ राहते.

शहरातील मुलांना शेतीशी जोडणे ही अर्बन फार्मिंगची आणखी एक मोठी देणगी आहे. आजची पिढी मातीपासून दुरावली आहे. त्यांना भाजी कुठून येते, पिक वाढते कसे, झाडाची निगा कशी राखायची याचा अनुभवच मिळत नाही. शाळांमध्ये लहान बाग तयार केल्या, तर मुलांना निसर्गाशी जवळीक साधता येईल आणि अन्नाचा खरा अर्थ समजेल.

तथापि, अर्बन फार्मिंगला काही अडचणीही आहेत. जागेची कमतरता, पाण्याचा तुटवडा, लोकांचा वेळ न देणे ही मोठी आव्हाने आहेत. पण आधुनिक तंत्रज्ञानाने यावर उपाय सापडले आहेत. हायड्रोपोनिक्स, एरोपोनिक्स, ड्रिप सिंचन यांसारख्या पद्धतींनी कमी पाणी व कमी जागेतही भरघोस उत्पादन घेता येते. अशा पद्धतींना शासकीय आणि खासगी संस्थांनी प्रोत्साहन दिले, तर अर्बन फार्मिंग ही फक्त एक संकल्पना न राहता एक मोठी चळवळ होऊ शकेल.

शहरातील शेतीमुळे अन्नपुरवठा साखळी छोटा राहतो. थेट घराजवळ पिकलेला भाजीपाला बाजारात येतो, त्यामुळे वाहतुकीचा खर्च कमी होतो, प्रदूषणही घटते. शेतकऱ्यांपर्यंत पोहोचणारा फायदा अधिक वाढतो. शहरात अन्नधान्याचा स्थिर पुरवठा झाला तर महागाई नियंत्रणात राहण्यासही मदत होईल.

अर्बन फार्मिंग ही केवळ फॅशन किंवा लाइफस्टाइल संकल्पना नाही, तर ती एक गरज बनत चालली आहे. हवामान बदल, लोकसंख्येची वाढ आणि अन्नधान्याचा तुटवडा या पार्श्वभूमीवर शहरातूनच अन्नसुरक्षा शोधणे अत्यावश्यक ठरत आहे. आपण थोडा वेळ, थोडा कचरा आणि थोडीशी मोकळी जागा दिली, तरी त्यातून निर्माण होणारी हिरवाई आपल्या जीवनाला नवा अर्थ देईल.

शहरातील लोकांनी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे आपण जर प्रत्येकाने आपल्या छतावर, गच्चीत किंवा मोकळ्या जागेत काही झाडे उगवली, तर लाखो घरांच्या छतावर एक भला मोठा हिरवा शेतजमिनीचा पट्टा निर्माण होईल. तो शहराला स्वच्छ हवा, ताजे अन्न आणि निरोगी जीवन देईल.




# भगवान सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामींच्या कार्याची माहिती

महानुभाव पंथ प्रवर्तक भगवान सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामींच्या अवतार कार्याला भाद्रपद शु. द्वितीया (दि. २५ ऑगस्ट, २०२५ रोजी ) ८०३ वर्षे पूण होत आहेत. यानिमित्त त्यांच्या कार्याची माहिती.

१२ व्या शतकात महानुभाव पंथ प्रवर्तक भगवान सवज्ञ श्रीचक्रधर स्वामींनी गुजरातमधील भडूच नगरीचे प्रधान विशालदेव व माता माल्हनीदेवी यांच्या घरी अवतार घेतला. वयाच्या २५ व्या वर्षापर्यंत समर्थपणे राज्य कारभार केल्यानंतर रामटेक यात्रेनिमित्त महाराष्ट्रात आले. मानव समाज वर्णव्यवस्थेच्या बंधनात बंदिस्त होता, अशा काळात श्रीचक्रधर स्वामीनी महाराष्ट्राला आपली कर्मभूमी मानले. दीन-दलित असहाय समाजाचे अवलोकन करून समतेच्या आधिष्ठानावर आधारित नवमतांचे प्रतिपादन केले. जीव, देवता, प्रपंच व परमेश्वर या चार नित्यवस्तूंची ही सृष्टी आहे. परमेश्वराची प्राप्ती होणे हाच जीवाचा खरा मार्ग आहे. मोक्षाची इच्छा असेल तर जीवाने परमेश्वराची अनन्य उपासना करावी, असे प्रतिपादन केले.

संपूर्ण महाराष्टासह श्रीक्षेत्र पैठणलाही अनेक विद्वान संत समाजमान्य सर्वसामान्य मंडळी स्वामींचे भक्त झाले. पैठन,रामटेक, सालबर्डी, भंडारा, डाकराम, रिद्धपूर, राहेर, नांदेड, वेरूळ, सिन्नर, बीड, कनाशी, जालना, पांचाळेश्वर, खडकली, डोमेग्राम, नेवासा, श्रीरामपूर, बेलापूर इत्यादी ठिकाणच्या पारिभ्रमणकाळात महाराष्ट्रातील सर्व जाती-धर्मांचे लोक स्वामींजवळ आले. त्यात प्रामुख्याने नागुबाईसा, महानुभाव पंथाचे पाहिले आचार्य श्रीनागदेव, मराठी साहित्यातील आद्यचरित्र ग्रंथ लिहिणारे पंडित श्रीम्हाइभट्ट, नाथोबा, साधाइसा, आऊसा, मराठीतील आद्य कवायत्री महादंबा, सारंगपंडित आदी भक्तांना धर्मज्ञानाच्या तात्त्विक व्यवहाराबरोबरच दैनंदिन व्यवहारातही मराठीचा आग्रह धरला. मराठी लोकभाषेला धर्म भाषेचा दर्जा देऊन राजसिंहासनावर बसविले. तोच आदर्श श्रीचक्रधर स्वामींच्या उत्तरापंथे गमनानंतर शिष्यपरिवारानेही डोळ्यांपढे ठेवला. स्वामींच्या स्मरण भक्तीतून पंडीत म्हाइंमभटांनी ग्रंथराज लीळाचारित्र' हा मराठीचा आद्यग्रंथ शके १२०० मध्ये रिद्धपूर येथे निर्माण केला. महादंबेसारखी आद्य कवयित्री मराठी भाषला मिळाली. या ग्रथांतून महानुभावांनी ६५०० ग्रंथ निर्माण केले. भारतीय हस्तलिखीत क्षेत्रात महानुभाव संप्रदायाने सकळ लीपी, संदा लीपी, कविश्वरी लीपी या सारख्या ४२ लिप्या मराठी भाषेतुन निर्माण केल्या आहे. येथूनच मराठी साहित्यपरंपरेची सुरुवात झाली. मराठी आत्मियतेच्या भावनेमुळे विविध साहित्य प्रकारांत महानुभावांनी रचना करून मराठी साहित्य समृद्ध केलं. मराठीला आभिजात भाषेचा दर्जा मिळविण्यासाठी श्रीचक्रधर स्वामींवर आधारित असलेले साहित्य महत्वाचे दस्तऐवज ठरले आहे, याबाबत शासनाने वेळोवेळी खुलासा केलेला आहे.

आज जगातील पहिले मराठी भाषा विद्यापीठ भगवान सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामींच्या पदस्पर्शाने पवित्र असलेल्या श्रीक्षेत्र रिद्धपूर (जि. अमरावती) येथे सुरू झालेले आहे. श्रीचक्रधर स्वामींच्या पदस्पर्शाने महाराष्टात १६५० तीर्थस्थाने निर्माण झाली.हा महाराष्टाचा ऐतिहासिक वारसा आहे. मानवी मूल्यांना नवसंजीवनी देणारे भगवान सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामींचे तत्वज्ञान, कार्याची ओळख, विचारांचा जागर सर्वत्र होण्यासाठी भाद्रपद शु द्वितीया हा दिवस भगवान सर्वज्ञ श्रीचक्रधर स्वामी अवतारदिन म्हणून साजरा करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

आज श्रीचक्रधर स्वामींच्या अवतारदिनी सर्वांना हार्दिक शुभेच्छा !

**अविनाश मनोहर साळकर**
**मुख्याध्यापक**
**प्राचार्य ग्राम विकास माध्य व उच्च माध्यमिक विद्यालय,अंबाडा मोर्शी**

# गणपतीच्या जन्माची कथा



हिंदू संस्कृतीत गणपती या देवतेला सर्वोच्च मान असून गणपती हा विघ्नहर्ता असल्याचे मानले जाते. गणपती हा शिवपार्वतीचा पुत्र असल्याचा पूराणात उल्लेख आहे. गणपतीला गजानन, वक्रतुंड, एकदंत, कृष्ण पिंगाक्ष, गजवक्रं लंबोदर, विकटमेव, विघ्नराजेंद्र , धूम्रवर्ण भालचंद्र, विनायक आदी अनेक नावे आहेत.

पूराणात गणपतीच्या उत्पत्तीच्या अनेक कथा आहेत. त्यापैकी पुढील आख्यायिका सर्वमान्य आहे. पार्वतीने तीला तिच्या दोन दासीनी अंघोळीपूर्वी लावलेल्या उटण्याच्या मळापासून तयार केलेल्या एका मूर्तीला सजीव करून आपल्या स्नानगृहाच्या दारावर उभे केले. त्याचवेळी महादेव आले असताना त्या बालकाने माता पार्वती स्नान करीत असल्याचे सांगून त्यांना अडविले. त्यावेळेला या दोघांचे युद्ध होवून शंकराने बालकाचे शीर उडविले. हे पाहून पार्वतीला अत्यंत दुःख झाले व आपल्या बालकाला जिवंत करण्याचा आग्रह तीने शंकरा कडे केला. तेव्हा शंकरांनी आपल्या गणांना उत्तर दिशेला जाऊन प्रथम दिसेल त्या प्राण्याचे शीर आणण्याची आज्ञा दिली व अशा प्रकारे प्रथम भेटलेल्या हत्तीचे शिर आणून या बालकाला सजीव करण्यात आले. अशा प्रकारे हत्तीचे शिर असल्याने ते बालक गजानन म्हणून प्रसिद्ध झाले.

श्रीगणेश पुराणातही गणपतीच्या जन्मासंदर्भात उल्लेख आहे. त्यानुसार शिवपार्वतीचा विवाह होऊन बऱ्याच कालावधी झाला.तेव्हा पार्वतीला पुत्रप्राप्तीची इच्छा झाली. आपल्याला एक अत्यंत श्रेष्ठ पुत्र व्हावा अशी इच्छा तिने भगवान शंकराजवळ व्यक्त केली. महादेवांनी तिला पुण्यक व्रत करण्यास सांगितले. सर्व नियम पाळून एक वर्ष हे व्रत केल्यास मनोवांच्छित सर्व इच्छा पूर्ण होतात असे सांगितले.

पार्वतीने हे व्रत करण्याचे ठरविले. ब्रह्मदेवाचे मानसपुत्र व वेदशास्त्र संपन्न, हरिभक्त, परमज्ञानी सनत्कुमाराच्या पौरोहित्य खाली हे व्रत केले.

एक वर्षाने व्रताची सांगता होताच एक अत्यंत गरीब ब्राह्मण तेथे येऊन आपण अत्यंत भुकेले आहो असे म्हणून भिक्षा मागू लागला शिवपार्वतीने त्याचा यथोचित सत्कार करून त्याला भोजन व अलंकार वस्त्र देऊन नमस्कार केला. तो ब्राह्मण अंतर्धान पावला. तेवढ्यात आकाशवाणी होऊन तो ब्राह्मण म्हणजे दुसरे तिसरे कोणी नसून जगत्पालक जनार्दनच होते व बालक रूपाने ते तुमच्या घरी प्रगट झाले आहेत असे शिव पार्वतीला सांगितले . अंत:पूरात जाऊन शिव पार्वतीने त्या बालकाला आनंदाने उचलून घेतले. अशा प्रकारे परब्रम्ह परमात्म्याने शंकराचे घरी जन्म घेतल्याचा आनंदोत्सव सर्व देवतांनी साजरा करून बालकावर शुभाशीर्वादाचा वर्षाव केला.

अशाप्रकारे आनंद उत्सव सुरू असतानाच त्या बालकाच्या भेटीसाठी शनिदेव आले व त्यांनी बालकाच्या भेटीची विनंती महादेवांना केली.महादेवाने त्यांना पार्वतीकडे पाठवले. मान खाली घालून शनिदेव पार्वतीकडे आले व बालकाच्या भेटीची परवानगी मागू लागले. परंतु ती मागत असतानाच त्यांनी आपल्याला पत्नीच्या शापामुळे आपण ज्याच्याकडे पाहू त्याचा विनाश होईल असा शाप असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

त्यांच्या या कथनावर खळखळून हसून पार्वतीने त्याकडे दुर्लक्ष केले व आपल्या बालकाचे मुखावलोकन करण्याची शनीला परवानगी दिली. आतापर्यंत जमिनीकडे नजर करून उभ्या असलेल्या शनीने आपल्या डोळ्याच्या केवळ कोपऱ्यातूनच त्या गणपतीच्या मुखाकडे पाहिले मात्र तक्षणीच त्याचे शीर धडापासून अलग होऊन गोलोकात परमात्म्याला समर्पित झाले. हे दृश्य पाहून पार्वती विलाप करू लागली. तिचा तो विलाप पाहून विष्णू गरुडावर बसून तिथे आले व तक्षणीच उत्तरेकडे जाऊन प्रथमतः दिसलेल्या प्राण्याचे म्हणजे हत्तीचे शीर कापून ते परतू लागले. तेव्हा हत्तीणीने त्यांना अडवून आपल्या पतीला परत मस्तक लावून जिवंत करण्याची विनंती केली, अन्यथा आपण शाप देऊ असेही सांगितले, तसेच हे शिर दुसऱ्या कोणाला लावण्यासाठी आपण नेत असाल अशी शंका उपस्थित करून जर तुम्ही माझ्या हत्तीला जिवंत करू शकत नसाल तर त्याला मारण्याचाही तुम्हाला अधिकार नव्हता असे बजावले आणि तुम्ही माझ्याच हत्तीचे शिर का कापले असे म्हणून त्याला जिवंत करण्याची विनंती केली. तेव्हा भगवान विष्णू ने उत्तरेकडे भेटलेल्या पहिल्याच प्राण्यांच्या शीरा मुळेच सदरहू बालक जिवंत होणार आहे असे सांगून तुझ्याही हत्तीला मी जिवंत करतो असे म्हणून त्यांनी दुसऱ्या एका हत्तीचे मस्तक आणून त्याला लावून त्या गजराजाला जिवंत केले व त्यास आशीर्वादही दिले.

अशाप्रकारे आणलेले हत्तीचे हे मस्तक त्या बालकाला लावून त्यांनी गजाननाला सजीव केले. ब्रह्मदेवाने त्याला आपला मुकूट दिला तर श्री विष्णुनी त्याला आपला कौस्तुभ मणी दिला. धर्माने त्याला रत्नांची आभूषणे दिली तर अन्य देवदेवतांनीही त्याला अनेक अलंकार अर्पण केले. शिवानी प्रसन्न होऊन त्याला सदैव विजयी होण्याचा आशीर्वाद दिला. आपल्या बालकाला हत्तीचे मूख पाहून पार्वतीला थोडे दुःख झाले. तिने माझ्या मुलाचे असे का केले असे भगवंताला विचारले. तेव्हा भगवंताने तुझा हा मुलगा अतिशय बुद्धिमान पराक्रमी त्रिलोका मान्य होवून देवतांच्या पूजेमध्ये त्याला अग्रपूजेचा मान मिळेल असे सांगितले. तसेच हा लोकांना बुद्धी प्रदान करणारा असेल असे म्हणून कोणतीही शंका कुशंका मनात न आणता त्याचे पालन करण्यास सांगून तिचे समाधान केले. आपल्या पुत्राचे शीर तोडणाऱ्या शनीचा पार्वतीला अतिशय राग आला तिने त्याला अंगभंग होण्याचा शाप दिला तेव्हा सूर्य इंद्र विष्णू आदीं अनेक देवतांनी पार्वतीची मनधरणी करून तिला विनविले तेव्हा तिने शाप परत घेणे तर शक्य नाही परंतु अंगभंगाची ही शापवाणी पायापुरतीच मर्यादित असेल असे सांगितले व त्यामुळे शनिदेव पायाने लंगडे झाले. असा उल्लेख श्रीगणेश पुराणातआहे.

**भालचंद्र ठोंबरे**
९८३४३५०८९५

# गणेशोत्सवात विधायक कामे करावीत

लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू करुन शतकोत्तर रौप्य महोत्सव उलटला आहे. इंग्रजांच्या राजवटीत भारतीय संस्कृतीची उघड उघड विटंबना होत होती. इंग्रजांच्या दमनशाही विरुद्ध तरुण एकत्र यायला तयार नव्हते. तरुणांना एकत्र आणल्याशिवाय इंग्रजांविरुद्ध लढा देणे अशक्य आहे हे ओळखून लोकमान्य टिळकांनी तरुणांना एकत्र आणण्यासाठी व त्यांच्यात देशभक्तीची मशाल पेटवण्यासाठी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला. हळूहळू सार्वजनिक गणेशोत्सव ही महाराष्ट्राची परंपरा बनली. आजही ती परंपरा मोठया भक्तिभावाने जोपासली जाते. लोकमान्य टिळकांनी सुरू केलेला सार्वजनिक गणेशोत्सव महाराष्ट्रात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशात गणेशोत्सव मोठ्या जल्लोषात साजरा केला जातो. गणेशोत्सव हा महाराष्ट्राचा मानबिंदू आहे. गणेशोत्सव महाराष्ट्राची ओळख आहे. लवकरच गणेशाचे आगमन होणार आहे. गणेशोत्सवाच्या दहा दिवसांच्या कालावधीत सर्वच गणेशभक्त गणेशाची मनोभावी पूजा करतात. सर्वत्र उत्साहाचे वातावरण असते मात्र अलीकडच्या काळात गणेशोत्सवाचे हे स्वरूप बदलू लागले आहे. टिळकांनी ज्या उद्देशाने हा सण सुरू केला तो उद्देशच आता हरपला आहे. इतकेच काय पण या उत्सवाचे पावित्र्यही कमी होऊ लागले आहे. आज हा उत्सव न राहता इव्हेंट बनला आहे. उंचच उंच मूर्तींची जणू स्पर्धाच सुरू झाली आहे. या मोठ्या मुर्त्या समुद्राच्या पाण्यात विसर्जित करताना दोरीच्या साहाय्याने बांधाव्या लागतात. उंचच उंच मूर्तीचे अवडंबर न माजवता पर्यावरण पूरक गणेश मूर्ती खरेदी करून तिची प्राणप्रतिष्ठा करावी. शास्त्रानुसार शाडूच्या मातीने गणेश मूर्ती बनवावी असे सांगितले आहे असे असतानाही सर्रास प्लॅस्टर ऑफ पॅरिसपासून मुर्त्या बनवल्या जातात. या मुर्त्या पाण्यात विरघळत नसल्याने पाण्याचेही प्रदूषण होते. गणेशोत्सवाच्या दहा दिवसांत ध्वनी प्रदूषणही खूप वाढते. गणेशोत्सवात डॉल्बीच्या स्पीकरवर मोठमोठ्या आवाजात गाणी लावून चित्रपटांच्या गाण्यावर हिडीस नृत्य करण्याची फॅशन रूढ झाली आहे. या डॉल्बीचा आवाज इतका मोठा असतो की त्याचा परिणाम लहान मुले व जेष्ठ नागरिकांच्या श्रवण इंद्रियांवर होऊ शकतो. उत्सवाच्या नावाखाली वर्गणी उकळली जाते प्रसंगी धमकीही दिली जाते. त्यावरही गणेशभक्त नाराज आहेत. भक्तांनी जितकी वर्गणी दिली भक्तांनी तीच दान म्हणून स्वीकारावी. गणेशोत्सवात डोळे दिपवणारी रोषणाई केली जाते त्यामुळे विजेचाही अपव्यय होतो. तेंव्हा सजावटी रोषणाई यावर मर्यादा घालावी. काही सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे आपल्या मंडळाचे मार्केटिंग करत आहेत. नवसाला पावणारा गणपती अशी जाहिरात करून सिलेंब्रेटींना बोलवले जाते. त्यातूनच मग मंडळा- मंडळामध्ये मतभेद होऊन तेढ निर्माण होते त्यातूनच मग कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. टिळकांनी गणेशोत्सव साधेपणाने साजरा करण्यास सांगितले आहे. दुसऱ्यांना त्रास होऊ न देता गणेशोत्सव साजरा केला पाहिजे. गणेश मंडळांनी दहा दिवसांच्या कालावधीत सामाजिक उपक्रम राबवले पाहिजेत. गणेश मंडळांनी समाजाला उपयोगी पडतील अशी विधायक कामे करावीत. गणेश मंडळांनी रक्तदान शिबिर आयोजित करावीत. दुष्काळग्रस्तांना, पूरग्रस्तांना मदत करावी तसेच गरीब आणि कोरोना काळात पालक गमवलेल्या अनाथ मुलांचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारावे. अनाथ आश्रम, वृद्ध आश्रमांना मदत करावी. गणेश मंडळांनी शालेय विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव दिला पाहिजे. मंडळांनी शालेय विद्यार्थ्यांच्या गीत गायन स्पर्धा, नृत्य , निबंध आणि वक्तृत्व स्पर्धा यांचे आयोजन करावे. गणेश ही बुद्धीची देवता आहे त्यामुळे विद्यार्थ्यांची बुद्धिमत्ता वाढीस लागेल असे उपक्रम राबवावेत. हा उत्सव जितका साधेपणाने साजरा केला जाईल तितकेच त्याचे पावित्र्य कायम राहील आणि भक्तांनाही त्याचा आनंद लुटता येईल.



**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड, जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## वाचक लिहितात

### गणेशभक्त मोरया गोसावी!

हिंदू धर्मात कोणतीही पूजा, यज्ञ, व्रत, उत्सव किंवा शुभकार्य सुरू करण्यापूर्वी श्री गणेशाची पूजा केली जाते. शैव, वैष्णव तसेच अन्य संप्रदायाच्या उपासनेतही सर्वप्रथम श्री गणेशपूजा केली जाते. शिव, श्रीविष्णु आदी देवतांची उपासना करणाऱ्या संप्रदायांप्रमाणेच केवळ श्री गणेशाची उपासना करणाऱ्यांचाही एक संप्रदाय आहे, जो गाणपत्य या नावाने ओळखला जातो.

या संप्रदायानुसार साधना करणाऱ्यांपैकी एक थोर गणेशभक्त म्हणजे मोरया गोसावी! त्यांचे घराणे मूळचे कर्नाटक राज्यातील शाली या गावचे होते. वयाच्या आठव्या वर्षी मौजीबंधनानंतर त्यांची भेट सद्गुरू श्री सिद्धयोगीराज यांच्याशी झाली. त्यांच्या उपदेशानुसार मोरयांनी पुणे जिल्ह्यातील थेऊर येथे जाऊन कठोर तपश्चर्या केली. ४२ दिवसांच्या अखंड नामजपानंतर श्री गणपतीने त्यांना दृष्टांत दिला आणि अखंड भक्ती व सिद्धीचे वरदान दिले. या घटनेनंतर त्यांचे जीवन भक्तिमय चमत्कारांनी भरले. मोरया गोसावी यांनी गणेशभक्तीचा प्रसार करून महाराष्ट्रात गणपती बाप्पा मोरया या घोषणेने भक्तीची परंपरा रुजवली. गणेशभक्तीतून लोकांपर्यंत श्रद्धा, भक्ती व गणेशाचे महत्त्व पोहोचविणारे थोर गणेशभक्त मोरया गोसावी यांच्या चरणी विनम्र नमन!

**सौ. वर्षा आवदे, नागपूर**

### श्री गणेशाच्या आरतीची उत्पत्ती

चढत्या-वाढत्या हिंदवी स्वराज्यावर शत्रू सतत चाल करून येत होता. असाच आदिलशहा नावाचा शत्रू छत्रपती शिवाजी महाराजांवर चाल करून आला. स्वराज्यात त्याने मोठा आकांत मांडला. त्यामुळे महाराज अतिशय खिन्न झाले. या आदिलशाही संकटाची विघ्नहर्ता समर्थ रामदासांना शिवथरघळ येथील सुंदरमठामध्ये समजली. स्वराज्याचे रक्षण व्हावे यासाठी समर्थांनी साक्षात विघ्नहर्त्या गणरायालाच साकडे घातले. गणरायाला त्यांनी साथ घातली संकटी पावावे निर्वाणी रक्षावे. आर्त साद गणरायाने ऐकली. तो गणराया महाराजांच्या पाठीशी धावून आला. आदिलशाही सैन्याची पूर्ण दाणादाण उडवून महाराज यशस्वी झाले आणि समर्थांचा नवस पूर्ण झाला. समर्थांनी सुंदरमठावर गणपती आणला. समर्थांनी महाराष्ट्रात पहिला सार्वजनिक गणेशोत्सव साजरा करून सुंदरमठामध्ये सुखकर्ता दु:खहर्ता ही श्रीगणेशाची आरती लिहिली. या आरतीचा पहिला मान सुंदरमठाला जातो. त्यामुळे या सुंदरमठाला पहिल्या गणेशोत्सवाचा वारसा श्री समर्थ रामदासांनी दिला.

**शंकर पवार,**
**सातारा.**

# सेंच्युरी मिलची जागा गिरणी कामगारांच्या घरांसाठी मिळण्याचा मार्ग मोकळा

**मुंबई, दि. २४ : प्रतिनिधी**

वरळी येथील सेंच्युरी मिल मधील 4888.78 चौ.मी.जागा गिरणी कामगारांच्या घरासाठी सीमांकन करून सुद्धा, वाडिया आणि सेंच्युरी मील व्यवस्थापन यांच्या वादामुळे सेंच्युरी कामगारांच्या घरासाठी मिळत नव्हती. हा वाद मिटल्यामुळे, या जागेची मागणी केल्याने नुकत्याच मॉनेटरी कमिटीत झालेल्या सुनावणीमध्ये ही जागा घरासाठी सेंच्युरी मिल व्यवस्थापनाने देण्याची तयारी दर्शवली आहे. गिरणी कामगार संघर्ष समितीचे अध्यक्ष प्रवीण घाग हे गेले १२ वर्ष ही जागा गिरणी कामगारांच्या घरासाठी मिळावी म्हणून मॉनेटरी कमिटीकडे दाद मागत आहेत. नुकताच नसली वाडिया आणि सेंच्युरी मिल व्यवस्थापनाचा या जागे संबंधी असलेला वाद मिटला आहे. हे समजताच प्रवीण घाग आणि सेंच्युरी एकता मंचचे अध्यक्ष नंदू पारकर व जितेंद्र राणे यांनी यासंबंधी या सुनवणीवेळी हा प्रश्न उपस्थित केला आणि ही जागा मिळावी म्हणून जोरदार मागणी केली. म्हाडाचे कार्यकारी अभियंता गावित यांनी सुध्दा ही जागा गिरणी कामगारांसाठी आहे, असे लेखी कळविले आहे. यामुळे सेंच्युरी मिल व्यवस्थापनाच्या प्रतिनिधी सुनीता थापलियाल यांनी सांगितले की, या जागेच्या विकासाची प्रक्रिया चालू करून गिरणी कामगारांना त्यांची घरे दिली जातील. यामुळे या जागेवर वरळी येथे सेंच्युरी मिल गिरणी कामगारांना आणखीन ५८८ घरे मिळतील. मॉनेटरी कमिटीने दिलेल्या आदेशाप्रमाणे सेंच्युरी मिल व्यवस्थापनाने घेतलेल्या या भूमिकेमुळे गिरणी कामगार संघर्ष समिती व सेंच्युरी मिल एकता मंच या संघटनांनी समाधान व्यक्त केले आहे. या पूर्वी २०१२ साली एकूण १७९८०.६९चौ मी.जागेपैकी १३०९१.९० चौ मी.जागा मिळाली होती. एवढ्या जागेवर कामगारांसाठी घर बांधणी होऊन कामगारांना २१३० घरे मिळाली आहेत. ४८८८.७८ चौ मी जागा मिळणे बाकी होती. सेंच्युरी मिल पात्र गिरणी कामगारांची संख्या ८६८४ इतकी आहे. सेंच्युरी मिल चाळीतील राहत असलेल्या जागे पैकी सहा एकर जागा सुप्रीम कोर्टात झालेल्या निवाडा प्रमाणे ही जागा बीएमसीकडे गेली. तेव्हा या जागेचा बीएमसीकडून विकास केला जाईल तेव्हा त्या जागेवरील सेंच्युरी मिल चाळ रहिवाशांचा कायद्या प्रमाणे पुनर्विकास करून उर्वरित जागेचा वापर बीएमसीने सेंच्युरी मिल कामगारांच्या घरासाठीच करावा. कुठल्याही खाजगी एजन्सीला किंवा विकासक यांना जागा विकून पैसे मिळविण्याचा हेतू बीएमसीचा असू नये, अशी ही मागणी गिरणी कामगार संघर्ष समितीचे अध्यक्ष प्रवीण घाग आणि सेक्रेटरी प्रवीण येरूनकर यांनी केली आहे.

# वसईच्या संघर्षकन्या आमदार स्नेहा दुबे पंडित यांची गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मध्यरात्री रस्त्यांची पाहणी

**वसई, दि. २४ : प्रतिनिधी**



वसईच्या विकासासाठी आणि नागरिकांच्या सोयीसाठी सदैव तत्पर असलेल्या वसईच्या संघर्षकन्या आमदार स्नेहा ताई दुबे पंडित यांनी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर दिवसा ट्राफिक असल्यामुळे रस्त्याचे काम करता येत नाही म्हणून पुढील तीन दिवस मध्यरात्री रस्त्याचे काम होणार आहे. त्या पार्श्वभूमीवर रविवार दिनांक २४ ऑगस्ट २०२५ रोजी मध्यरात्री प्रत्यक्ष स्थळांवर भेट देऊन रस्त्यांच्या दुरुस्ती व पॅचवर्क, पेवर ब्लॉक कामांची पाहणी केली.

अग्रवाल नाका परिसर, स्टार सिटी जूचंद्र, वामन ढाबा ते तिवरी फाटा नायगाव पूर्व तसेच वसई ईस्ट-वेस्ट ब्रिज ते मधुबन, वसंत नगरी गेट, एव्हरशाईन वसई पूर्व या प्रमुख मार्गांचा समावेश या पाहणीत होता. रात्री १२:०२ ते पहाटे ०५:०० वाजेपर्यंत अखंड पाहणी करून संबंधित अधिकाऱ्यांशी थेट संवाद साधत कामाची गुणवत्ता व गतीची माहिती घेतली.

या वेळी वसईच्या संघर्षकन्या आमदार स्नेहा ताई दुबे पंडित यांनी नागरिकांना त्रास होऊ नये यासाठी कामे तातडीने, दर्जेदार व नियोजित वेळेत पूर्ण करण्याच्या कडक सूचना दिल्या.

या पाहणीदरम्यान वसई विरार शहर महानगरपालिकेचे कार्यकारी अभियंता प्रदीप पाचंगे, अभियंता समीर पाटील, अभियंता विवेक चौधरी, अभियंता ऋषिकेश मुळीक यांच्यासह अन्य अधिकारी उपस्थित होते. तसेच नवनीत दुबे, भाजपा वसई विरार शहर जिल्हा सरचिटणीस बिजेंद्र कुमार,मानव दुबे,प्रवीण गावडे, संदीप पाटील, चंद्रकांत पाटील, धरेंद्र कुलकर्णी, अंशूमन ठाकूर, राजेश नायर, विकास सिंग, अक्षय कदम, श्री. संतेश मरब,नितीन फाटक, सुनील पांडे, अक्षय ठाकूर,निखिल बाबर तसेच शिवसेनेचे जिग्नेश म्हात्रे व पदाधिकारी उपस्थित होते.

वसईच्या संघर्षकन्या आमदार स्नेहा ताई दुबे पंडित यांची ही मध्यरात्रीची पाहणी वसईकरांसाठी एक आश्वासक पाऊल ठरत असून "जनतेच्या सेवेसाठी संघर्षकन्या" या त्यांच्या कार्यशैलीची ठळक झलक यातून दिसून आली.

# "कामं करताना थोडं नमतं घ्यावं, आमच्या भावकीलाही घेऊन येत जा", अजित पवारांचा रोख कोणाकडे?

**पुणे, दि. २४ : प्रतिनिधी**

पुण्यातील वाकड येथे आज (२४ ऑगस्ट) महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागायतदार संघाचं ६५ वे वार्षिक अधिवेशन पार पडलं. उपमुख्यमंत्री अजित पवार हे देखील या अधिवेशनाला हजर होते. यावेळी अजित पवार यांनी द्राक्ष बागायतदार संघाची प्रगती अधोरेखित केली. तसेच या अधिवेशनाला उपस्थित शेतकऱ्यांच्या प्रतिनिधींना विनंती केली की आपल्याला शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवायचे आहेत. हे सोडवताना कधी नमतं घ्यावं लागलं तरी चालेल परंतु, आपण सगळी कामं करायची आहेत.

उपमुख्यमंत्री अजित पवार द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांचे प्रतिनिधी कैलासराव भोसले यांना म्हणाले, "मी तुम्हाला स्पष्ट सांगतो या सर्वांच्या वतीने शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी, विजेच्या प्रश्नासाठी तुम्ही माझ्याकडे येत चला. बेदाणाचाळीच्या मागणीसंदर्भात द्राक्ष उत्पादक बागायतदार संघ पाठपुरावा करत होता. संघाची सातत्याने मागणी होती त्या मागणीचा सकारात्मक विचार करून बेदाणाचाळीच्या उभारणीसाठी, त्याच्या तांत्रिक कामासाठी कमाल ६० टक्के आणि बांधकामासाठी ४० टक्के अनुदान देण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे. मात्र याच्या अंमलबजावणीत समस्या येत असतील तर मी किंवा आपले कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, आम्ही दोघेही यामध्ये लक्ष घालू."

अजित पवार म्हणाले, "यासंदर्भात केंद्राची काही मदत हवी असेल तर आम्ही तिथे देखील बोलू. परंतु, कैलासराव माझी तुम्हाला विनंती आहे की या गोष्टीचा खूप पाठपुरावा करावा लागतो. तुम्ही तो कराल अशी अपेक्षा आहे. हा पाठपुरावा करत असताना अजिबात घाबरू नका. तुमचं काम होत नाही तोवर माझ्या कार्यालयात किंवा दत्तात्रय भरणे यांच्या कार्यालयात येत चला.

"बऱ्याचदा माझा आवाज चढला की अनेक लोक माझ्याकडे येणं टाळतात. ते विचार करतात की आज याचा मूड आहे की नाही. आज कशाला जायचं. याचा मूड चांगला असेल तेव्हा जाऊया. परंतु, तुम्ही असा विचार करू नका. माझा मूड असो अथवा नसो तुम्ही माझ्या कार्यालयात येत चला. कारण आपल्याला शेतकऱ्यांची कामं करायची आहेत."

उपमुख्यमंत्री म्हणाले, "महत्त्वाच्या पदावर बसल्यावर आपलं काम करून घेण्यासाठी ज्याच्याकडून आपल्याला काम करून घ्यायचं असतं त्याच्यासमोर थोडं नमतं घ्यावं लागतं. थोडं नमतं घ्यावं लागलं तरी चालेल, परंतु आपण तिथे जायचं, तिथे बसायचं, कारण आपण हे सगळं स्वतःसाठी करत नाही. कैलासराव आपण हे सगळं शेतकऱ्यांसाठी करतो, त्यामुळे तुम्ही असाल किंवा तुमचे बाकीचे सगळे सहकारी असतील, गरज पडल्यास तुम्ही तुमच्याबरोबर कधी कधी तुमचे खजिनदार, आमच्या भावकीला (राजेंद्र पवार) घेऊन येत चला. मारुती चव्हाण यांना घेऊन या. कोणीही मनात इतर कुठलाही विचार आणू नका."

# दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या जिल्ह्यात 'लाडकी बहीण'चे सर्वाधिक बोगस लाभार्थी

**पुणे, दि. २४ : प्रतिनिधी**

'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण' योजनेच्या घोषणेपासून ती चर्चेचा विषय राहिलेली आहे. या योजनेचा गैरफायदा उठविणाऱ्यांविरोधात सरकारने राबविलेल्या शोधमोहिमेमध्ये एकनाथ शिंदे आणि अजित पवार या दोन्ही उपमुख्यमंत्री तसेच काही ज्येष्ठ मंत्र्यांच्या जिल्हयात सर्वाधिक बोगस लाभार्थी आढळून आले आहेत. यामुळे राज्यभरातील सर्व पात्र 'लाडक्या बहिणीं'ची पुन्हा ई- केवायसी पद्धतीने पडताळणी करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. यानंतर विरोधकांकडून सरकारवर टीका केली जात आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे आमदार रोहित पवारांनी यासंबंधी पोस्ट करत सरकारला धारेवर धरले आहे. आमदार रोहित पवारांनी 'लोकसत्ता' वृत्तपत्रात छापून आलेल्या बातमीचा संदर्भ देत राज्य सरकारला जाब विचारला आहे. त्यांनी एक्सवर यासंबंधी एक पोस्ट केली आहे. "लाडकी बहीण योजनेसाठी अर्ज भरून घेणारी, अर्ज तपासणारी, अर्ज मंजूर करणारी अशा सर्वच यंत्रणा सरकारच्या होत्या, तरीदेखील बोगस अर्ज स्वीकारले गेलेच कसे? लाडक्या बहिणीचे दोन्ही उपमुख्यमंत्र्यांसह जेष्ठ मंत्र्यांच्या जिल्ह्यात सर्वाधिक बोगस अर्ज असल्याची आकडेवारी तर अतिशय धक्कादायक असून यावरून लाडकी बहीण योजना महायुतीने फक्त राजकीय उद्देश ठेवूनच आणली होती, हेच यातून सिद्ध होते," असा आरोप रोहित पवारांनी त्यांच्या पोस्टमध्ये केला आहे.

लाडकी बहीण योजनेतून अनेक लाभार्थी बाहेर काढले जात असल्याच्या मुद्द्यावरून देखील रोहित पवारांनी आरोप केला आहे. "गरज सरो वैद्य मरो याप्रमाणेच निवडणुकीपूर्वी लाडकी असलेली बहीण निवडणुका होताच या सरकारला परकी वाटायला लागली असून एक ना अनेक कारणं काढून या योजनेतून लाडक्या बहिणींची हकालपट्टी करण्याचे काम महायुती सरकारने चालवले आहे," असे रोहित पवार म्हणाले आहेत.

# 15 लाख 69 हजारांचा गुटखा जप्त

**भाईंदर, दि. २४ : प्रतिनिधी**

मिरा भाईंदर शहरात पोलीस उप आयुक्त परीमंडळ १ अंतर्गत पोलीस ठाण्यांच्या हद्दीमध्ये चार ठिकाणी टाकलेल्या छाप्यात १५ लाख ६९ हजार रुपयांचा गुटखा जप्त करण्यात आला आहे.

पोलीस उपायुक्त राहुल चव्हाण यांना मीरा भाईंदर शहरात गुटख्याची साठवणूक आणि वाहतूक होत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानंतर चव्हाण यांनी अवैध गुटख्यावर कारवाई करण्यासाठी पोलीस पथक तयार करण्यात आले होते. यापथकाने काशिमीरा, काशिगाव, मीरारोड आणि भाईंदर या चार ठिकाणी छापेमारी केली. याकारवाईत १५ लाख ६९ हजार रुपयांचा गुटखा पोलिसांच्या हाती लागला आहे.

# कातकरी - आदिवासी समाजाची हालअपेष्टा

## शहापूर तालुक्यातील शिरोळ ग्रामपंचायतीच्या उंबरमाळी गावात आजही स्मशानभूमी व रस्त्याचा अभाव

**शहापूर, दि. २४ : प्रतिनिधी**

शहापूर तालुक्यातील शिरोळ ग्रामपंचायतीच्या उंबरमाळी या गावात आजही मूलभूत सुविधांचा अभाव जाणवतो. देशाला स्वातंत्र्य मिळून तब्बल ७८ वर्षे पूर्ण झाली असली तरी या गावातील कातकरी - आदिवासी समाजाला मरणानंतरदेखील सन्मानाने अंत्यसंस्कार करता येत नाहीत, ही वस्तुस्थिती अतिशय वेदनादायी आहे. संपूर्ण आयुष्य जगत असताना कातकरी समाजाच्या वाट्याला वेदनाच येत असतात व मरणानंतरही वेदनाच! उंबरमाळी येथील कातकरी आदिवासी पाड्यावरील मृत व्यक्ती मुकुंद लक्ष्मण वाघ वय ( ७६) यांचे वृद्धाकाळाने आज निधन झाले. त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यासाठी येथील समाजबांधवांना खूप त्रास सहन करावा लागला. आपल्या देशात विकासाच्या नुसत्या गप्पा मारल्या जात आहेत.भारत जगात तिसरी अर्थव्यवस्था होत असल्याच्या वल्गना सरकार करत असताना मागासवर्गीय समाजातील कातकरी - आदिवासीची काय परिस्थिती आहे.हे मात्र दाखविले जात नाही.आजही आदिवासी समाजात मोडणाऱ्या कातकरी समाजाची प्रगती झाली नाही.मागासवर्गीय समाजाचा खऱ्या अर्थाने विकास कधी होणार हा प्रश्न त्यांना सतत आहे.

तालुक्यातील शिरोळ ग्रामपंचायतीच्या उंबरमाळी गावात स्मशानभूमी नाही, त्यामुळे मृतदेह जाळण्यासाठी ठराविक जागा उपलब्ध नाही. कुठेही मोकळ्या जागेवर अंत्यसंस्कार करावे लागतात. एवढेच नव्हे तर जेथे जाळण्याची सोय आहे त्या ठिकाणी जाण्यासाठी रस्ता नाही. त्यामुळे मृतदेह खांद्यावरून उचलून नेण्याची वेळ येते. पावसाळ्यात तर ही परिस्थिती आणखी गंभीर होते. चिखलातून, ओढे-नाल्यांमधून मृतदेह नेणे म्हणजे कुटुंबियांच्या दुःखात भरच पडते. आजही कातकरी समाज हा अत्यंत



मागासलेला असून शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि निवारा या मुलभूत गरजांपासून ते वंचित आहेत. शासनाकडून विविध योजना राबवल्या जात असल्या तरी त्याचा प्रत्यक्ष लाभ या समाजापर्यंत पोहोचत नाही. विकासाचा महाराष्ट्र आजही कातकरी समाजापर्यंत पोहचला नाही.प्रत्येक नागरिकाला मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी सरकारची आहे.मात्र सरकार त्याठिकाणी कमी पडत आहे.मागासवर्गीयांना समाजव्यवस्थेत आजही सन्मानाने वागविले जात नसल्याचे दिसते.कातकरी समाजात आजही मोठ्या प्रमाणात व्यसनाधीनता पहावयास मिळते. शिक्षव्यवस्थेतील त्याचे प्रमाण अत्यंत कमी आहे. कायमच्या रोजगाराच्या संधी त्यांना उपलब्ध असल्याने अत्यंत कष्टाची कामे करावी लागतात. देशाच्या स्वातंत्र्यानंतर विकासाच्या अनेक घोषणा झाल्या, परंतु उंबरमळीतील वास्तव त्याच्या अगदी उलट आहे. मृत व्यक्तीसाठी अंतिम संस्काराची सोय आणि त्यासाठी रस्त्याची सुविधा हा मनुष्यधर्माचा प्रश्न आहे. शासन व प्रशासनाने तातडीने लक्ष घालून या गावाला मासनभूमी व रस्त्याची सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी ग्रामस्थांची मागणी आहे.शहापूर तालुक्यातील उंबरमाळीतील परिस्थिती पाहता अजून किती वर्षे आदिवासी समाजाला मूलभूत हक्कांसाठी झगडावे लागणार, हा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

# सोप्या भाषेत इन्कमटॅक्स आणि इन्वेस्टमेन्ट

## स्मगलर प्यारासिंगला सुट मिळाली मात्र तीच सूट सोना व्यापारी प्रकाशचंद लुणिया यांना मिळणार नाही असे सुप्रीमकोर्ट का म्हणाले ?


गेल्या अनेक आठवड्यापासून आपण सोनं तथा इन्कमटॅक्स या विषयावर माहिती जाणुन घेत आहोत आज आपण याच विषयाची परंतु नवीन केस बद्दल ची माहिती बघणार आहोत, जी नेहमीच्या सोप्या भाषेतील प्रश्नोत्तर रुपात राहणर आहेत.

**प्रश्न : स्मगलर पीआरा सिंग या केसमध्ये काय होते ?**

स्मगलर पीआरा (प्यारा) सिंग या कमिशनर ऑफ इन्कमटॅक्स विरुद्ध पीआरा सिंग १९८० १२४ इतर ४१ [SC] या केस मध्ये पीआरा सिंग हा स्मग्लिंग चा धंदा करत होता. या केस मध्ये पीआरा सिंग या स्मगलरला भारत पाकिस्तानच्या सीमेवर पाकिस्तानच्या सीमा लांघताना पकडले. त्याच्याकडे त्या काळी ६५,५००/- रुपयाचे करन्सी नोट स्मग्लिंग करतांना पोलिसांना सापडले. त्याने झडतीनंतर भारतीय पोलिसांना कबुली दिली की तो हे पैसे घेऊन पाकिस्तान ला जात होता आणि तेथून त्याला सोन्याची स्मग्लिंग करायची होती. त्याचे सर्व करन्सी नोट जप्त करण्यात आले. मग पीआरा सिंग यांनी या प्रकरणा मध्ये इन्कमटॅक्स कमिशनर ला सांगितले की माझे बीजनेस स्मग्लिंग चे आहे आणि मला इन्कमटॅक्स कायद्याच्या कलम १०(१) मध्ये त्याला वजावट मिळायला पाहिजे. याला इन्कमटॅक्स कमिशनर ने विरोध केला तथा वजावट मान्य केली नाही. मग पीआरा सिंग याने हायकोर्टात धाव घेतली. हायकोर्टा ने सांगितले की स्मग्लिंग हा पीआरा सिंग चा नियमित बीजनेस असुन तो दरवेळी भारतातून पैसे पाकिस्तानला नेतो आणि तेथुन सोनं स्मगल करून आणतो तथा भारतात विकतो. आता या वेळी त्याचे रुपये भारतातील कस्टम विभागाने जप्त केले आहे. त्याचा स्मग्लिंग हा नियमित बीजनेस असल्यामुळे हा नुकसान त्याला मिळण्याचा हक्क आहे. या प्रसंगी कोर्टाने बद्रिदास डागा विरुद्ध कमिशनर ऑफ इन्कमटॅक्स १९५८ ३४ इतर १०, कमिशनर ऑफ इन्कमटॅक्स विरुद्ध (गुजरात) एस सी कोठारी (१९७१), ८२ ITR 194 इत्यादी केसेस चा रेफरन्स देऊन मुंबईच्या काही केसेस चा रेफरन्स दिला शेवटी उच्चन्यायालयाने फैसला दिला की इन्कम फ्रॉम बीजनेस या हेड खाली पीआरा सिंग यांचे नुकसान मान्य करण्यात यावा. कारण सोन आणण्यासाठी नोटा आवश्यक आहे आणि या नोटा सरकारने कस्टम विभागा व्दारे जप्त केल्यामुळे करदात्याचे नुकसान झालेले आहे असे म्हणून इन्कमटॅक्स कायद्याचा कलम १०(१) खाली वजावट मान्य करण्यात आली तथा हायकोर्टा ने पीआरा सिंगच्या बाजु ने निर्णय देऊन इन्कमटॅक्स ची अपील फेटाळली आता प्रश्न उरतो की पीआरा सिंगला वजावट दिली परंतु प्रकाशचंद लुणियाला वजावट का नाकारली? या साठी आपल्याला प्रकाशचंद लुणिया २०२३ १४९ Taxmann २२९ याची चर्चा करणे आवश्यक आहे. या केस मध्ये इन्कमटॅक्स अधिकाऱ्यांना १४४ चांदी चे स्लॅबस (पट्ट्या) मिळाल्या पट्ट्या १३९७, चांदणी चौक, दिल्ली येथून जप्त करण्यात आल्या. याची नोंद लुणिया च्या पुस्तकात नव्हती इन्कमटॅक्स च्या अधिकाऱ्यांने तीन कोटी सहा लाख छत्तीस हजार नऊशे नऊ (३,०६,३६,९०९/-) इतक्या रुपयाचे इन्कमटॅक्स च्या कलम ६९ अन्वए Addition केले. लुणिया यांनी कलम ३७ खाली धंद्याचा नुकसान म्हणुन वजावट मागितली कारण पीआरा सिंग मध्ये वजावट देण्यात आली होती हायकोर्टाने वजावट मान्य केली परंतु इन्कमटॅक्सवाल्यांना हे मान्य नव्हते ते सुप्रीम कोर्टात गेले तेथे सुप्रीम कोर्टाने हायकोर्टाचा निर्णय फिरवला तथा सांगितले की पीआरा सिंग केस सारखा इथे वजावट देण्यात येणार नाही कारण पीआरा सिंग चा व्यवसाय स्मग्लिंग चा होता म्हणुन त्याला वजावट मिळाली परंतु प्रकाशचंद लुणिया याचा व्यायसाय स्मग्लिंग चा नाही हा सोना, चांदी चा व्यापारी आहे. या मुळे स्मग्लिंग धंद्यात जी वजावट पीआरा सिंग ला देण्यात आली ती वजावट प्रकाशचंद लुणिया या दिल्ली च्या व्यापाऱ्यास दिली नाही. पुढील लेख मालेत महत्वाचा विषय बघणार आहोत की सहा वर्षा पूर्वी ची ज्वेलरी धाडी मध्ये सापडल्यास ती ज्वेलरी इन्कमटॅक्स अधिकारी जप्त करू शकतात का? महिलांचे सोने जप्त करू शकतात का? ईत्यादि प्रश्नांची चर्चा करण्यात येईल आपले काही प्रश्न असल्यास ९४२२२१८४२८ वर फक्त Whatsapp करावे ज्याची उत्तरे नि:शुल्क पुढे छापली जाईल ही नम्र सुचना.

**सीए. गोविंदप्रसाद एस. मुंदडा**
**सीए. आकाश जी. मुंदडा**
**जालना**

# शब्दकोडे क्रमांक २२००



**आडवे शब्द :-**

१) अवस
४) ठराव, निश्चय
६) शहर, गाव
८) एक अधिक एक चतुर्थांश
१०) पुरुष
११) निराश
१२) किराणा मालाचा दुकानदार
१३) आई (इं.)
१४) प्रहार
१५) मोटार(इं.)
१६) दिवस
१८) धमनी
१९) जमेची खोटी बाब
२१) अधिक श्रेष्ठ, वरचढ
२३) माल, पैसे मिळाल्याची चिठ्ठी
२५) भिंतीवर सरपटणारा प्राणी
२६) प्रसन्न होऊन दिलेला आशीर्वाद
२८) सुसर
३०) होडी
३१) कावळा
३२) भूपती
३३) प्रेत जाळण्याची चिता
३४) माल साठविण्याची जागा
३५) आकाश
३६) हिस्सा
३८) संपूर्ण
४०) तात्पर्यार्थ
४१) नशीब
४२) मार्ग
४३) भारवाहक
४५) कट्टा, ओटा
४८) सैन्याची तुकडी
५०) नवऱ्याचा भाऊ
५१) गयावया करणे
५६) पाळीपाळीने
५९) किंमत
६०) व्यर्थ
६१) धपाटा
६२) वृद्धत्व, थोडे
६३) एक द्विदल धान्य
६५) मालाची विक्री
६७) वर्ष, साल
६८) बैलाच्या मानेवरील जोखड
६९) एक सुगंधी पांढरे फूल
७२) शिकारीचा प्राणी
७३) एक सुगंधी वनस्पती
७५) शरीर
७६) अबोलीची वेणी
७८) नग्न
७९) बोकड
८०) पडसे
८१) हिरा, पाचू इ प्रकार
८२) मोठा नगारा

**उभे शब्द :-**

२) मनुष्य
३) नवरदेव
४) मडके
५) गवंडी
६) होकारच्या विरुद्ध
७) विटी कोलण्याचा खड्डा
८) घर
९) उत्तराधिकारी
११) खोबऱ्याची बर्फी
१२) सतरंजी
१४) नाश, वध
१५) कावळा
१७) महान
१९) नातवाची वा नातीची मुलगी
२०) पाणी
२१) वर्ष, साल
२२) तादाम्य, एकरूप
२४) वरपांगी
२६) हिशेबातील वांधा मिटविणे
२७) खटला
२९) मोजणी करणारा
३१) व्यवस्था, जबाबदारीचे काम
३७) एक श्वासरोग
३९) श्रीरामाचा एक भाऊ
४०) ** बुद्धी नाठी
४४) दडून बसणे
४५) कबूतर
४६) थोर मनाचा, धर्मात्मा
४७) दुसऱ्यांदा
४९) फळाचे साल
५२) ढग
५३) कधीही, केव्हाही
५४) दारूचा एक प्रकार
५५) चरण्याची जागा
५७) मोजकेपणा, मितता
५८) काचेला आरसा बनविणारा घटक
६३) कपि
६४) घट्ट
६५) डोक्यातला फोड .
६७) मनाचा झालेला ग्रह
६९) आम्रवृक्षाची मंजिरी
७०) संताप
७१) विश्रांती
७२) लाकडाचे एक उत्तम जात
७४) गंध
७७) उचलण्यास वजनदार

(उत्तर उद्याच्या अंकात)

**मागील शब्दकोड्याचे उत्तर**



# पेठ महामार्गाच्या घाटांची महामारी, खड्यातच रस्ते.!




**पेठ ।** नाशिक पेठ गुजरात राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ८४८ वरील पेठ तालुक्यातील सावळघाट व कोटंबी घाटातील झालेली दयनीय अवस्था सावळघाटातील दोन ते तीन धोकादायक अवघड वळणांवर मोठ मोठे जीवघेणे खड्डे पडले असून या ठिकाणी अवजड वाहने एकमेकांवर कलंडुन मोठे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

या खड्डेमय रस्त्यामुळे घाटातील वाहतूक वारंवार खोळंबून घाटातील दोन दोन दिवस बंद होवून वाहन चालकांसह प्रवाशांन मनस्ताप करावा लागत आहे. या महामार्गावर चाचडगांव नजिक टोलनाका असून टोल भरून पुढे घाटातील रस्त्यावर वाहनांना टोले घेत घेतच मार्गक्रम करावा लागत असला तरी या अत्यंत जिकरीच्या ठरणा-या समस्येकडे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण किंवा लोकप्रतिनिधी गांभीर्याने पाहत नसल्याचे चित्र आहे. याच मार्गावर

## कोटंबी घाटात रस्त्यातच फसली लक्झरीची चाके



कोटंबी घाटातील वळण रस्त्यावर लक्झरी वाहनाचे एका बाजुने दोन्ही चाके खड्ड्यात फसली मात्र हे वाहन रस्त्यावरच पलटी होता होता वाचले अन्यथा मोठा अपघात घडला असता. या मार्गावरील दोन्ही घाटात पडलेल्या खड्ड्यासह इतरत्र पडलेली मोठे खड्डे तात्काळ भरून वाहतूक सुरळीत करावी व अपघात टाळले जावेत अशी वाहन चालक व प्रवासी वर्गातून होत आहे. अन्यथा या महामार्गावर रस्ता रोको सारखे तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा नागरिकांनी दिला आहे.

# प्राण्याने केलेल्या हल्ल्यात एक महिला गंभीर जखमी; बिबट्याने हल्ला केल्याची अफवा?




> दहेगाव-मनमाड परिसरात झालेल्या घटनेबाबत प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन शहानिशा केली.बिबट्याचा वावर आढळून येईल असे कोणतेही सबळ घटक दिसून आलेले नाही. रात्रीच्या वेळी मोकाट कुत्र्याने हल्ला केला असावा. संबंधित नागरिकांना याबाबत कोणती दक्षता घ्यावी याच्या सूचना दिले आहेत. बिबट्याचे लक्षणे आढळून आले नाही त्यामुळे पिंजरा लावलेला नाही.
>
> **- वैभव गायकवाड, वन परिमंडल अधिकारी, चांदवड**

**मनमाड ।** मनमाड नजीक दहेगाव शिवारात शनिवारी मध्यरात्री प्राण्याने केलेल्या हल्ल्यात एक महिला गंभीर जखमी झाली असून येथे प्राथमिक उपचार करून सदर महिलेला पुढील उपचारासाठी नाशिक येथे दाखल करण्यात आले आहे.दरम्यान या घटनेनंतर दहेगाव मनमाड शिवारात बिबट्याच्या हल्ल्यात महिला गंभीर जखमी झाल्याची वृत्त सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने मनमाडसह परिसरात पुन्हा बिबट्या आल्याच्या प्रकाराने खळबळ उडाली आहे.मात्र वन विभागाने तात्काळ घटना स्थळी धाव घेऊन महिलेवर बिबट्याने हल्ला केलेला नसून मोकाट कुत्र्यांनी हल्ला केल्याचे नागरिकांच्या निदर्शनास आणून दिले व वन विभागाने आवश्यक ती उपाय योजना त्या ठिकाणी केली आहे.

दरम्यान याबाबतची माहिती अशी की, शनिवारी मध्यरात्रीच्या सुमारास मनमाड नजीक असलेल्या दहेगाव शिवारातील कांद्याच्या खळ्यावर भडांगे कुटुंबीय राखणदारीचे काम करत होते. मध्यरात्रीच्या सुमाराला हे भडांगे कुटुंब झोपेत असताना हीच प्राण्याने नर्मदाबाई यशवंत भडांगे वय अंदाजे ५८ ते ६० यांच्यावर हल्ला करून त्यांना गंभीर जखमी केले. आरडा ओरड केल्यानंतर सदर प्राणाने पळ काढला. त्यामुळे ही महिला बालम बाल बचावली. पण सदर महिलेच्या चेहऱ्यावर बिबट्याने हल्ला करून त्यांना गंभीर जखमी केले आहे. त्यांना तात्काळ नाशिक येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. या घटनेमुळे दहेगाव मनमाड परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.तर बिबट्याने हल्ला केल्याच्या प्रकार सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाल्याने नागरिकांत भीतीचे वातावरण पसरले. दरम्यान चांदवड वन विभागाच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी वन परिमंडल अधिकारी गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली ज्या ठिकाणी सदर घटना घडली तेथे आज शनिवारी सकाळी हजेरी लावली व बारकाईने पाहणी केली. या ठिकाणी बिबट्याचा वावर आहे का याची शहानिशा देखील केली. पण बिबट्या असल्याचे निदर्शनास आले नाहीत, असे कोणते लक्षणही दिसले नाही. सदर महिलेवर भटक्या कुत्र्याने हल्ला केला. बिबट्याने नव्हे रात्रीच्या वेळी अंधारामुळे कदाचित हा प्रकार लक्षात आलेला नसावा त्यामुळे वन अधिकाऱ्यांनी तात्काळ सर्व घटनेची पाहणी करून येथे बिबट्या नव्हे तर मोकाट कुत्र्यांनी हल्ला केल्याचे तिथील नागरिकांच्या निदर्शनास आणून दिले. तसेच या संदर्भात कोणती दक्षता घ्यावी,काळजी घ्यावी याबद्दल परिसरातील नागरिकांना मार्गदर्शन करून सूचनाही दिलेल्या आहेत. बिबट्याचा वावर निदर्शनास आले नसल्याने परिसरामध्ये पिंजरा लावण्यात आलेला नाही. पण बिबट्या आढळून आल्यास कोणती काळजी घ्यावी त्याच पद्धतीने दहेगाव मनमाड परिसरात घटनास्थळी उपाय योजना करण्यात आल्याचे वन अधिकाऱ्यांनी सांगितले. वन परिमंडल अधिकारी वैभव गायकवाड,प्रवीण चव्हाण, अशोक शिंदे,भरत वाघ आदीं वन विभाग कर्मचारी घटनास्थळी उपस्थित होते.

# श्रीरामनगर सोसायटीच्या संचालकपदी सचिन खडताळे यांची बिनविरोध

## सभासद, ग्रामस्थ यांच्यावतीने सत्कार

**निफाड ।** श्रीरामनगर येथील विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्थेच्या सर्व संचालकांची महत्वाची बैठक निवडणूक निर्णय अधिकारी सुनिता लोखंडे यांच्या अध्यक्षतेखाली संस्थेच्या कार्यालयात बोलविण्यात आली होती यावेळी रिक्त असलेल्या संचालकपदी सचिन विजयकांत खडताळे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.



श्रीरामनगर विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्थेचे संचालक विजयकांत भागाजी खडताळे हे मयत झाल्याने संस्थेतील संचालक पदाची जागा रिक्त होती सदर जागा नैमित्तिक रित्या भरण्यासाठी सहाय्यक निबंधक कार्यालयाने निवडणूक कार्यक्रम दिला होता.या विहीत मुदतीत फक्त सचिन खडताळे यांचेच एकमेव नामनिर्देशनपत्र प्राप्त झाल्याने व छाननीत ते मंजुर झाल्याने त्यांची बिनविरोध निवडीची घोषना करण्यात आली.यावेळी त्यांच्या नामनिर्देशन पत्रावर सुचक म्हणून संपतराव खताळे तर अनुमोदक म्हणून भगवान शिंदे यांनी सह्या केल्या.या बैठकीस भाऊसाहेब शिंदे, किरण जाधव, भाऊसाहेब शिंदे, संपतराव खताळे, अशोक कोंढरे, अरुण गाडेकर, भगवान शिंदे, सुदाम काळे, शोभा शिंदे, मंगला शिंदे, ताराबाई गोसावी सचिव शिवाजी तुगावे, नामदेव शिंदे हे उपस्थित होते.

श्रीरामनगर विविध कार्यकारी सहकारी सेवा संस्थेच्या संचालक पदी युवक काँग्रेसचे तालुकाध्यक्ष सचिन खडताळे यांची बिनविरोध निवड झाल्याने त्यांचा सभासद व ग्रामस्थ यांच्यावतीने भव्य सत्कार करण्यात आला यावेळी संस्थेचे सर्व संचालक, कर्मचारी यांच्यासह विनायक शिंदे, प्रभाकर हुजबंद, नंदकिशोर कापसे, सोमनाथ खताळे, स्वप्निल बिनायकिया, अलीभाई शेख, ॲड.राहुल गायकवाड, सुहास सुरळीकर, गजीराम खापरे, सतिश भालेराव, विकास खडताळे, सचिन निकाळे, सुरेश गोसावी सिध्दार्थ वाघ, दीपक खडताळे, चंद्रमनी पगारे, मनोज खडताळे, प्रवीण खडताळे, हर्षल जगताप, अभिजित डांगरे यांच्यासह निफाड श्रीरामनगर ग्रामस्थ मोठ्या संखेने उपस्थित होते. सत्कार सोहळ्याचे सुत्रसंचलन विनायक शिंदे यांनी केले तर आभार नामदेव शिंदे यांनी मानले.

# कर्मवीरांनी बहुजन समाजाला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणले : डॉ. पाटील



**नाशिक ।** कर्मवीरांनी बहुजन समाजाला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी अतिशय प्रतिकूल परिस्थितीत ज्या उद्देशाने योगदान दिले त्या उद्देशाला अनुसरून मार्गक्रमण करणे हेच कर्मवीरांना खरे अभिवादन ठरेल असे प्रतिपादन प्रा. डॉ. नारायण पाटील यांनी केले. मराठा विद्या प्रसारक समाज संचालित समाजकार्य महाविद्यालय, नाशिक व लोकनेते मालोजीराव मोगल व्यवस्थापन, संशोधन व तंत्रज्ञान महाविद्यालय (आय एम आर टी) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित समाजकार्य पंधरवाडा व समाजदिन प्रसंगी आयोजित कार्यक्रमात डॉ. पाटील बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ सभासद उद्योजक जोतिराव वाघ होते. प्रमुख अतिथी म्हणून नाशिकच्या उपजिल्हाधिकारी आणि म वि प्र च्या माजी विद्यार्थीनी सीमा आहिरे उपस्थित होत्या. मविप्रचे शिक्षणाधिकारी तथा समाजकार्य महाविद्यालयांचे प्राचार्य डॉ. विलास देशमुख, आयएमआरटीचे संचालक डॉ. प्रशांत सूर्यवंशी, अंधश्रद्धा मासिकाचे संपादक प्रल्हाद मिश्री, कचरू जाधव, महाविद्यालय विकास समितीचे सदस्य काळे, सोनवणे या प्रसंगी उपस्थित होते. डॉ. पाटील पुढे म्हणाले की सुशीक्षित पिढीने आयुष्याला सामोरे जाताना मन, मनगट आणि मस्तक शाबूत ठेऊन सत्यशोधक राहिले पाहिजे. समाजाला योग्य दिशा देण्याची जबाबदारी आपल्यावर आहेत हे भान युवकांनी बाळगले पाहिजे, तरच या कर्मवीरांना अभिवादन प्राप्त होईल. या प्रसंगी उपजिल्हाधिकारी सीमा आहिरे यांनी करिअर संदर्भात मार्गदर्शन केले. स्वतःच्या जीवनातील विविध अनुभव कथन करून प्रतिकूल परिस्थितीत देखील यश संपादन करता येते असा आत्मविश्वास त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. आपण स्वत: मविप्र संस्थेची माजी विद्यार्थिनी आहे, याचा अभिमान वाटतो. गरजू मुलांच्या शिक्षणासाठी निर्माण झालेली संस्था म्हणजे मविप्र संस्था होय. हा एक वटवृक्ष असून त्यांच्या विविध शाखा आहेत. मविप्र संस्था म्हणून ही संस्था नाशिकच्या ग्रामीण व शहरी विकासात मोठे योगदान देत आहे. संस्थेच्या माध्यमातून त्यांच्या विकासात विविध टप्प्यांमधून व्यक्तिमत्व विकास होत गेला त्यातून यशाचा प्रवास सुरू झाला, प्रवासात कोणतेही काम श्रेष्ठ कनिष्ठ नसते प्रत्येक कामात आपण मास्टरी आपण मिळवायला हवी. अध्यक्षीय मनोगतात ज्योतिराव वाघ यांनी यशासाठी नियंत्रित वर्तन प्रकार कसा असावा या बद्दल मार्गदर्शन केले. प्रा. डॉ. मनीषा शुक्ल यांनी सूत्रसंचलन केले. प्रास्ताविक डॉ. प्रशांत सूर्यवंशी यांनी केले. डॉ. विलास देशमुख यांनी स्वागतपर मनोगत मांडले. या कार्यक्रमात पाहुण्याचे स्वागत डॉ. प्रतिभा पगार यांनी केले. यावेळी प्रा. डॉ. संजय गायकवाड, प्रा दिपक नांद्रे, डॉ. घनश्याम जगताप, डॉ. सोनल बैरागी, डॉ. प्रतिमा पवार, प्रा. चंद्रप्रभा निकम, नारायण गभाले उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजश्री खडतालेंनी केले. डॉ. सुनिता जगताप यांनीआभार मानले.

# कवियत्री भाग्यश्री गुजर यांची अ. भा. मराठी साहित्य परिषदेवर निवड



**नाशिक ।** सुप्रसिद्ध कवियत्री भाग्यश्री गुजर यांची अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेच्या उत्तर महाराष्ट्र प्रदेश 'उपाध्यक्षपदी' निवड झाली. ही निवड झाल्याने विविध स्तरातून त्यांच्यावर मान्यवरांकडून शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला.

भाग्यश्री गुजर यांनी रेडिओ विश्वास, अहिल्यानगर आकाशवाणी, नाशिक आकाशवाणी, पुणे आकाशवाणी या केंद्रावर विविध कार्यक्रमात सहभागी होत आपल्या आवाजाने श्रोत्यांची मने जिंकली आहेत. २०२१ मधील ९४ व्या अखिल भारतीय साहित्य संमेलनामध्ये त्यांना कविता सादर करण्याची व सूत्रसंचालन करण्याची संधी मिळाली होती. त्यांनी विविध राज्यस्तरीय चर्चासत्रांमध्ये सहभाग घेत विविध वृत्तपत्र मासिके साप्ताहिक यामध्ये त्यांनी विविध विषयांवर ललित लेख, कविता लिहिल्या आहेत. अनोख्या संवाद शैलीने लोकप्रिय असलेल्या तसेच सांस्कृतिक कार्यक्रमाचे अभ्यासपूर्ण निवेदन करून कार्यक्रमाची उंची वाढवण्याचे कौशल्य असणाऱ्या चतुरस्त्र व्यक्तिमत्व असलेल्या भाग्यश्री गुजर यांचे विविध स्तरांवर स्वागत होत आहे.

# पिंपळनेरचा ऐतिहासिक नामसप्ताह महोत्सव आजपासून सुरू

## विविध कार्यक्रमांचे आयोजन । ३१ ऑगस्ट पासून यात्रोत्सव...





**पिंपळनेर ।** येथील प्रदीर्घ व अखंड परंपरा असणारा १९७ वा श्री नामसप्ताह महोत्सवाचा प्रारंभ दि. २४ रविवार पासून होणार आहे. दि.३० ऑगस्ट रोजी श्री. समर्थ सदगुरू खंडोजी महाराजांची १९७ वी पुण्यतिथी आहे. महाकाकड आरती रविवारी ३१ ऑगस्ट रोजी पहाटे ५ ते ७ वाजता पालखी सोहळा रात्री ११.३० वाजेपासून ते सोमवारी सकाळी ८ वाजेपर्यंत, कुस्त्या व गोपालकाला सोमवारी १ सप्टेंबर रोजी,पारंपरिक नृत्य स्पर्धा मंगळवारी २ सप्टेंबर रोजी तर ३१ ऑगस्ट ते २ सप्टेंबर या कालावधीत पिंपळनेर शहराची यात्रा भरणार आहे.अशा प्रमाणे संपूर्ण नामसप्ताहातील विविध कार्यक्रम संपन्न होणार आहेत.

**दैनंदिन कार्यक्रमः-** दररोज पहाटे ५ वाजता भुपाळ्या, काकडा आरती, सकाळी ८ वाजता गीतापाठ, दि.२५,२६ २७ ऑगस्ट रोजी दुपारी ४ वाजता व्याख्यान,सायंकाळी ५ वाजता महिलांचे भजन,६ वाजता हरिपाठ, ८ वाजता पंचपदी भजन,रात्री ९ वाजता आरती, रात्री ९.३० ते ११.३० पर्यंत कीर्तन असे विविध कार्यक्रम आयोजीत केले असुन २५ ऑगस्ट ते २८ ऑगस्ट या कालावधीत दुपारी २ ते ४ या वेळेत श्रीमती कविता गायधनी, नाशिक यांचे संस्कारित स्त्री व स्त्री संस्कार,२६ ऑगस्ट रोजी ह. भ.प.वैजयंती सिन्नरकर, नाशिक यांचे कुटुंब व्यवस्था- आत्मचिंतन, २७ ऑगस्ट रोजी श्रीमती अचला वाघ,नाशिक यांचे महिला संत या विषयावर व्याख्यान संपन्न होणार आहे.तर २८ ऑगस्ट रोजी संगीताचार्य डॉ.शेखर रुद्र व सहकारी, पुणे यांचे भक्तिसंगीत कार्यक्रम सादर होणार आहेत. सप्ताहाच्या कालावधीत दररोज रात्री ९.३० ते ११.३० या वेळेत ह.भ.प.श्री.निनाद कुलकर्णी (नाशिक),ह.भ.प.सौ. रोहिणीताई माने-परांजपे (पुणे),ह.भ.प.श्री.संतोष महाराज काळोखे (देहुकर),ह.भ.प.ज्योतिताई बिडगर (उसवाड, नाशिक), ह.भ.प.श्री. देविदास महाराज आणि सहकारी (धुळे), ह.भ.प.श्री.योगेश्वर महाराज देशपांडे (पिंपळनेर,धुळे) यांच्या भजन-कीर्तनाचा कार्यक्रम आयोजीत केला आहे. याच दरम्यान शहरातील विविध मंडळांकडून दररोज रात्री पायदळी सोंग, ट्रॅक्टरवरील सजीव देखावे साजरे केले जातील. पिंपळनेरसह पंच क्रोशीतील भाविकांनी नामसप्ताह महोत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहन ह.भ.प.योगेश्वर महाराज देशपांडे यांनी केले आहे.

## महत्त्वाचे

### मनमाडला पोळ्याचा सण उत्साहात, आनंदात साजरा

**मनमाड ।** बळीराजाच्या दृष्टीने अनन्यसाधारण महत्त्व असलेला पोळ्याचा सण शुक्रवारी उत्साहात आणि आनंदात साजरा करण्यात आला.यंदा पाऊस चांगला असल्याने शेतकऱ्यांमध्ये उत्साह दिसून आला.तर बाजारपेठेतही साहित्य खरेदीसाठी गर्दी



झाली होती. शहर व तालुक्यात समाधानकारक पाऊस व शेतीचे कामे वेळेवर झाल्याने पोळा सणांसाठी सर्वत्र उत्साहाचे वातावरण दिसून आले. बाजार पेठ लाडक्या सर्जा राजासाठी लागणाऱ्या सजावटीच्या विविध साहित्यांनी सजली होती. शेतकरी वर्गातही उत्साहाचे वातावरण होते. ज्या शेतकऱ्यांकडे शेती आहे ते पोळ्याच्या मुहूर्तावर आपल्या प्रगतीचा आधारस्तंभ म्हणून बैलजोडीची मोठ्या उत्साहाने पूजा करतात.या दिवशी सुवासिनी कडून बैलांची विधिवत पूजा करून औक्षण केले जाते. दरम्यान बाजारपेठेत बैलाच्या शिंगांपासून पासून ते पायाच्या खोरापर्यंत सजावट करण्याचे साहित्य उपलब्ध झाल्याने बाजारपेठा विविध रंगांनी सजल्या होत्या. पाऊस चांगला झाल्याने गेल्या वर्षीपेक्षा यंदा शेतीबाबत समाधानकारक वातावरण आहे पोळ्याबद्दल उत्साह वाढला आहे. यंदा सजावटीच्या साहित्यामध्ये दहा ते पंधरा टक्के वाढ झाली. बैलांना सजवण्यासाठी लागणाऱ्या घुंगराच्या माळा, वेसण, कासरा, घंटी, हिंगणा लावण्यासाठी विविध रंग यांनी बाजारपेठ सजली होती. वाढत्या महागाईची झळ दिसून आली.

### जिद्द आणि चिकाटीनेच यश प्राप्ती : अशोक कुमावत

**नाशिक ।** प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यात अडचणीचे खाजखळगे असतातच. त्यावर मात करताना जिद्द आणि चिकाटीने परिश्रमपूर्वक प्रयत्न केल्यास यशप्राप्ती निश्चित होते, असे प्रतिपादन राष्ट्रपती पुरस्कार विजेते शिक्षक अशोक कुमावत यांनी केले. गिरणा गौरव प्रतिष्ठानच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त हुतात्मा स्मारकात आयोजित 'पुस्तकावर बोलू काही' या उपक्रमात १७५वे पुष्प गुंफताना 'उठा तुम्ही जिंकणारच!' या पुस्तकावर ऐसपैस गप्पा मारताना ते बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ कवयित्री सुनंदा पाटील होत्या. अशोक कुमावत पुढे म्हणाले की, येणाऱ्या संकटांतून त्यातून मार्ग काढता आला पाहिजे. वेदना




असह्य झाल्या तरी दु:ख कुरवाळत बसू नये. लढत राहाणे हा आपला स्थायिभाव असला पाहिजे. आयुष्यात दु:खाचा बाजार न मांडता हसत-हसत आनंदाने अडचणींचा सामना करता आला पाहिजे. परिस्थितीवर मात करून प्रेरणेची ज्योत पेटवता आली पाहिजे. अशाच जिद्दी व्यक्तिमत्त्वांची यशोगाथा या पुस्तकात आहे. त्यामुळे निश्चितच नवीन पिढीला प्रेरणा मिळेल, असेही ते म्हणाले. प्रमोद ब्राह्मणकर आणि रवींद्र भामरे या भाग्यवान श्रोत्यांना ग्रंथभेट देऊन सन्मानीत करण्यात आले. सुरेश पवार यांनी सूत्रसंचालन केले तर मधुकर गिरी यांनी आभार मानले. दरम्यान येत्या मंगळवारी (२६) कवी अरुण घोडेराव 'काफीरनामा' या पुस्तकावर ऐसपैस गप्पा करणार आहेत.

### संशयावरून चासनळीत पत्नीचा खून करून पतीची आत्महत्या

**विंचूर ।** कोपरगाव तालुक्यातील चासनळी





गावात पत्नीचा खून करून पतीने पंख्याला लटकून आत्महत्या केल्यामुळे खळबळ उडाली आहे. गावातील रहिवासी दिलीप मुजगुले हा चहाचा व्यवसाय तसेच पत्नी अंगणवाडी सेविका म्हणून कार्यरत होती. सदर पती-पत्नीमध्ये कायम खटके उडत असत. दोन दिवसापासून कुटुंब कलह चालू होता. दिलिप कायम दारूचे नशेत राहत असल्यामुळे गुरुवारी रात्री दिलीप मुजगुले यांनी त्यांची पत्नी स्वाती मुजगुलेस मारहाण करून ठार मारले असल्याचा पोलिसांना संशय आहे. अत्यंत मनमिळाऊ असलेल्या स्वाती मुजगुले यांचा नवऱ्याच्या संशय वृत्तीमुळे बळी गेला. सकाळी मुजगुले दांपत्याचा दरवाजा उघडा नसल्यामुळे आसपासच्या लोकांनी आवाज देऊन बोलवण्याचा प्रयत्न केला. आतून प्रतिसाद न मिळाल्यामुळे शेजाऱ्यांना शंका आली. त्यांनी खिडकीतून डोकावले असता दिलीप मुजगुले यांनी पंख्याला लटकून आत्महत्या केलेल्या अवस्थेत व स्वाती मुजगुले जखमी मृत अवस्थेत पडलेल्या दिसल्या. दरवाजा तोडून उघडला असता दोघेही मृत अवस्थेत दिसले. त्यामुळे शेजाऱ्यांच्याच्या पायाखालची वाळू सरकली. दरम्यान शिर्डीचे पोलिस उपविभागीय अधिकारी अमोल भारती व कोपरगाव पोलीस ठाण्याचे पोलिस निरिक्षक संदीप कोळी व त्यांचे सहकारी यांनी तात्काळ भेट देत पाहणी केली असता दोघे मृत अवस्थेत होते. यामुळे चासनळी गावात खळबळ आहे.

# भक्तिमार्ग

**बरेचसे खेळ रंजनाच्या उद्देशाने खेळले जातात. मात्र रंजनाबरोबरच अध्यात्माकडे नेणारा एक खेळ म्हणजे दहीहंडी. दर वर्षी गोकुळाष्टमीच्या दिवशी उंचावर बांधलेली हंडी फोडण्यासाठी गोविंदा थरावर थर लावतात. एका अर्थी हे थर म्हणजे सुखनिधानाकडे नेणारा सोपान असतात. सध्या या सणाला चिटकलेला राजकीय रंग गहिरा होत असला तरी क्षणिक तो बाजूला सारला तर कृष्णभक्तीच्या या पायदंड्या स्पष्टपणे समोर येतात.**

## दहीहंडी, भक्तीचा सोपान

भक्ती विशेष



अनेक कारणांमुळे खेळांचं महत्त्व जाणवतं. खेळांमध्ये रंजन असतंच पण धोका पत्करुन पुढे जाण्याची उमेदही असते. प्रतिस्पर्ध्याच्या तुल-नेत आपली ताकद आणि कस आजमावण्याची संधी असते, सरस कामगिरी करुन जनकौतुक मिळवण्याची इच्छा असते, खिलाडूवृत्ती जोपासून प्रतिस्पर्ध्यांशीही मैत्र जुळवून ठेवण्याचा मानव-तावाद असतो, व्यवहारात कामी येतील असे धडे गिरवण्याचा खेळ हा एक मंत्र असतो आणि सरतेशेवटी अध्यात्माच्या वाटेवर नेणारा हा एक सोपा सोपान असतो. म्हणूनच प्रत्येक काळामध्ये, प्रत्येक पिढीला खेळाचं महत्त्व जाणवतंच. गोकुळाष्टमी हा असाच एक दिवस. कृष्णचरित्रामध्ये कृष्णाच्या लिलांनी सजलेल्या अध्यायांमध्ये गोकुळाष्टमीच्या खेळात भाविक बराच काळ रेंगाळतात. नटखट कन्हैयाने बालपणातला प्रत्येक रस भरभरुन अनुभवला. त्याच्या या बाल-लीलांमध्ये खोड्या होत्याच शिवाय दुपारी सगळी सामसूम झाली असताना शिंकाळ्यावरील दह्याचे हंडे फस्त करण्याचा चोरटेपणाही होता. दुधातुपाने संपन्न असणाऱ्या घरातील असल्यामुळे खरं तर त्याला चोरी करुन दही-दूध खाण्याची काहीच गरज नव्हती पण तरीही साधारण घरांमधून आलेल्या गोपांच्या संगे हा श्रीहरी चोरी करुन दही खातो तेव्हा या खेळामधून, या प्रतीकामधून, या कथेतून अनेक संदर्भ निघतात. हे संदर्भ अध्यात्माकडे नेणारे असतात. त्यातील गर्भितार्थ समाजव्यवस्थेच्या उतरंडीचं, एकमेकांच्या साह्याने एखादं काम मार्गी लावल्यास मिळणाऱ्या खा-त्रीशीर यशाचं, चिकाटीने- तनामनाचा तोल सांभाळत केलेल्या कार्याचं यशोफलीत दाखवणारा असतो. म्हणूनच दहीहंडीचा उत्सव हा एका वेळी नटखट गोविंदांचा खेळ असतोच त्याचबरोबर तो काही धडे देणारा क्षणही असतो. लहानांना या खेळातील थरार आवडतो, प्रौढांना युवकांची चपळता आकर्षित करते तर वृद्धांना या निमित्ताने रंगणाऱ्या रसाळ प्रवचनांची मोहिनी पडते. म्हणजेच या एका उत्सवाकडे पाहण्याची प्रत्येकाची दृष्टी वेगळी असते.

नंद-यशोदाच्या अंगणी खेळणारा कृष्ण हा विष्णूचा अवतार. सृष्टीचं नियमन करणाऱ्या या देवतेने आपल्या कृष्णावतारातही समाजाला एकत्र आणण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. सृष्टीचा हा पालनकर्ता या अवतारातील बालरुपातही पालकाची भूमिका बजावताना दिसतो तेव्हाच त्याच्या चरणी नतमस्तक व्हायला होतं. संपन्नतेचा, सुस्वरुपाचा, सामर्थ्याचा सगळा नखरा क्षणात दूर सारुन हा नंदकिशोर आपल्या सवंगड्यांच्या गराड्यात रमतो. आपल्याबरोबर सगळ्यांनाच चांगलंचुंगलं खायला मिळावं या उद्देशाने तो गोपींच्या हंड्यातील लोणी चोरतो, दही चोरतो. नंतर सगळे एकत्र येऊन ङ्गचोरलेलंङ्ग सगळं साहित्य एकत्र करतात आणि घनगर्द सावली देणाऱ्या एखाद्या झाडात छायेत बसून सेवन करतात. अशा प्रकारे सहभोजन होतं तेव्हा सामाजिक पातळीवरील भेदाभेद क्षणात विरुन जातात. आपल्या घासातील घास काढून दिला जातो, एकत्र घास घेतला जातो, खेळीमेळीत भोजनाचा आनंद मिळतो तेव्हा उच्च-नीच, गोरा-काळा, ज्येष्ठ-कनिष्ठ हा भेदच उरत नाही. हे चिरकालीन सत्य जाणूनच कलियुगातही समाजा-तील जाती-धर्मांचा भेदाभेद नष्ट करण्यासाठी संतम हात्म्यांनी, समाजसुधारकांनी, तत्त्वज्ञांनी समाजातील सर्वात खालच्या थरातील लोकांकडे भोजन करण्याचा मार्ग अवलंबलेला दिसतो. आजही धर्मनिरपेक्षतेचा चेहरा मिरवण्यासाठी हाच उपाय योजला जातो. आपण सर्व एक आहोत हा संदेश पोहोचवण्याचा हा एक सर्वात प्रभावी उपाय आहे. कृष्णाने आपल्या बाललिलांमधून इतका महत्त्वाचा संदेश हसत-खेळत दिला आहे. म्हणूनच वरकरणी साधा वाटणारा हा खेळ युगांच्या पटलावरही अस्तित्व राखून आहे.

आता कृष्णही नाही आणि तो काळही नाही. शिंकाळ्यावर बांधलेल्या दह्यादुधाचे चरवे आजच्या पिढीच्या डोळ्यासमोर येण्याची सुतराम शक्यता नाही. पण असं असलं तरी आजही दहीहंडी रंगते. ती भक्तीभावाने, खेळाच्या उत्साहाने रंगते पण त्याहीपेक्षा जास्त कोर्टाच्या बदलत्या निर्णयांमुळे रंगते. दर वर्षी दहीहंडीसाठी किती थर लावायचे, किती वयापर्यंतच्या मुलांना त्यात सहभागी करुन घ्यायचं, त्यांच्या सुरक्षेसाठी कोणते उपाय योजायचे, त्यांचा विमा उतरवायचा का, अपघात कमी करण्यासाठी आणि गोविंदांच्या सुरक्षेसाठी आणखी कोणते उपाय योजायचे याविषयी चर्चा रंगते. आताही दहीहंडीसाठी उभारल्या जाणाऱ्या मनोऱ्यांची उंची आणि त्यात सहभागी गोविंदांचं वय या संदर्भात दाखल करण्यात आलेल्या याचिकांमध्ये दहा फुटांहून अधिक उंचीचा मनोरा रचण्यावर बंदी घालण्याची मागणी करण्यात आली होती परंतु न्यायालयानं ही मागणी फेटाळून अशी बंदी घालण्यास नकार दिला. न्यायालयानं या संदर्भात केल्या गेलेल्या काही दाव्यांचाही यावेळी समाचार घेतला. त्यामुळेच आता या खेळाला वेग-वेगळे पैलू दिसून येत आहेत.


२०१४ मध्ये उच्च न्यायालयानं दिलेल्या आदेशात १८ वर्षांखालील मुलांवर मानवी मनोऱ्यात सहभागी होण्यावर बंदी घातली होती. त्याबरोबरच या मनोऱ्यांची उंची २० फुटांहून अधिक नसावी असं म्हटलं होतं. आताच्या आदेशानुसार महाराष्ट्र शासनानं काढलेल्या आदेशातील १४ वर्षांपुढील मुलं दहीहंडीत भाग घेऊ शकतील, हा भाग कायम ठेवण्यात आला आहे. दहीहंडीच्या उंचीवर कोणतीही मर्यादा नसली तरी दहीहंडीमध्ये उभारल्या जाणाऱ्या मनोऱ्यांची उंची हा बऱ्याच वेळा चिंतेचा विषय ठरतो. या मनोऱ्यांमध्ये सहसा वरच्या टप्प्यांमध्ये अधिकाधिक लहान मुलांचा समावेश केला जातो. एक तर त्यामुळे खालच्या थरातील गोविंदांवर कमी भार पडतो आणि लहान मुलं गतीनं वर चढू शकतात. मात्र अनेक वेळा हे मनोरे कोसळतात आणि गोविंदांना चांगलाच मार बसतो. या मुक्या मारामुळे अनेक गोविंदा अपंग झाल्याची उदाहरणं ताजी आहेत. साहजिकच पाणी मारून ओल्या झालेल्या निसरड्या रस्त्यांवर हा खेळ खेळणाऱ्या गोविंदांच्या जीवावर बेतण्याची शक्यता असल्यामुळेच गेल्या काही वर्षांपासून या विरोधात याचिका दाखल केल्या जात आहेत. याचिकाकर्त्यांनी यावर भर देणं अपेक्षित असतं; वेडगळ दावे करून आपलं हसू करून घेणं नव्हे. मात्र यातील हा भाग सोडला तर उच्च न्यायालयानं हा विषय राज्य शासनाच्या अखत्यारीत असल्याचं सांगून मनोऱ्यांच्या उंचीवर बंदी घालण्याचा विषय बाजूला सारला आहे. त्यामुळे आता जास्तीत जास्त उंचीचे मनोरे करण्यासाठी अहमिका लागणार हे उघड आहे. अर्थात अशा प्रकारची स्पर्धा जीवघेणी असते हे पथकांनी लक्षात घ्यायला हवं. आपण गोविंदांना जीवावर उदार होण्यास तर भाग पाडत नाही ना याचा त्यांनी प्रामुख्याने विचार करण्याची गरज आहे.

उत्साह, आनंद, जमलेल्या लोकांकडून मिळणारं प्रोत्साहन यामुळे अनेक गोविंदांना त्या भारलेल्या वातावरणात आपण अगदी तळाच्या फळीतील मुलांवर किती भार टाकत आहोत याचं भान रहात नाही आणि मनोरा कोसळला की होणारं शारीरिक नुकसान कालांतरानं लक्षात येतं. क्षणाच्या उन्मादामुळे आयुष्य मातीमोल करणं योग्य नाही याचा विचार सर्वच संबंधितांनी केला पाहिजे. कारण कायदा करणं, न्यायालयांनी आदेश काढणं यापेक्षा आपणच आपली काळजी घेणं योग्य ठरणार नाही का, हे जरूर तपासलं पाहिजे.

## असा हा श्रीकृष्ण!

पुराणांमधून

भगवान श्रीकृष्ण हा विष्णूचा अवतार मानला जातो. श्रावण कृष्ण अष्टमीला श्रीकृष्णाचा जन्म झाला असं मानलं जातं. म्हणूनच हा दिवस गोकुळाष्टमी म्हणून साजरा केला जातो. श्रीकृष्णाने अर्जुनाला गीता सांगितली. तो महान तत्त्व-



वेत्ता होता. त्याने जीवनाचं सार सांगितलं. श्रीकृष्णाने अवतारकार्यातून लोकांना शिकवण दिली. म्हणूनच काही हजार वर्षं उलटून गेली तरी श्रीकृष्णाचा जन्मदिवस भारतभरात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. श्रीकृष्णाच्या शिकवणीचा अवलंब केला जातो. श्रीकृष्ण आदर्शवत जीवन जगला. श्रीकृष्णाच्या अंगी अनेक गुण होते. या गुणांमुळेच तो महान बनला. श्रीकृष्णाने दिलेली शिकवण आजही तितकीच उपयुक्त आहे. त्याच्या अंगी असलेले गुण अंगी बाणवले तर आपणही समाधानी आयुष्य जगू शकतो. श्रीकृष्णाच्या अंगच्या काही गुणांविषयी...

✻ श्रीकृष्णाने कायमच मैत्री जपली. सुदामा, अर्जुन आणि श्रीदामा हे श्रीकृष्णाचे मित्र होते. मित्रांच्या मदतीला तो कायम धावून गेला. आपण श्रेष्ठ असल्याचं त्याने कधीही दाखवलं आहे. श्रीकृष्णाने मित्रांना योग्य मार्ग दाखवला. प्रसंगी तो त्यांच्या पाठीशी उभा राहिला. कृष्ण आणि सुदामा यांच्या मैत्रीचं उदाहरण आवर्जून दिलं जातं.

✻ श्रीकृष्णाच्या एकूण १६,१०८ राण्या असल्याचं म्हटलं जातं. त्यापैकी आठ प्रमुख राण्या होत्या. श्रीकृष्ण सुखी दांम्पत्य जीवन जगला. तो आपल्या प्रत्येक राणीला आनंदी ठेवत असे. त्यामुळे त्याच्या वैवाहिक आयुष्यात कधीही वाद निर्माण झाले नाहीत.

✻ श्रीकृष्णाने प्रत्येक नातं निभावलं. प्रियजनांसाठी त्याने द्वारका नगरीही वसवली. त्याने प्रत्येक नात्याचा मान ठेवला.

✻ श्रीकृष्ण हा धूर्त राजकारणी होता. महाभारतात पांडवांच्या विजयात त्याने महत्त्वाची भूमिका पार पाडली. कुरूक्षेत्रातवर तो उपस्थित राहिला. कौरवांच्या बाजूने उभ्या राहिलेल्या प्रत्येक योद्ध्याचा त्याने धूर्तपणे नायनाट केला.

## बिजली महादेव मंदिर

तीर्थक्षेत्र



भारतातल्या अनेकविध शिवमंदिरांपैकी एक मंदिर हिमाचल प्रदेशातल्या कुल्लूमध्ये आहे. हे मंदिर बिजली महादेव म्हणून ओळखलं जातं. कुल्लू शहरातल्या व्यास आणि पार्वती नदीच्या संगमाजवळ असलेल्या उंच पर्वतावर हे मंदिर वसलं आहे. हे अत्यंत नयनरम्य असं स्थान आहे. या मंदिरात दर बारा वर्षांनंतर एक अनोखी घटना घडते. इथल्या शिवलिंगावर वीज कोसळते. वीज कोसळल्यानंतर शिवलिंगाचे तुकडे होतात. हे सगळे तुकडे पुजारी वेचतो आणि लोण्याचा वापर करून पुन्हा जोडून टाकतो. काही वेळानंतर पिंड मूळ स्वरूपात येते. असं का घडतं हे विषद करताना एक आख्यायिका सांगितली जाते. शिवलिंगावर वीज का पडते याचं रहस्य कोणालाही माहित नाही.

भगवान शंकरानेच राक्षसांच्या विनाशासाठी इंद्राला असं करायला भाग पाडल्याचं सांगितलं जातं. दर बारा वर्षांनी या स्थानी वीज कोसळायला हवी, असं शंकराने इंद्राला बजावलं होतं. पण विजेमुळे कोणाचंही नुकसान होऊ नये, अशी शंकराची इच्छा होती. त्यामुळे त्यांनी स्वत:वरच वीज पाडायला सांगितलं. समुद्रमंथनादरम्यान शंकराने हलाहल विषाचं प्राशन केलं होतं. त्याचप्रमाणे भक्तांच्या कल्याणासाठी सदैव तत्पर असलेल्या महादेवाने हे संकटही स्वत:च झेलायचं ठरवलं.

भाद्रपद महिन्यात इथे मोठा उत्सव असतो. तसंच महाशिवरात्र आणि श्रावणातल्या सोमवारी भक्तमंडळींची मोठी गर्दी झाल्याचं पहायला मिळतं. असं हे महादेवाचं रहस्यमयी मंदिर कुल्लूमधलं खास आकर्षण आहे.

## शिकवण कावळ्याची

भक्ती बोध

आयुष्यात ज्ञानी किंवा तत्त्व-वेत्ताच शिकवण देतो असं नाही तर एखादा सर्वसामान्य माणूस, प्राणी किंवा पक्षीही आपल्याला शिकवण देऊन जातो. जग जिंकणारा सिकंदर आणि कावळा यांची कथाही अशीच. एका सामान्य कावळ्याने सिकंदरला आयुष्याची शिकवण दिली होती. जग जिंकल्यानंतर सिकंदरला अमर व्हायचं होतं. विशिष्ट ठिकाणचं पाणी प्यायलानंतर अमर होता येतं हे त्याला कळलं होतं. या पाण्याच्या शोधार्थ तो निघाला. जगभर भटकल्यानंतर अखेर त्याला ते स्थान सापडलं. एका गुहेत वाहणाऱ्या झऱ्याचं पाणी प्यायल्याने तो अमर होणार होता. हे पाणी सापडल्याने तो खूश झाला. पाणी पिण्यासाठी त्याने हात पुढे केला तेवढ्यात त्याला कावळ्याचा आवाज आला. एक कावळा गुहेत बसला होता. तो सिकंदराला म्हणाला थांब, ही चूक करू नकोस.

सिकंदर त्याच्याकडे बघतच राहिला. हा कावळा अत्यंत वाईट अवस्थेत होता. त्याचे पंख झडून गेले होते. त्याला




नीट दिसत नव्हतं. हा कावळा म्हणजे सांगडा दिसत होता. एक साधा कावळा आपल्याला शिकवतो म्हणजे काय, असं वाटल्याने सिकंदर त्याच्यावर ओरडलाच. मला सांगणारा तू कोण, असा प्रश्न सिकंदराने केला. तेव्हा कावळा म्हणाला, मी सुद्धा अमर होण्यासाठी इथे आलो. हे पाणी प्यायलो. आता मी अमर झालो आहे. पण माझी अवस्था बघ. मला मृत्यू हवा आहे पण मिळत नाही. मी मृत्यूची भीक मागत आहे. पण मला तो मिळत नाही. माझी अवस्था भयावह झाली आहे. सिकंदर काय समजायचं ते समजला. माणसाला वार्धक्य येणार आहे. म्हातारपणी काहीही करता येत नाही. त्यामुळे हातपाय चालतात तोपर्यंत आयुष्याची मजा लुटता येते. नंतरच्या आयुष्याला काहीही अर्थ उरत नाही. हे ऐकताच सिकंदर पाणी न पिताच निघून गेला. साध्या कावळ्याने त्याला जीवनाचं सार शिकवलं होतं.

## विरक्तीची लक्षणं

दासबोधातून...

दुसऱ्या दशकातल्या नवव्या समासात समर्थांनी विरक्तलक्षणं सांगितली आहेत. विरक्तांच्या लक्षणांबाबत समर्थ म्हणतात, ऐका विरक्तांची लक्षणें। विरक्ते असावे कोण्यां गुणें। जेणे अंगी सामर्थ्य बाणे। योगियाचे ।।१।। जेणे सत्किर्ती घडे। जेणे सार्थकता घडे। जेणेंकरिता महिमा चढे। विरक्तांसी ।।२।। जेणें परमार्थ फावे। जेणें आनंद हेलावे। जेणे विकृती दुणावे विवेकेंसहित ।।३।। जेणे सुख उचंबळे। जेणें सद्विद्या वोळे। जेणें भाग्यश्री प्रबळे। मोक्षेंसहित ।।४।। मनोरथ पूर्ण होती। सकळ कामना पुरती। मुखे राहे सरस्वती बोलावया ।।५।।

याचा अर्थ असा की... विरक्त पुरूषाच्या अंगी कोणती लक्षणं असावीत ते आधी सांगतो. कारण



वैराग्यामुळे योग्याच्या अंगी सामर्थ्य बाणतं आणि योग सिद्धीला जातो. विरक्तीमुळे उत्तम किर्तीचा लाभ होतो. मनुष्यजन्माचं सार्थक होण्यासाठी विरक्ती महत्त्वाची आहे. वैराग्य घेतलेल्या माणसाला थोरवी प्राप्त होते. वैराग्यगुणामुळे साक्षात्कार होतो. यामुळे आनंद उचंबळून येतो तसंच विकृतीचा प्रभाव कमी होतो. विवेकासहित वैराग्यही दुपटीने वाढू लागतं. वैराग्य गुणामुळे सुख उचंबळून येतं. सद्विद्या बोळावते. भाग्य उजळते आणि अखेरीला मोक्षही मिळतो. विरक्त व्यक्तीची सर्व मनोरथे पूर्ण होतात. सर्व कामनांची पूर्तता होते. मुखात सदैव सरस्वतीचा वास राहतो. म्हणजे विरक्त व्यक्तीच्या वाणीत माधुर्य असतं.

विरक्तीच्या अशा अनेक लक्षणांचं वर्णन समर्थांनी या समासात केलं आहे. ते शेवटी म्हणतात की विरक्ते उत्तम गुण घ्यावे. विरक्ते अवगुण त्यागावे। नाना अपाय भंगावे। विवेकबळे ।। ३९।। अर्थात विरक्त माणसाने अवगुण त्यागावेत. विविध अपाय आणि दोष दूर करावेत. विवेकाचा अवलंब करावा, असं समर्थ सांगतात.

## पूजा करताना...

परंपरा

सध्याचा श्रावण महिना आणि पुढे येणारे सण-उत्सव यामुळे सध्या पूजनाचा काळ आहे. लवकरच गणेशोत्सव सुरू होईल. देवीदेवतांच्या पूजनाने सर्व मनोकामना पूर्ण होतात. पण त्यासाठी पूजनाच्या नियमांचं पालन करायला हवं विधीवत पूजन करायला हवं. पूजन करताना नेमकं काय करायला हवं याविषयी...



✻ सूर्य, गणेश, दुर्गा, शिव आणि विष्णू हे पंचदेव मानले जातात. त्यामुळे प्रत्येक शुभकार्यात या देवतांची पूजा करायला हवी. दररोज पूजा करताना या पंचदेवांचं स्मरण करायला हवं. यामुळे लक्ष्मीची प्राप्ती होते असं म्हणतात.

✻ शंकर, गणपती आणि भैरव या देवतांना तुळस अर्पण करू नये.

✻ दुर्गा देवीला दुर्वा अर्पण करू नये. दुर्वा या गणेशाच्या प्रिय आहेत.

✻ सूर्यदेवाला शंखातल्या जलाने अर्घ्य देऊ नये.

✻ आंघोळ केल्याशिवाय तुळशीचं पान तोडू नये. आंघोळ न करता तोडलेलं तुळशीचं पान देवाला अर्पण करू नये.

✻ शास्त्रांनुसार दिवसातून पाच वेळा देवीदेवतांचं पूजन करायला हवं. सकाळी ५ ते ६ हा काळ ब्राह्ममुहुर्ताचा मानला जातो. या काळात देवपूजन आणि आरती व्हायला हवी. त्यानंतर सकाळी ९ ते १० या काळात दुसऱ्यांदा पूजा व्हायला हवी. दुपारी दुसऱ्यांदा पूजन करायला हवं. त्यानंतर देवांना झोपू द्यावं. संध्याकाळी पुन्हा पूजा करायला हवी. तर रात्री ८ त ९ या वेळात शयन आरती करायला हवी.

✻ गंगाजल प्लास्टिकच्या बाटलीत किंवा कोणत्याही अपवित्र भांड्यात ठेऊ नंये. गंगाजल तांब्याच्या भांड्यात ठेवायला हवं.

✻ मंदिर तसंच देवाच्या मूर्तीसमोर कधीही पाठमोरं बसू नये.

✻ शंकराला लाल फूल अर्पण करू नये.

✻ रविवारी दुर्वा तोडू नयेत.

✻ देवी लक्ष्मीला कमळ अर्पण करायला हवं.

✻ देवाला अर्पण करायची फुलं हातात ठेवण्याऐवजी पवित्र पात्रात ठेवावी.

## महत्त्व अभिषेकाचं!

जाणून घ्या

सध्या श्रावण महिना सुरू असल्याने शंकरावर अभिषेक केला जातो. शंकराला अभिषेक अत्यंत प्रिय असल्याचं म्हणतात. शंकरावर अभिषेक करण्यासाठी विविध पदार्थांचा वापर केला जातो. अभिषेकाच्या प्रत्येक पदार्थामुळे वेगळा परिणाम साधला जा-तो. अभिषेकासाठी वापरण्यात आलेला कोणता घटक काय परिणाम साधतो याविषयी...



✻ शंकरावर पाण्याने अभिषेक केला तर पर्जन्यमान उत्तम राहतं असं म्हणतात. पाण्याच्या अभिषेकामुळे पावसाचा समतोल राखला जातो तसंच पर्यावरणाचं रक्षणही होतं, असं म्हणतात.

✻ कुश आणि पाण्याचा अभिषेक केला तर वाईट गोष्टींचा नाश होतो. रागलोभ दूर होतात.

✻ दह्याने अभिषेक केला तर घरात समृद्धी नांदते असं मानलं जातं.

✻ शंकरावर उसाच्या रसाचा अभिषेक केला जातो. यामुळे संपत्तीत वृद्धी होते असं म्हणतात.

✻ मधमिश्रित पाण्याने केलेल्या अभिषेकामुळेही संपत्तीत वृद्धी होते.

✻ पवित्र नद्यांच्या पाण्याने शंकरावर अभिषेक केला तर जन्ममृत्यूच्या चक्रातून मुक्ती मिळते, असं म्हटलं जातं.

✻ सुगंधी पाण्याच्या अभिषेकामुळे आरोग्य उत्तम राहतं.

✻ दुग्धाभिषेकामुळे शरीरातले दोष निघून जा-तात. तसंच सगळ्या इच्छा पूर्ण होतात, असं म्हटलं जातं.

✻ गंगाजलाच्या अभिषेकामुळे ताप नाहीसा होतो.

✻ साखरयुक्त दुधाने अभिषेक केला तर बुद्धी आणि चातुर्यात वाढ होते असं म्हणतात. तुपाच्या अभिषेकामुळे कुटुंबाची वृद्धी होते. राईच्या तेलाने अभिषेक केला तर शत्रुचा नायनाट होतो

✻ मधाच्या अभिषेकामुळे पापांचा नाश होतो.

# नागपुरात मारबतचा जल्लोष



**नागपूर, दि. २४ प्रतिनिधी**

'रोगराई, महागाई, दहशतवाद घेऊन जा गे मारबत...' अशा घोषणांनी नागपूरचा आसमंत दुमदुमून गेला. शहराच्या ऐतिहासिक मारबत आणि बडगे मिरवणुकीसाठी शनिवारी लाखो नागरिकांचा जनसागर रस्त्यावर उतरला होता. पोळ्याच्या पाडव्याला निघणारी ही मिरवणूक सामान्यांच्या मनातील असंतोष आणि व्यथांना वाचा फोडणारे एक अनोखे माध्यम ठरली.

यंदाच्या मिरवणुकीत ज्वलंत सामाजिक आणि राजकीय विषयांवर बडग्यांमधून जोरदार प्रहार करण्यात आले. यामध्ये वाढती महागाई, अन्यायकारक स्मार्ट वीज मीटर, पहलगाम येथील दहशतवादी हल्ला आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या धोरणांवरही टीका करणारे बडगे लक्षवेधी ठरले. विविध मंडळांनी व्यसनाधीनते सारख्या प्रश्नांवरही बोट ठेवले. कडक पोलिस बंदोबस्तात ही मिरवणूक शांततेत पार पडली. १४४ वर्षांची गौरवशाली परंपरा असलेल्या या उत्सवाची सुरुवात १८८५ मध्ये ब्रिटिश असंतोषातून झाली होती. पिवळी मारबत ही अत्याचाराचे प्रतीक मानली जाते, तर काळी मारबत ही श्रीकृष्णाने वध केलेल्या पुतना मावशीचे प्रतीक आहे. नेहरू पुतळा परिसरात या दोन्ही मारबतींचे होणारे मिलन पाहण्यासाठी नागरिकांनी प्रचंड गर्दी केली होती.

# चेतेश्वर पुजारा सर्व प्रकारच्या क्रिकेटमधून निवृत्त

**नवी दिल्ली, दि. २४ वृत्तसंस्था**



भारताचा दिग्गज फलंदाज आणि कसोटी क्रिकेटचा 'आधारस्तंभ' म्हणून ओळखला जाणारा चेतेश्वर पुजारा याने रविवारी भारतीय क्रिकेटच्या सर्व प्रकारांमधून आपली निवृत्ती जाहीर केली. त्याच्या या निर्णयामुळे एका चिवट आणि अविस्मरणीय कारकिर्दीवर पडदा पडला आहे. भारतासाठी कसोटीत सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत तो आठव्या क्रमांकावर आहे.


पुजाराने १०३ कसोटी सामन्यांमध्ये ४३.६० च्या सरासरीने ७,१९५ धावा केल्या, ज्यात १९ शतकांचा समावेश आहे. कारकिर्दीच्या अखेरच्या टप्प्यात आलेल्या खराब फॉर्ममुळे त्याची सरासरी किंचित घसरली असली, तरी राजकोटच्या या शांत योद्ध्याची कारकीर्द आकड्यांमध्ये आणि प्रवासातही तितकीच अभिमानास्पद राहिली आहे. शिस्त आणि अथक परिश्रमातून घडलेल्या पुजाराची गोष्ट राजकोटमधून सुरू झाली. त्याचे वडील अरविंद, जे स्वतः प्रथम श्रेणी क्रिकेटपटू आणि रेल्वे कर्मचारी होते, त्यांच्या मार्गदर्शनाखाली तो कोठी ग्राऊंडवरील लिंबाच्या झाडाखाली दररोज हजारो चेंडूंचा सराव करत असे. या खडतर प्रवासातून त्याने भारतीय संघात स्थान मिळवले आणि कसोटी क्रिकेटवरील आपल्या निस्सीम प्रेमाने आणि चिकाटीने एक वेगळी ओळख निर्माण केली.


आपल्या निवृत्तीची घोषणा करताना पुजाराने सोशल मीडियावर एक भावनिक पोस्ट लिहिली. तो म्हणाला, "भारतीय जर्सी घालणे, राष्ट्रगीत गाणे आणि प्रत्येक वेळी मैदानात उतरल्यावर माझे सर्वोत्तम देण्याचा प्रयत्न करणे, या भावना शब्दांत व्यक्त करणे अशक्य आहे. पण म्हणतात ना, प्रत्येक चांगल्या गोष्टीला शेवट असतोच. मी अत्यंत कृतज्ञतेने भारतीय क्रिकेटच्या सर्व प्रकारांमधून निवृत्त होण्याचा निर्णय घेतला आहे. तुमच्या प्रेम आणि समर्थनाबद्दल मनःपूर्वक आभार."

भारताने अनेक आक्रमक आणि शैलीदार फलंदाज दिले असले, तरी डाव सावरण्याची आणि प्रचंड दबाव सहन करण्याची पुजाराची क्षमता अतुलनीय होती. २०१८-१९ मध्ये ऑस्ट्रेलियात मिळवलेल्या भारताच्या पहिल्या ऐतिहासिक कसोटी मालिका विजयाचा तो शिल्पकार होता. या मालिकेत त्याने ५२१ धावा केल्या आणि तब्बल १,२५८ चेंडूंचा सामना केला. यात त्याने तीन शतके झळकावली. त्याच्या या महत्त्वपूर्ण योगदानाची तुलना सुनील गावसकर यांच्या १९७०-७१ मधील वेस्ट इंडिज दौऱ्यातील ७७४ धावांच्या विक्रमाशी आणि त्याच हंगामात इंग्लंडमध्ये दिग्गज फिरकी त्रिकुटाने घेतलेल्या ३७ बळींशी केली जाते. ऑस्ट्रेलियाच्या भूमीवर सलग दोन वेळा बॉर्डर-गावसकर ट्रॉफी जिंकणाऱ्या भारतीय संघाचा तो कणा होता. त्याने आपल्या संयमी फलंदाजीने जगातील सर्वोत्तम गोलंदाजी आक्रमणाला हतबल केले आणि भारताच्या ऐतिहासिक विजयांचा पाया रचला.

# रशियाने 143 ठिकाणांवर केली बॉम्बिंग
## डोनेत्स्कमध्ये दोन गावांवर कब्जा

**मॉस्को, दि. २४ वृत्तसंस्था**





रशिया-युक्रेन युद्धासंदर्भात मोठी बातमी आली आहे. रशियन सैन्याने युक्रेनच्या दोन गावांवर कब्जा केला आहे. 'आपल्या सैन्याने गेल्या २४ तासांत युक्रेनच्या डोनेत्स्क प्रदेशातील स्रेडने आणि क्लेबान बाइक या दोन वस्त्यांवर ताब्यात मिळवला आहे,' असा दावा रशियाने शनिवारी केला. रशियन संरक्षण मंत्रालयाने सांगितले की, दक्षिण आणि पश्चिम लष्करी गटांच्या कारवाईनंतर, ही गावे रशियाच्या ताब्यात आली आहेत.

मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, रशियन सैन्याने युक्रेनियन लष्करी औद्योगिक परिसरात आणि युक्रेनियन सशस्त्र दलाच्या तथा परदेशी सैनिकांच्या अस्थायी तळांसह १४३ ठिकाणी हल्ला केला. तसेच, गेल्या आठवड्यात युक्रेनियन हवाई हल्ल्यांना प्रत्युत्तर देत, रशियन हवाई संरक्षण प्रणालीने चार मार्गदर्शित हवाई बॉम्ब आणि १६० ड्रोन नष्ट केले. महत्वाचे म्हणजे, अमेरिकेच्या मध्यस्थीने दोन्ही देशांमध्ये शांतता चर्चा सुरू असतानाच, ही घटना घडली आहे.

तत्पूर्वी, युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष व्होलोदिमिर झेलेन्स्की यांनी दक्षिण अफ्रीकेचे राष्ट्राध्यक्ष सिरिल रामफोसा यांच्याशी संवाद साधला आणि त्यांना रशियन राष्ट्राध्यक्ष पुतिन यांच्यासोबत चर्चेची तयारी दर्शवली. यासंदर्भात 'एक्सवर एक पोस्ट करत झेलेन्स्की यांनी सांगितले की, मी दक्षिण आफ्रिकेचे राष्ट्राध्यक्ष सिरिल रामफोसा यांच्या विनंतीवरून बोललो. मी त्यांना आपल्या सहकाऱ्यांसोबतचा कूटनीतिक प्रयत्न आणि वाशिंग्टनमध्ये राष्ट्राध्यक्ष ट्रंप यांच्यासोबत झालेल्या बैठकांची माहिती दिल." याच बरोबर, आपण रशियन राष्ट्राध्यक्ष पुतिन यांच्यासोबत कुठल्याही प्रकारच्या बैठकीसाठी तयार असल्याचेही पुन्हा स्पष्ट केले, असेही त्यांनी सांगितले.

## स्कॉर्पिओसह दोन गाड्या दिल्या तरी मन नाही भरले
# 36 लाखांच्या हुंड्यासाठी सासरच्यांनी जिवंत जाळले!

**ग्रेटर नोएडा, दि. २४ वृत्तसंस्था**





उत्तर प्रदेशातील ग्रेटर नोएडामध्ये एक धक्कादायक घटना घडली आहे. एका पतीने हुंड्यासाठी आपल्या पत्नीला जिवंत जाळल्याचा प्रकार समोर आला आहे. ही घटना ग्रेटर नोएडाच्या सिरसा गावात घडली आहे. हुंड्याची मागणी पूर्ण न केल्यामुळे पतीने विवाहित महिलेची निर्घृण हत्या करत तिला जाळून टाकल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेनंतर ग्रेटर नोएडामध्ये एकच खळबळ उडाली आहे.

ग्रेटर नोएडातील एका निक्की नावाच्या विवाहितेची तिच्या पतीने म्हणजेच विपिनने हत्या केल्याचा आरोप आहे. या घटनेत आरोपी पतीला पोलिसांनी अटक केलं आहे. मात्र, आता या घटनेत एक मोठी माहिती समोर आली आहे. निक्कीच्या निर्घृण हत्येतील मुख्य आरोपी विपिनला ग्रेटर नोएडा पोलिसांनी कोठडीतून पळून जाण्याचा प्रयत्न केला असता गोळ्या घालून जखमी केल्याची माहिती समोर आली आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, तपासाचा भाग म्हणून विपिनने खरेदी केलेली एक बाटली परत मिळवण्यासाठी घेऊन जात असताना आरोपीने एका अधिकाऱ्याकडून पिस्तूल हिसकावण्याचा प्रयत्न केला आणि आरोपीने कोठडीतून पळून जाण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर पोलिसांनी गोळीबार केला असता एक गोळी आरोपीच्या पायाला लागली असून आरोपी गंभीर जखमी झाला आहे.

दरम्यान, या चकमकीनंतर प्रतिक्रिया देताना निकीच्या वडिलांनी म्हटलं की, “पोलिसांनी योग्य काम केलं आहे. एक गुन्हेगार नेहमीच पळून जाण्याचा प्रयत्न करतो आणि विपिन हा गुन्हेगार आहे. आमची विनंती आहे की इतरांनाही पकडलं पाहिजे.”

मृत महिलेच्या बहिणीने आरोप केला आहे की, “आमचा दोघींचाही छळ होत होता. आमच्या सासरचे लोक आम्हाला सांगायचे की ३६ लाख रुपये घेऊन या. गुरुवारी पहाटे १.३० ते ४ च्या दरम्यान माझ्यावरही हल्ला झाला. त्यांनी मला सांगितलं की, आम्हाला एका बहिणीसाठी हुंडा मिळाला, पण दुसऱ्याचं काय? आपण पुन्हा लग्न करू, मला अनेक वेळा मारहाण झाली आणि मी दिवसभर शुद्धीवर नव्हते”, असा आरोप तिने केला आहे. “त्याच संध्याकाळी माझ्या मुलांसमोर माझ्या बहिणीवर क्रूरपणे हल्ला केला. माझ्या डोळ्यांसमोर तिला जाळून टाकलं. मी तिला वाचवण्याचा प्रयत्न केला, पण मी काहीही करू शकले नाही. कोणीतरी तिला रुग्णालयात दाखल केलं. मी ते पाहून बेशुद्ध पडले होते. मला न्याय हवा आहे. माझ्या सासरच्यांनी माझ्या बहिणीला ज्या प्रकारे त्रास दिला तसाच त्रास त्यांना द्यावा अशी माझी इच्छा आहे”, असं ती म्हणाली.

# करंट इन्फ्राप्रोजेक्ट्सचा आयपीओ 26 ऑगस्ट रोजी उघडणार




करंट इन्फ्राप्रोजेक्ट्स लिमिटेड (कंपनी, करंट इन्फ्रा) ही एक इन्फ्रास्ट्रक्चर बांधकाम व EPC सेवा प्रदाता कंपनी आहे, जी सोलर, इलेक्ट्रिकल, जल आणि सिव्हिल विभागांमध्ये संपूर्ण उपाययोजना देते. ही कंपनी मंगळवार, 26 ऑगस्ट 2025 रोजी आपला प्रारंभिक सार्वजनिक निर्गम आयपीओ सुरू करण्याचा प्रस्ताव करत आहे आणि 41.80 कोटींची उभारणी करण्याचे उद्दिष्ट ठेवीत आहे. या शेअर्सची नोंदणी एनएसइ इमर्ज प्लॅटफॉर्मवर केली जाणार आहे. या निर्गमाचा आकार 52,25,600 इक्विटी शेअर्सचा असून प्रत्येक शेअरचा मूळ मूल्य 10 आहे आणि किंमत बँड 76 ते 80 प्रति शेअर आहे.इक्विटी शेअर वाटप QIB एंकर हिस्सा जास्तीत जास्त 14,52,800 इक्विटी शेअर्स. क्वालिफाइड इंस्टिट्यूशनल बायर जास्तीत जास्त 9,69,600 इक्विटी शेअर्स. नॉन-इंस्टिट्यूशनल इन्वेस्टर्स किमान 7,29,600 इक्विटी शेअर्स. वैयक्तिक गुंतवणूकदार किमान 17,05,600 इक्विटी शेअर्स. कर्मचारी आरक्षण जास्तीत जास्त 99,200 इक्विटी शेअर्स. मार्केट मेकर जास्तीत जास्त 2,68,800 इक्विटी शेअर्स असे असणार आहे. आयपीओ मधून मिळणारी निव्वळ रक्कम आमच्या पूर्ण मालकीच्या सहाय्यक कंपनी करंट इन्फ्रा धनबाद सोलर प्रायव्हेट लिमिटेड मध्ये इक्विटी गुंतवणुकीसाठी वापरली जाईल. ही कंपनी रेस्को मॉडेल अंतर्गत भारतीय तंत्रज्ञान संस्थान (इंडियन स्कूल ऑफ माईन्स) धनबाद, झारखंड येथे 1800 केडब्ल्यू सौर ऊर्जा प्रकल्प उभारेल. याशिवाय, ही रक्कम कार्यशील भांडवलाच्या गरजा आणि सामान्य कॉर्पोरेट उद्दिष्टांसाठी वापरली जाईल.एंकर हिस्सा 25 ऑगस्ट 2025 रोजी खुले होईल आणि निर्गम 29 ऑगस्ट 2025 रोजी बंद होईल.

**लोकार्थ**

## अंदाजे ३५०४ कोटींच्या मोठ्या सब्स्क्रिप्शनसह मंगल इलेक्ट्रिकलचा आयपीओ बंद

मंगल इलेक्ट्रिकल इंडस्ट्रीज लिमिटेडने आयपीओय शस्वीरित्या बंद करण्याची घोषणा केली, यामध्ये २.५ पट पेक्षा जास्त बोली आकर्षित केल्या एकूण खरेदी ३५०४ कोटी रुपये होती तर एकूण सबस्क्रिप्शन- ११.९९x किब- ११.१x (अँकर वगळून) एनआयआय- २०.४७x आणि किरकोळ विक्री- ७.३९x झाली. कोल्ड-रोल्ड ग्रेन ओरिएंटेड स्टील, अमॉर्फस मटेरियल आणि इंटिग्रेटेड सर्किट ब्रेकर्स सारख्या ट्रान्सफॉर्मर घटकांच्या प्रक्रियेत गुंतलेली वाढणारी कंपनी, ट्रान्सफॉर्मर तयार करणे आणि व्यापक EPC सेवा प्रदान करणे यासह, मंगल इलेक्ट्रिकल इंडस्ट्रीज लिमिटेडने मंगल इलेक्ट्रिकल इंडस्ट्रीज लिमिटेडचा आयपिओ यशस्वीरित्या बंद करण्याची घोषणा केली आहे. १२० कोटींच्या अँकर भागाला २.५ पट पेक्षा जास्त बोलींसह जबरदस्त प्रतिसाद मिळाला.अँकर्स बुकला अबक्कुस एआयएफ, सुंदरम एआयएफ, मिरास इन्व्हेस्टमेंट्स (एलसी फॅरोस मल्टी स्ट्रॅटेजी फंड), एलएमआर पार्टनर्स (सोसायटी जनरल - ओडीआय) आणि फिनाव्हेन्यू ग्रोथ फंड यासह अनेक मार्की गुंतवणूकदारांनी सबस्क्राइब केले होते, ज्यात इतर अनेक मार्की देशांतर्गत आणि परदेशी संस्थांचा समावेश होता. कंपनीला आयआयएफएल कॅपिटल सर्व्हिसेस लिमिटेडकडून "सबस्क्राइब" रेटिंग मिळाले आहे आणि कंपनी "ट्रान्सफॉर्मर घटकांच्या प्रक्रियेत आणि ट्रान्सफॉर्मरच्या निर्मितीमध्ये वीज पायाभूत सुविधा क्षेत्रातील आघाडीच्या खेळाडूंपैकी एक आहे, ग्राहकांची विविधता आहे, मजबूत बॅकवर्ड आणि फॉरवर्ड इंटिग्रेशन आहे जे ऑपरेशनल कार्यक्षमता सुनिश्चित करते, सातत्यपूर्ण वाढीचा सिद्ध ट्रॅक रेकॉर्ड आहे, तिच्या विद्यमान सुविधांमध्ये उत्पादन क्षमता वाढवण्याची आणि विद्यमान उत्पादन पोर्टफोलिओचा विस्तार करण्याची योजना आहे, हे लक्षात घेता कंपनी इश्यूला सबस्क्राइब करण्याची शिफारस करते..मंगल इलेक्ट्रिकल आयपीओ हा ४००.०० कोटींचा बुक बिल्ड इश्यू आहे. हा इश्यू पूर्णपणे ४००.०० कोटींचा नवीन इश्यू आहे. ट्रान्सफॉर्मर घटक उत्पादक कंपनीने प्रति शेअर ५३३ ते ५६१ रुपयांचा किंमत पट्टा निश्चित केला होता.

## एल अँड टी फायनान्स आणि गुगल पे यांची भागीदारी

एल अँड टी फायनान्स लिमिटेड (एलटीएफ), पूर्वी एल अँड टी फायनान्स होल्डिंग्ज लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी आणि देशातील आघाडीच्या बिगर-बँकिंग वित्तीय कंपन्यांपैकी (एनबीएफसी) एक, हिने गुगल पेसोबत भागीदारी करून पात्र वापरकर्त्यांना गुगल पे प्लॅटफॉर्मद्वारे वैयक्तिक कर्ज उत्पादने उपलब्ध करून दिली आहेत. ही भागीदारी एलटीएफच्या उत्पादन विविधीकरण धोरणाशी सुसंगत असून ग्राहकांसाठी जलद, सुलभ आणि डिजिटल स्वरूपात कर्ज अधिक सहज उपलब्ध करून देते.भागीदारीबद्दल बोलताना एल अँड टी फायनान्स लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. सुदीप्त रॉय म्हणाले, “वित्तीय सेवांचे भविष्य म्हणजे सामर्थ्यवान, ग्राहक-केंद्रित परिसंस्था निर्माण करणे. गुगल पेसोबतच्या आमच्या सहकार्यामुळे आम्ही भारतीय ग्राहकांना अधिक चांगल्या पद्धतीने सेवा देण्याची क्षमता वाढवत आहोत. आम्ही आमची वित्तीय उत्पादने उच्च सहभाग असलेल्या परिसंस्थांमध्ये एकत्रित करत आहोत, ज्यामुळे वितरण मॉडेल अधिक कार्यक्षम होईल आणि आधुनिक ग्राहकांच्या अपेक्षांना अनुरूप राहील.”

वित्तीय वर्ष २०२५ (एफवाय२५) मध्ये एलटीएफने फोनपे, क्रेड आणि ॲमेझॉन पे यांसारख्या फिनटेक प्लॅटफॉर्मसोबत भागीदाऱ्या जाहीर केल्या होत्या. ग्राहक-केंद्रित दृष्टिकोन आणि ग्राहक प्राप्ती चॅनेल्ससोबतच्या भागीदाऱ्यांमुळे कंपनीच्या वैयक्तिक कर्ज व्यवसायाला गती मिळाली आहे.

# इंडियन बँकेद्वारे एमएसएमई आणि रिटेल ग्राहक संपर्क शिबिराचे आयोजन

भारत सरकारने एमएसएमई वित्तपुरवठा करण्यावर दिलेला जोर पाहता इंडियन बँकेने सुद्धा एमएसएमई वित्तपुरवठा करण्यावर अधिक जोर द्यायचे ठरवले आहे. ह्याच मालिकेत इंडियन बँकेने एमएसएमई आणि रिटेल ग्राहक संपर्क शिबिराचं मुंबईत आयोजन केले होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान बँकेचे एमडी आणि सीईओ श्री. बिनोद कुमार यांनी भूषवले. शिबिरामध्ये संपूर्ण एफजीएम क्षेत्रातील एमएसएमई आणि रिटेल ग्राहकांना रु.1400 करोड रुपयांपर्यंतची एकंदरीत 200 ऋणे मंजूर केली गेली आणि ऋण मंजूरीपत्रे वितरित केली गेली.ग्राहकांना संबोधताना श्री.विनोद कुमार यांनी एमएसएमई आणि रिटेल क्षेत्रातील बँकेच्या विविध उत्पादनांची आणि योजनांची संक्षिप्त माहिती दिली. या व्यतिरिक्त ग्राहकांना बँकेच्या एमएसएमई आणि रिटेल तसेच डिजिटल उत्पादनांची ओळख व्हावी यासाठी ऑडिओ-व्हिज्युअल सादरीकरण केले गेले.एमडी आणि सीईओ यांनी पुढे असेही सांगितले कि इंडियन बँकेने पुढाकार घेऊन नवीन वेगवेगळ्या सेवांचा प्रारम्भ केला आहे जसे इंड स्मार्ट बिझ ऐप ,फोरेक्ससाठी इंड ट्रेड नेक्स्ट ,1 करोड रुपयांपर्यंत इंड जीएसटी अंतर्गत त्रासमुक्त कर्ज, एमएसएमई खात्यांची ऑनलाइन रिव्ह्यू व नवीकरण इत्यादि. बँकेने विशेष एमएसएमई राईज अभियान सुरू केले आहे ज्यायोगे कमी आरओई,विविध सवलती इत्यादी विशेष लाभ उपलब्ध केले गेले आहेत. या कार्यक्रमाला मुंबईचे क्षेत्र महाव्यवस्थापक श्री.दीपक गुप्ता ही उपस्थित होते.

संकलन –संयोजन
**सुबोध रणशेवरे**
संपर्क -९८३३१४६३५६
ईमेल -subodh.ranshevre @rediffmail.com

# भारताकडून अमेरिकेसाठीची टपाल सेवा स्थगित

**नवी दिल्ली, दि. २४ वृत्तसंस्था**



अमेरिकी सीमा शुल्क विभागाने जारी केलेल्या नव्या नियमांमध्ये स्पष्टता नसल्यामुळे अमेरिकेला जाणाऱ्या विमानांमध्ये मालवाहतूक करण्यासाठी हवाई वाहतूक कंपन्यांनी नकार दिला आहे. त्यामुळे अमेरिकेला जाणारी टपाल सेवा तात्पुरती स्थगित करण्याचा निर्णय केंद्रीय दळणवळण मंत्रालयाने शनिवारी घेतला.

अमेरिकी प्रशासनाने भारतीय वस्तूंवरील आयात शुल्क वाढवल्यामुळे सध्या दोन्ही देशांमध्ये तणाव निर्माण झाला आहे. ३० जुलै रोजी अमेरिकी प्रशासनाकडून काढण्यात आलेल्या नव्या कार्यकारी आदेशानुसार १०० डॉलरपेक्षा अधिक किमतीच्या वस्तूंवर २९ ऑगस्टपासून अमेरिकेत सीमा शुल्क आकारले जाणार आहे. ८०० डॉलरपर्यंतच्या वस्तूंवरील सीमा शुल्क सवलत रद्द करण्यात आली आहे. पूर्वी कमी किमतीच्या वस्तू शुल्काशिवाय अमेरिकेत पोहोचत होत्या. मात्र नव्या निर्णयामुळे सीमा शुल्क भरावे लागणार आहे. त्यामुळेच हवाई कंपन्यांनी अमेरिकेत जाणाऱ्या विमानांमध्ये टपाली वाहतूक स्वीकारण्यास असमर्थता दर्शविली आहे. त्यामुळे केंद्रीय दळणवळण विभागाने अमेरिकेला जाणारी टपाल सेवा तात्पुरत्या स्वरूपात स्थगित करण्याचा निर्णय घेतला. मात्र १०० डॉलरपर्यंतची पत्रे, कागदपत्रे आणि भेटवस्तूंसाठी ही सेवा सुरू राहणार आहे.

व्हाइट हाऊसचे कर्मचारी संचालक आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचे कट्टर निष्ठावंत समजले जाणारे सर्जियो गोर यांना भारतातील पुढील अमेरिकी राजदूत म्हणून नामांकित करण्यात आले आहे. व्यापाराशी संबंधित मुद्द्यांवरून दोन्ही देशांमधील संबंधांमध्ये दुरावा निर्माण होत असताना हे पाऊल उचलण्यात आले आहे. ३८ वर्षीय गोर यांना प्रमुख राजदूत पदावर नियुक्त करण्याची घोषणा करताना ट्रम्प यांनी सांगितले की ते दक्षिण आणि मध्य आशियाई व्यवहारांसाठी विशेष राजदूत म्हणूनही काम करतील.

# दलाई लामांचा उत्तराधिकारी बीजिंगकडून लादलेला नको



**पुणे, दि. २४ वृत्तसंस्था**

‘चीनचे राष्ट्रपती शी जिनपिंग हे दडपशहा आहेत. चीनने तिबेट स्वायत्त प्रदेश स्थापन केल्याच्या ६० व्या वर्धापनदिनाच्या निमित्ताने त्यांनी २० ऑगस्ट रोजी तिबेटची राजधानी ‘ल्हासा’ला भेट दिली. मात्र, दलाई लामांचा उत्तराधिकारी बीजिंगकडून लादलेला नको,’ अशी भूमिका तिबेटचे संसदपटू दोर्जे त्सेतेन यांनी पुण्यात पत्रकार परिषदेत मांडली. या वेळी तिबेटी लेखक व कार्यकर्ते तेनझिन त्सुंदए व नॅशनल कॅम्पेन फॉर तिबेटन सपोर्टचे अध्यक्ष बाळासाहेब रास्ते उपस्थित होते.

त्सेतेन म्हणाले, ‘शी जिनपिंग यांचा तिबेट दौरा हे राजकीय नाटक असून, हा वर्धापनदिन प्रत्यक्षात चीनच्या वसाहतवादाची आठवण करून देणारा आहे. तिबेटी बौद्ध धर्माचे सर्वोच्च आध्यात्मिक गुरू दलाई लामा यांनी त्यांच्या मृत्यूनंतरचा उत्तराधिकारी तिबेटी परंपरेनुसार निवडला जाईल, असे स्पष्ट केले आहे आणि या निवडीचा अधिकार चीनच्या कोणत्याही हस्तक्षेपाशिवाय गाडेन फोडरंग ट्रस्टकडे राहील. परंतु, चीनकडून त्यांचा उत्तराधिकारी निवडण्याचा घाट घातला जात आहे. त्याला तिबेटचा विरोध आहे.’

गेल्या अनेक वर्षांपासून तिबेटमध्ये मोठ्या प्रमाणात हुकूमशाही वापरली जात आहे. या विरोधात कोणी बोलले, तर नागरिकांची हत्या केली जात आहे. तिबेटमध्ये एक प्रकारे अघोषित ताळेबंदी लादली गेली असून जिनपिंग यांनी वारंवार दौरे करून तिबेटबासियांचे ध्रुवीकरण करण्याचा प्रयत्न सुरू आहे. कोणत्याही प्रकारे जिनपिंग यांना तिबेटवर ताबा मिळवायचा आहे, असा आरोपही त्सुंदए यांनी केला. भारतात जेवढे स्वातंत्र्य आहे, तेवढे स्वातंत्र्य तिबेटमध्ये नसल्याचेही त्यांनी यावेळी नमूद केले.

हिमाचल प्रदेशातील धर्मशाला येथे मॅक्लॉडगंजमध्ये बौद्ध धर्मातील ज्येष्ठ लामांची एक धार्मिक बैठक झाली होती. या बैठकीत दलाई लामा यांनी एका ऑनलाइन माध्यमाद्वारे संदेश प्रसारित केला होता. तसेच, दलाई लामा यांच्या उत्तराधिकारी निवडीबाबत केंद्रीय अल्पसंख्याक मंत्री किरेन रिजिजू यांच्या वक्तव्याला चीनने आक्षेप घेतला होता. ‘तिबेटसंबंधी मुद्द्यांमध्ये भारताने हस्तक्षेप करू नये. या संदर्भात मतप्रदर्शन करताना भारताने सावधगिरी बाळगली पाहिजे. द्विपक्षीय संबंधांमध्ये परिणाम होणार नाही, याची काळजी घेण्यात यावी,’ असे चीनकडून सांगण्यात आले होते. त्यामुळे हा वाद आणखी पेटला असून, त्या पार्श्वभूमीवर त्सेतेन यांनी ही भूमिका मांडली.

# जागतिक तिरंदाजी स्पर्धेत महाराष्ट्राच्या गाथा खडके, शर्वरी शेंडेला कांस्य

**पुणे, दि. २४ प्रतिनिधी**



कॅनडा येथे सुरु असलेल्या जागतिक तिरंदाजी स्पर्धेत महाराष्ट्राच्या गाथा खडके, शर्वरी शेंडेने जियाना कुमारच्या साथीने ऐतिहासिक कांस्यपदकाचा कामगिरी केली आहे.

अमेरिकेच्या संघाचा ६-० ने दणदणीत विजय नोंदवून १८ वर्षांखालील रिकर्व्ह प्रकारात भारतीय मुलींनी कांस्यपदकाचा पराक्रम केला आहे. पात्रता फेरीत भारत चौथ्या स्थानावर होता. उपउपांत्यपूर्व फेरीत मेक्सिको संघावर ६-० ने सेटने पराभव करून स्पर्धेत विजयी सलामी दिली. उपांत्यपूर्व लढतीत बलाढ्य जपान संघाचा ५-३ सेटने पराभव भारताने उपांत्य फेरीत मुसंडी मारली होती. उपांत्य फेरीत कोरिया संघाने भारताला कडवी झुंज दिली. ६-२ सेटपर्यंत लढत रंगली. अखेर १ गुण फरकाने कोरियाने निसटता विजय संपादन केला.

कांस्य पदकाच्या लढतीत अमेरिकेला भारताने एकाही विजयाची संधी दिली नाही. ५५-५३, ५९-५६,५५-५२ गुणांसह ६-० सेटने भारताने ऐतिहासिक कांस्य पदकाचर मोहर उमटवली. भारतीय संघांचे प्रशिक्षक प्रा रणजित चामले हे या संघांचे प्रशिक्षक होते. रणजीत सरांच्या प्रोत्साहनामुळे हे यश हाती आले असे सोलापूरच्या गाथा खडके हीने सांगितले. कांस्य पदक विजेता संघात सोलापूरच्या गाथा खडके, पुण्याच्या शर्वरी शेंडेसह चंदिगडच्या जियाना कुमार हीचा समावेश होता.

महासागर NASHIK
Printed by S R PUBLICATION, Published by Shrikrishna Tansukhdas Chandak on behalf of Shrikrishna Tansukhdas Chandak, printed at GODOWN NO. 8, 9, 10, Mohan Arjun Compound, Near Ghartan Pada, Vaishali Nagar, Last Bus Stop, Dahisar (East), Mumbai Suburban, Maharashtra - 400068 and published at Plot No. 5, Anandi Bungalow, Kotwal Park, Tilakwadi, Dhamankar Corner, Nashik, Maharashtra - 422002.
Editor: Shrikrishna Tansukhdas Chandak. Resident Editor- Jayant Mahajan. PRGI Registration No.MHMAR/25/A0219

महासागर नाशिक
मुद्रक एस. आर. पब्लिकेशन, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, यांच्या वतीने श्रीकृष्ण तनसुखदास चांडक द्वारे प्रकाशित. मुद्रण स्थळ – गोडाऊन क्र. ८, ९, १०, मोहन अर्जुन कंपाउंड, घर्तन पाडा जवळ, वैशाली नगर, शेवटचा बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई उपनगर, महाराष्ट्र – ४०००६८. प्रकाशन स्थळ – प्लॉट क्र. ५, आनंदी बंगलो, कोतवाल पार्क, टिळकवाडी, धमणकर कॉर्नर, नाशिक, महाराष्ट्र – ४२२००२. **संपादक: श्रीकृष्ण तनसुखदास चांडक. निवासी संपादक – जयंत महाजन.** **PRGI नोंदणी क्रमांक: MHMAR/25/A0219**